







# मॉडर्न १९८९-९०



**डॉ. बी. डी. कुलकर्णी (ज्येष्ठ शास्त्रज्ञ, एन. सी. एल. पुणे) यांचा प्राचार्य डॉ. नवलगुंदकर यांचे हस्ते सत्कार**



**डॉ. माशेलकर (संचालक, एन. सी. एल. पुणे) १२ वी सायन्सच्या विजयी संघास प्रथम पारितोषिक देतांना**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५

# 'मॉडर्न' नियतकालिक
# १९८९–९०

: संपादन समिती :

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर

: संपादक :

डॉ. सुरेश धायगुडे

: सदस्य :

प्रा. बाळकृष्ण वाणी

डॉ. स्नेहल तावरे

प्रा. कु. सुरेखा परब

प्रा. सुहास घैसास

प्रा. अशोक कांबळे

प्रकाशक : प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

मुद्रक : वि. ना. भंडारे
स्वानंद मुद्रणालय
२०३ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| प्रा. वसंत कानेटकर व त्यांच्या नाटचकृती | मोहन शिंदे | १ |
| लक्ष्य (कविता) | उमेश दत्तात्रय गांजाळे | ३ |
| गुन्हेगार (कथा) | संतोष कृ. वाळके | ४ |
| नातीगोती (कविता) | कु. अनीता अ. आंद्रे | ७ |
| शब्द (कविता) | कु. माणिक सूर्यवंशी | ७ |
| महाराष्ट्र विधानसभा निवडणूक (१९९०) – एक विश्लेषण | कु. सुषमा वि. कुलकर्णी | ८ |
| सहज मनी विचार आला (कविता) | कु. अनीता भोसले | १० |
| 'देव चालले' | पोरे बी. व्ही. | ११ |
| झंकार (कविता) | प्रदीप कुलकर्णी | १२ |
| पोरका (कविता) | विक्रांत ढवळे | १२ |
| प्राणिशास्त्र बिभागाची कारवार सहल | कु. इंद्रायणी गोडबोले | १३ |
| म. म. द. वा. पोतदार– एक पुराणपुरुष | प्रा. म. आ. कुलकर्णी | १५ |
| 'आश्वासन', 'अस्तित्व' ( किंचित् कविता) | कु. भारती वसंत सांब | १७ |
| आमचे काका (गौरवलेख) | प्रा. त्र्यंबक प्र. लाळे | १८ |
| महात्मा फुल्यांचे विचार | कु. स्मिता द. खोत | १९ |
| भागवत धर्माचे संस्थापक– ज्ञानेश्वर | दत्ता सावता माळी | २४ |


## हिंदी विभाग


| | | |
|---|---|---|
| 'देव देव' आलसी पुकारे | गुंजन गुप्ता | २५ |
| राखी (कविता) | कु. शिल्पा सुरेंद्र पुरंदरे | २६ |
| बापू (कविता) | संतोष कृ. वाळके | २६ |
| जवाहरलालजी के पश्चात् का भारत | कु. मृदुला फाटक | २७ |

| | | |
|---|---|---|
| श्रद्धांजली | विजय पाटील | २८ |
| 'आतंकवाद'– समस्या और समाधान | कु. सुनीता गौड | २९ |
| क्या होगा ? (कविता) | कु. रेखा शर्मा | ३० |
| सफर (कविता) | निरंजन जोशी | ३० |
| झलक (कविता) | अ. समद गोलंदाज | ३१ |
| माया है (कविता) | यशवंत राठोर | ३१ |
| मकसद (कविता) | कु. ज्योति श्रीकांत शिवतरे | ३१ |
| ऐसा भी होता है (कविता) | कु. रेखा शर्मा | ३१ |
| जिंदगी की ट्रेन (कविता) | यशवंत राठोर | ३२ |

**इंग्रजी विभाग**

| | |
|---|---|
| Air Pollution | Laxman M. Rajiwade |
| An Unforgettable Visit | Rajalaxmi Parameswaran |

**वार्षिक अहवाल**

# संपादकीय

चालू शैक्षणिक वर्षाचा 'मॉडर्न' चा अंक आपल्या हाती देण्यास आम्हास आनंद होत आहे. १९८९ व १९९० ही वर्षे राष्ट्रीय जीवनातील 'शताब्दी' वर्षे म्हणून चिरकाल स्मरणात रहातील. १९८९ हे वर्ष पं. जवाहरलाल नेहरु, डॉ. हेडगेवार, डॉ. सी व्ही. रामन, मौ. अबुल कलाम आझाद अशा राष्ट्रीय नेत्यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून गाजले. १९९० हे वर्ष 'ज्ञानेश्वरी' च्या सांगतेचे सप्तशताब्दी वर्ष आहे. थोर समाजसुधारक म. ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीची शताब्दी याच वर्षात येत आहे. भारताच्या घटनेचे शिल्पकार व दलितांचे महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठीतील नामवंत कवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे अर्थात बालकवि, प्रसिद्ध इतिहाससंशोधक म. म. द. वा. पोतदार यांचीही जन्मशताब्दी याच वर्षात साजरी होत आहे. या थोर व्यक्तींच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा यामागे एक हेतू आहेच. पण त्याचबरोबर समाजशिक्षणाच्या दृष्टीने या उपक्रमाचे अधिक महत्त्व आहे. या महनीय व्यक्तींच्या जीवनकालाचा फार मोठा भाग भाग पारतंत्र्यात गेला. यांपैकी काहींचे जीवन तर पारतंत्र्यातच संपून गेले. त्या अतिशय प्रतिकूल काळात या विभूतींनी शुद्ध चारित्र्य, उच्च विचारसरणी, उज्ज्वल ध्येयवाद यांनी युक्त असलेले नेतृत्व देशास दिले. आज देशास स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षांहून अधिक काळ लोटून गेल्यावर देशापुढे सर्वच क्षेत्रात नेतृत्वाची गंभीर समस्या निर्माण झालेली दिसते. विशेषतः संस्कारक्षम युवकांच्या पुढे ठेवता येतील असे आदर्श सार्वजनिक जीवनात अभावानेच दिसू लागले आहेत. सार्वजनिक जीवनात आजवर जपली गेलेली श्रेष्ठ पारंपरिक मूल्येच बदलणार की काय अशी भीती निर्माण झाली आहे. अशा वेळी या विभूतींचे आदर्श, त्यांचे कार्य व ध्येयवाद तरुण पिढीस दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरू शकेल. याच दृष्टीने प्रस्तुत अंकांत संत ज्ञानेश्वर, म. ज्योतिबा फुले, म. म. द वा. पोतदार यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारे लेख समाविष्ट केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बालकवि यांची जन्मशताब्दी मुख्यतः पुढील शैक्षणिक वर्षात येत असल्याने त्यांच्या जीवनकार्यावरील लेख पुढील अंकात प्रसिद्ध केले जातील.

१९८९–९० हे वर्ष राष्ट्रीय जीवनात परिवर्तनाचे वर्ष ठरले आहे. सार्वत्रिक निवडणुकात या वर्षी प्रथमच अठरा वर्षांवरील युवकांना मताधिकार प्राप्त झाला. १८ ते २१ या वयोगटातील मतदारात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. निवडणुकीच्या द्वारे या देशात जे परिवर्तन घडले आहे त्यात राजकीय दृष्टया अधिक जागरूक असलेल्या या सुशिक्षित तरुण मतदारांचा सहभाग आहे हे मान्य करावे लागेल. देशाची सुरक्षितता, अखंडता व सार्वजनिक जीवनात शुद्ध जीवनाची आवश्यकता हेच या निवडणुकीतील महत्त्वाचे प्रश्न होते. ते प्रश्न निवडणुकीच्या निकालांनी सुटले आहेत असे कोणीच म्हणणार नाही. पण आपल्याला या बाबतीत काय हवे आहे ते मतदारांनी स्पष्टपणे दाखविले आहे हे महत्त्वाचे आहे. देशाची लोकशाही अधिक प्रगल्भ होऊ लागल्याचे हे सुचिन्ह आहे. हीच प्रगल्भतेची व जबाबदारीची जाणीव नवमतदार असलेल्या आमच्या विद्यार्थ्यांनी विद्याभ्यास व व्यासंगाच्या क्षेत्रात अधिक मोठ्या प्रमाणावर दाखविली तर प्रारंभी उल्लेख केलेल्या सर्वांगीण नेतृत्वाच्या राष्ट्रीय समस्येस भविष्यकाळात तेच समर्थ उत्तर देतील यात शंका नाही.

१९९० हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष' म्हणूनही साजरे केले जात आहे. त्या दृष्टीने सदर अंकाच्या मुखपृष्ठाची रचना केली आहे. पाटी व पुस्तकाच्या माध्यमातूनच लहान बालकाला जगाचे दर्शन होत असते व मागील पिढ्यांचे विचारधन त्याच्यापर्यंत पोहोचत असते. पाटी व पुस्तक या साध्या वस्तूंमध्ये ही अद्भुत शक्ती असते म्हणूनच बालकाला त्यांचे आकर्षण वाटते, व त्यांच्याविषयी त्याच्या मनात नैसर्गिक कुतूहल असते. शेवटी पाटी व पुस्तकाचा संबंध साक्षरतेशी व शिक्षणाशी आहे. दुर्दैवाने भारतात निरक्षरतेची समस्या गंभीर असून इ. स. २००० पर्यंत 'जगातील सर्वाधिक निरक्षर असलेला देश' अशी ख्याती आपल्या वाट्यास येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ह्या बिकट समस्येशी देशाच्या सर्वांगीण विकासाचा व प्रगतीचा प्रश्न प्रत्यक्ष जोडलेला आहे. सामाजिक समता, न्याय व लोकशाही यांचे यश समाजशिक्षणावरच अवलंबून आहे. तो मार्ग कोट्यवधी शिक्षणवंचित नागरिकांसाठी खुला करण्याच्या राष्ट्रीय कार्यक्रमात आपले महाविद्यालयही विविध उपक्रमांच्या द्वारे खारीचा वाटा उचलीत आहे.

महाविद्यालयाच्या या वर्षीच्या वाटचालीचा आलेख प्रगतीचा पुढचा टप्पा दाखविणारा आहे. सदर अंकात पुढे दिलेल्या सविस्तर अहवालांवरून त्याची अधिक चांगली कल्पना येईल. या कारणासाठीच येथे त्या तपशिलाचा निराळा उल्लेख टाळला आहे. या वर्षीही पहिल्या सत्रात प्राध्यापकांना आपल्या मागण्यांसाठी पुन्हा एकदा संपावर जावे लागले. त्याचा काही अपरिहार्य परिणाम सर्वच महाविद्यालयांच्या कामकाजावर झाल्याशिवाय राहिला नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही आपल्या मागण्यांसाठी हाच मार्ग पत्करावा लागला. शैक्षणिक क्षेत्रातील घटकांवर संपाची आपत्ती पुन्हा येऊ नये हीच अपेक्षा कोणीही करील कारण या प्रकारामुळे शैक्षणिक प्रक्रिया खंडित होऊन विद्यार्थ्यांचेच नुकसान होते.

आपल्या महाविद्यालयात चालू वर्षी निवडणुका, स्नेहसंमेलन व इतर सर्व उपक्रम शांततेत व शिस्तीत पार पडले. या सर्वांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्तम सहकार्य मिळाले. हीच परंपरा पुढे चालू राहील अशीच सर्वांची अपेक्षा आहे.

क्रीडाक्षेत्रात आपल्या महाविद्यालयाची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. राज्य पातळीवरील शिवछत्रपती पुरस्कार आपल्या महाविद्यालयाइतका इतर संस्थांनी मिळविल्याचे क्वचितच दिसून येईल. या वर्षी आपली विद्यार्थिनी कु. स्वाती कुलकर्णी हिने हा सन्मान मिळविला ही अभिनंदनीय बाब आहे.

महाविद्यालयाच्या जीवनात सुखदुःखाचे प्रसंग येतच असतात. या वर्षी आपले हिंदीचे प्राध्यापक प्रो. आर. माळवे व ग्रंथालयातील सेवक तुकाराम पनवेलकर यांचे झालेले आकस्मिक मृत्यू व प्रथम वर्ष साहित्य या वर्गातील विद्यार्थी प्रसाद पुराणिक व बाबू खुणवे यांचे अपघाती मृत्यू या दुःखद घटना घडल्या.

महाविद्यालयाचे कुलसचिव श्री. यशवंत पांडुरंग देशपांडे तथा 'काका' या वर्षी प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने व कार्यशैलीने त्यांनी सर्वांनाच आपलेसे करून घेतले होते. त्यांच्यासंबंधी एक गौरवलेख प्रस्तुत अंकात छापला आहे. तो सर्वांच्याच भावना हृद्यपणे व्यक्त करू शकेल असे वाटते.

आपले महाविद्यालय चालविणाऱ्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या बिझिनेस कौन्सिलचे सदस्य व कॉलेज कमिटीचे सदस्य डॉ. गजानन रमाकांत तथा शिरीष एकबोटे यांची यावर्षी पुणे विद्यापीठ कार्यकारिणीवर निवड झाली. ही संस्थेच्या व महाविद्यालयाच्या दृष्टीने आनंदाची व अभिमानाची बाब आहे.

सदर अंक सिद्ध करण्यासाठी अनेकांचा हातभार लागला आहे हे कृतज्ञतेने नमूद करणे आमचे कर्तव्य आहे. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी अगदी प्रथमपासून ते अंकाचे प्रकाशन होईपर्यंत प्रत्येक अडचण दूर करण्यास साहाय्य केले व महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व सूचना दिल्या. संपादन समितीवरील सदस्यांनी आपापल्या परीने अंकाच्या सिद्धतेची जबाबदारी स्वीकारून सहकार्य केले. महाविद्यालयाच्या क्रीडासमितीचे प्रा. शेरीकर यांनी वेळोवेळी सहकार्य केले. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या ग्रंथालय तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते साहाय्य केले. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

ज्या प्राध्यापकांनी या अंकासाठी स्वत: लेख दिले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून लेख सिद्ध करविले तसेच ज्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपले लेखन या अंकासाठी दिले त्यांचेही आम्ही आभारी आहोत. मुखपृष्ठाची संकल्पना चित्रकार श्री. प्रकाश नेवासकर यांनी सुबकपणे साकार केली त्याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद. ब्लॉकमेकर सुप्रीम प्रोसेसचे श्री. खाडिलकर व स्वानंद मुद्रणालयाचे श्री. भंडारे यांचे त्यांच्या योगदानाबद्दल मन:पूर्वक आभार.

**डॉ. सुरेश धायगुडे**




क्रीडा संघटना (१९८९-९०)




मा. श्री. राघवेंद्र पाटील (शिक्षण संचालक) क्रीडा दिनानिमित्त अध्यक्षीय भाषण करतांना

अभिनंदन !




डॉ. शिरीष एकबोटे
प्रो. ए. सोसायटी बिझिनेस कौन्सिल सदस्य, पुणे विद्यापीठ विधिसभा व कार्यकारिणीवर निवड



कबड्डी विजेता संघ (महिला) वरिष्ठ महाविद्यालय



आंतर-राज्य कबड्डी स्पर्धा विजेता संघ–मुली–कनिष्ठ महाविद्यालय




पुणे जिल्हा आंतरशालेय व्हॉलीबाल स्पर्धा विजेता संघ



राष्ट्रीय सेवा योजना



वक्तृत्व व वादविवाद मंडळ
विजेते स्पर्धक



महाराष्ट्र राज्याचा १९८८-८९ चा शिवछत्रपती पुरस्कार (खो-खो) मिळाल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. स्वाती कुलकर्णी हिचा श्री. हेमंत टाकळकर (अर्जुन पुरस्कार विजेते) ह्यांच्या हस्ते सत्कार



**कलामंडळ**



**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन साखळी स्पर्धा–'ड' गट विजेता व सुपरलीग स्पर्धेत प्रविष्ट झालेला वरिष्ठ महाविद्यालयीन क्रिकेट संघ**




आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धात सर्वसाधारण
विजेतेपद पटकावणारा वरिष्ठ महाविद्यालयाचा संघ
मार्गदर्शक प्रा. साळुंके यांचेसह




कु. मृदुला दत्तात्रेय फाटक
(एस. वाय. बी. कॉम)
बेस्ट स्टुडंट ट्रॉफी विजेती




कलामंडळ वार्षिक पारितोषिक
वितरण समारंभात प्रसिद्ध
अभिनेत्री सौ. सुहास जोशी
मार्गदर्शन करतांना



रमेश अगरवाल,
(एस. वाय. बी. एस्सी.)
'मॉडर्न श्री' –१९८९–९०.



राकेश पेद्राम, डेहराडून येथील इंडियन मिलिटरी ॲकेडमीत उच्च प्रशिक्षणासाठी निवड




दिलीप पांडे, डेहराडून येथे इंडियन मिलिटरी ॲकेडमीचे प्रशिक्षण पूर्ण करून सैन्यात अधिकारी म्हणून दाखल




कु. प्रज्ञा श्रीधर पोरे, टी. वाय. बी. कॉम. परीक्षेत डिस्टिंक्शनसह प्रथम वर्ग महाविद्यालयात परीक्षेत प्रथम




विनोद फालक, ११ वी सी १९८९–९० चा कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वोत्तम विद्यार्थी




कु. अनीता गोळे पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सर्वोत्तम अभिनेत्री म्हणून कै. माई भिडे पुरस्कार व वाचिक अभिनयाबद्दल राज्यपातळीवरील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक




सतीश विष्णु शिवरकर (द्वि. व. वाणिज्य) व्हॉलीबॉल राष्ट्रीय खेळाडू वैयक्तिक नैपुण्यपद ८९–९०




सुधीर पालांडे (तृ. व. साहित्य) पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय व्हॉलीबॉल संघात निवड




राजेश कळसकर १२ वी कला आंतरराज्य स्तरावर ज्युदो स्पर्धात तृतीय क्रमांक



गणेश गायकवाड (द्वि. व. साहित्य) प. भारत व्हॉलीबॉल संघात निवड



कु. संगीता सोनवणे (द्वि. व. साहित्य) पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय कबड्डी खेळाडू प्रतिनिधी



कैलास बागल (तृ. व. वाणिज्य) चंडीगढ येथील अ. भा. आंतर-विद्यापीठीय क्रॉस कंट्री शर्यतीत सहभाग



कु. वैशाली खेडेकर (११ वी शास्त्र) 'भारतीयम्' साठी निवड. पुणे जिल्हा मैदानी स्पर्धांत वैयक्तिक नैपुण्यपद (८९-९०)




कु. अनीता पारवे (११ वी सा.) महाराष्ट्र राज्य आंतरशालेय कबड्डी स्पर्धेसाठी निवड




कु. वैशाली माळगे (१२ वी शा.) 'भारतीयम्' तसेच दोरीचा मल्लखांब व लेझिमसाठी निवड



कु. सुनीती चौबळ (तृ. व. शास्त्र) विद्यार्थिनी प्रतिनिधी




कु. अनीता रानडे (प्र. व. शास्त्र) क्रिकेट–विद्यापीठ खेळाडू




कु. मंजूषा शहाणे (तृ. व. सा.) अलाहाबाद येथील राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड



कु. भाग्यश्री पारवे (११ वी साहित्य) महाराष्ट्र राज्य आंतरशालेय कबड्डी स्पर्धेसाठी निवड




फैयाज शेख (तृ. व. वाणिज्य) क्रीडा–प्रतिनिधी




कैलास थोपटे (प्र. व. सा.) विद्यापीठ प्रतिनिधी




कु. जयश्री लाड (द्वि. व. वाणिज्य) विद्यार्थिनी प्रतिनिधी



उमेश रावडे (तृ. व. साहित्य)
अलाहाबाद येथील राष्ट्रीय एकात्मता
शिबिरासाठी निवड




कु. विजया धुमाळ (द्वि. व. वाणिज्य)
कबड्डी खेळाडू, पुणे विद्यापीठातर्फे
कोट्टायम येथील स्पर्धेत सहभाग



संदीप भागवत (द्वि. व. वाणिज्य)
विद्यापीठ खेळाडू, युवक
महाराष्ट्र संघात निवड




कु. कविता देशपांडे (द्वि. व. शास्त्र)
पुणे विद्यापीठातर्फे दिल्ली येथील राष्ट्रीय
एकात्मता शिबिरासाठी निवड




राजेश बाठे (द्वि. व. वाणिज्य)
पुणे विद्यापीठातर्फे राष्ट्रीय एकात्मता
शिबिरासाठी निवड



प्रा. वाल्मिकराव अहिरराव–
भूगोलशास्त्र राज्यस्तरीय
समितीवर कार्यकारिणी
सदस्य म्हणून निवड.



प्रा. विनय एम. शेरीकर
'मास्टर इन फिजिकल एज्युकेशन'
(मराठवाडा विद्यापीठ)
या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



श्री. सुरेश रामचंद्र शेवाळे (ग्रंथालय कर्मचारी) समाजकार्याबद्दल
महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्ती

# मराठी विभाग

## प्रा. वसंत कानेटकर व त्यांच्या नाट्यकृती

मोहन शिंदे (प्र. व. वाणिज्य)

मराठीतील प्रथितयश साहित्यिक व नाटककार श्री. वसंत कानेटकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर या गावी झाला. प्रा. शं. के. कानेटकर अर्थात रविकिरण मंडळाचे सदस्य व जुन्या काळचे प्रख्यात कवी ' गिरीश ' यांचे वसंत कानेटकर चिरंजीव. वडिलांनी कवी म्हणून साहित्यक्षेत्रात जसा मानमरातब मिळविला तसाच कानेटकरांनी कथा, काव्य, कादंबरी, नाटक इत्यादी विविधप्रकारचे साहित्य लिहून मिळविला. परंतु नाटककार म्हणूनच ते अधिक प्रख्यात आहेत.

वसंत कानेटकर यांचे बालपण फलटणला गेले. त्यांचे इंटरपर्यंतचे शिक्षण पुण्याच्या फर्गसन कॉलेज-मध्ये झाले. व्यवसाय म्हणून त्यांनी नाशिक येथील हंसराज प्रागजी ठाकरसी महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी केली. नोकरी करीत असतांनाचा ते साहित्या-कडे वळले.

प्रस्तुत लेखात आपण प्रा. वसंत कानेटकरांच्या नाट्यकारकिर्दीवर विवेचन करणार आहोत. नाटक हा कानेटकरांचा आवडीचा व अभ्यासाचा विषय. कॉलेजात शिकत असतांना कानेटकरांनी बालगंधर्वांची नाटके पाहिली; अर्थात ती गंधर्वांच्या उतारवयातील नाटके होती. या व्यतिरिक्त शालेय, महाविद्यालयीन जीवनात स्नेहसंमेलन प्रसंगी कानेटकरांनी अनेक नाटकांतून विविध स्वरूपाच्या भूमिका केल्या नाटुकली देखील लिहिली, आणि भरपूर मोबदल्याच्या अपेक्षेने त्यांनी आकाशवाणीवरही पुष्कळ नाटिका लिहिल्या. परंतु त्यांना व्हायचे होते कादंबरीकार ! त्याच दृष्टीने त्यांनी लिहिलेल्या ' पंख ' व ' पोरका ' या दोन कादंबऱ्यांचे वाचकांकडून झालेले स्वागत पाहून ते उत्साहित झाले आणि त्यांनी ' वेड्याचे घर ' ही कादंबरी लिहिण्यास घेतली. या कादंबरीचा मजकूर ते आपल्या पत्नीला सौ. उषाला सांगत व तो त्या लिहून

घेत. असे काही दिवस गेल्यावर कादंबरीतील संवादांवरील अधिक भर पाहून सौभाग्यवती म्हणाल्या, ' अहो ही कादंबरी नव्हे, नाटक झालं आहे तिचं !' याच सुमारास कानेटकरांनी आर्थर मिलरचे ' डेथ ऑफ अ सेल्समन ' हे नाटक वाचले. दिवास्वप्न पाहणाऱ्या दुभंग व्यक्तिमत्वाच्या व्यक्तीवरचे ते नाटक होते. आणि मग कानेटकरांनी त्याच रात्री नाटक लिहावयास घेतले व एक अंकही पुरा केला. पण नाटक त्यावरच अडखळून राहिले. पुढे १९५६ च्या मे महिन्यात कानेटकर पुण्यास आले असता त्यांची व प्रा. भालबा केळकरांची अचानक गाठ पडली. बोलता बोलता या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनेच्या संस्थापकाने कानेटकरांना एक नाटक लिहिण्याची विनंती केली. एक गोष्ट सांगायची राहूनच गेली. ती ही की, भालबा हे कानेटकरांचे महाविद्यालयीन स्तरावरचे फर्गसन मधील सहाध्यायी.

कॉलेजची सुटी संपवून कानेटकर नासिकला आले व त्यांनी ' वेड्याचं घर उन्हात' हे नाटक झपाट्याने पूर्ण केले. कवि कुसुमाग्रज (नाटककर वि. वि. शिरवाडकर) व ' दाजी ' कर्ते ना. धों. ताम्हनकर यांना नाटक वाचून दाखविले. ते त्या दोघांनाही आवडले. नाटकाची प्रत लागलीच भालबांना पुणे येथे पाठविली. पण बऱ्याच दिवसांनंतर भालबांचे उत्तर आले नाही हे पाहून त्यांना नाटक आवडले नसावे असे वाटून नाटकाचा नाद सोडून ते पुन्हा कादंबरीकडे वळले. तेवढ्यात भालबांकडून पत्र आले. ' नाटक चांगले आहे. प्रयोग करण्याचे ठरत आहे.'

२४ ऑगस्ट १९५७ रोजी पुण्याच्या भानुविलास नाट्यगृहात ( आताचे चित्रपटगृह ) प्रेक्षकांच्या भरपूर उपस्थितीत ' वेड्याचे घर उन्हात ' या नाटकाचा पहिला प्रयोग पी. डी. ए. ने सादर केला. त्यात भालबा केळकर ( खुळा दामू ), जयंत धर्माधिकारी ( पंत ), अरुण जोगळेकर ( चंदू ), श्रीराम खरे ( बापू ), श्रीराम लागू ( दादासाहेब ) यांनी भूमिका केल्या होत्या. दिग्दर्शक भालबाच होते. या नाटकाने प्रेक्षकांची विलक्षण पकड घेतली. १९५७ च्या राज्य नाट्यस्पर्धेत या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला.

' वेड्याचं घर उन्हात ' या नाटकानंतर वसंत कानेटकरांनी ' देवाचं मनोराज्य ' हे दुसरे नाटक १९५८ मध्ये लिहिले. ते P. D. A. तर्फे रंगभूमीवर आले, परंतु नाटकाचा एकंदर विषय प्रेक्षकांना समजला नाही आणि नाटक व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी झाले नाही.

' प्रेमा तुझा रंग कसा ' या त्यानंतरच्या नाटकाने मात्र व्यवसायही चांगला साधला. प्रेमविवाह व त्यामुळे संसारात होणारे संघर्ष व अनुभव यांचे सुरेख चित्रण येथे आले आहे.

शिवाजी व संभाजी या दोघा पिता-पुत्रांच्या संघर्षावर आधारलेले वसंत कानेटकरांचे जबरदस्त गाजलेले व प्रचंड व दीर्घ व्यावसायिक यश मिळविलेले नाटक म्हणजे ' रायगडाला जेव्हा जाग येते.' याच नाटकाने कानेटकरांना नाटककार म्हणून अखिल महाराष्ट्रात कीर्ती मिळवून दिली. यानंतर आलेले वसंत कानेटकरांचे ' दोन ध्रुवावर दोघे आपण ' हे नाटक रंगभूमीवर १९६२ मध्ये आले परंतु या नाटकाचा विषय प्रेक्षकांना फार आकर्षित करू शकला नाही.

कानेटकरांच्या पुढील ' मत्स्यगंधा ' नाटकानेही प्रेक्षकांची चांगलीच पकड घेतली. हे नाटक ' गोवा हिंदू असोसिएशनने' सादर केले. हे नाटक पौराणिक असून संगीतामुळे या नाटकाचा दर्जा खूप उंचावला आहे.

' नाट्य संपदा 'तर्फे आलेली ' मोहिनी ' ( १९६४) व ' अश्रूंचो झाली फुले ' ( १९६६) ही कानेटकरांची नाटके प्रभाकर पणशीकरांनी सादर केली. ' मोहिनी ' आली तशी गेली, परंतु ' अश्रूंची झाली फुले ' या नाटकाने मात्र प्रेक्षकांना अक्षरशः भारावून टाकले. एका वर्षात या नाटकाचे २०० प्रयोग झाले व ' आतमने ओझलमा राखमा ' या नावाने गुजराथी भाषेत त्याचे लागोपाठ १०० प्रयोग झाले. दिग्दर्शक सत्येन बोस व अशोककुमार यांनी ह्या नाटकावर ' आंसू बन गये फूल ' हा हिंदी चित्रपट देखील काढला.

१९६६ मध्ये ' दि गोवा हिंदू असोसिएशन ' तर्फे आलेले ' लेकुरे उदंड जाहली ' हे नाटक एक नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणून गाजले. नाटकातील पात्रे प्रेक्षकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी बोलत नाटक सादर करतात; गद्यगीते हा त्या नाटकाचा आणखी एक विशेष.

श्रीकांत मोघे व दया डोंगरे यांच्या यात महत्त्वाच्या भूमिका होत्या

नंतर १९६८ व १९६९ मध्ये 'इथे ओशाळला मृत्यु' व 'तुझा तू वाढवी राजा' ही वसंत कानेटकरांची नाटके रंगभूमीवर आली. या दोन्ही नाटकांनी व्यावसायिक यश फारसे गाठले नाही परंतु नाटक म्हणून त्यांचा साहित्यिक दर्जा फारच मोठा आहे. 'इथे ओशाळला मृत्यु' या नाटकातील संभाजीची व्यक्तिरेखा प्रेक्षकांचे मन हेलावून टाकते. 'आलमगीर छाटशील तू हे हातपाय, भाजशील तू हा उभा देह, पण हे हातपाय म्हणजे मी नव्हे, की हा देह म्हणजे मी नव्हे ! औरंगजेब, वाऱ्यावर समशेर चालवून वादळाचा शिरच्छेद होत नाही, की पाण्याला पेटते पलिते लावून समुद्राची साल छिलता येत नाही.'

त्यानंतर कानेटकरांची १९६९ साली 'घरात फुलला पारिजात' व १९७० साली 'मला काही सांगायचयं' ही नाटके रंगभूमीवर आली. नंतर काव्यात्मक शैलीत व प्रभावी नाटयमय भाषेत 'मीरा-मधुरा' आले. मात्र वसंत कानेटकरांचे 'मास्तर एके मास्तर' हे नाटक सपशेल पडले. त्यानंतर अलीकडे १९८७-८८ च्या सुमारास आलेले 'गवतास जेव्हा भाले फुटतात' हे ऐतिहासिक नाटकही फारसे पुढे आले नाहीं. त्यानंतर १९८८ मध्ये आलेले 'सोनचाफा' हे संस्थानिकांवर आधारलेले नाटक चांगले चालले व एक वेगळेपण या नाटकाने सांभाळले. यात यशवंत दत्तांची प्रमुख भूमिका होती.

तर ही अशी आहे ढोबळ मानाने प्रा. वसंत कानेटकरांची नाटय लेखनाची यशस्वी वाटचाल !

*

---

## 'लक्ष्य'

त्या रखरखत्या वाळवंटात,
मी चालत होतो
चालता चालता
अडखळत होतो,
धडपडत होतो
तरीही मी चालत होतो
कारण मला लक्ष्य साधायचे होते.
ऊन, मी म्हणत होते,
तहानेने जीव
व्याकूळ झाला होता,
अंग घामाने,
थिबथिबले होते
अंगाची लाही लाही होत होती
तरीही मी चालत होतो
कारण मला लक्ष्य साधायच होते.
त्या विस्तीर्ण वाळवंटात,
मी एकाकी होतो
साथ होती ती फक्त रेतीची !
ते एकाकीपण,
मला गिळू पहात होते,
तरीही मी चालत होतो,
कारण मला लक्ष्य साधायचे होते.
जेव्हा पायांच्या तळव्यांनी
चपलेच्या तळव्यांची
जागा घेतली
तेव्हा, मी माझे
चालणे थांबविले
कारण,
माझे लक्ष्य साध्य झाले होते !

**उमेश दत्तात्रय गांजाळे**
एफ. वाय. बी. एससी.

# गुन्हेगार

संतोष कृ. वाळके (प्रथम वर्ष शास्त्र)

ती कोपऱ्यावरची पोलीस चौकी. गावातील गुन्हेगारांना ताळ्यावर आणणारा एक कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी तेथे आपल्या खुर्चीवर बसलेला आहे या पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे प्रधान, की जे ऐकताच गुन्हेगारांनाही जबरदस्त दहशत बसायची. म्हणून तर आता हे गाव शांत होते. सराईत गुन्हेगारही दबून होते. ब्लॅकलिस्टला नाव असलेला 'चरणही' आता शांत होता. येथील गुन्ह्यांचे प्रमाण रोखण्याचे सारे श्रेय केवळ प्रधानांनाच होते.

असे हे प्रधान आपल्या खुर्चीवर बसून फाईल चाळत असतांनाच चौकीच्या दारात एक वीस वर्षे वयाचा युवक हजर झाला. काळी पँट, काळा शर्ट, हातात रक्ताळलेला चाकू, गौर वर्णाच्या चेहऱ्यावर एक जखम परंतु त्याच्या चेहऱ्यावर मात्र शांत भाव. तो व्यवस्थितपणे प्रधानांच्या समोर येऊन उभा राहिला. इतर पोलिसांना व प्रधानांना काहीच कळेना. सर्वजण त्याच्याकडे एकटक पहात राहिले.

'सर, माझे नाव राजन ! मी एवढ्यातच एकाच्या पोटात सुरा खुपसून आलोय. वार एकच केलाय. तो मेला की नाही ते मला माहीत नाही.

प्रधान– 'अरेस्ट हिम.'

चार–पाच पोलीस त्याला एकदम घट्ट पकडतात.

राजन– 'सर ! मला या पोलिसांनी पकडायची गरज नाही. कारण मी स्वतःच स्वतःला एका विशिष्ट मर्यादेच्या बंधनात नेहमीच पकडून ठेवत असतो. म्हणून तर मी इथे स्वतःहूनच माझा गुन्हा कबूल करायला आलोच. पण मला तुम्हाला काही सांगायचय.'

प्रधानांना काही सुचेनाच. आजवर कित्येक अट्टल अशा गुन्हेगारांची त्यांनी जिरवली होती. मी मी म्हणणाऱ्यांचीही केविलवाणी अवस्था केली होती. पण या केसबाबत कोणतं पाऊल उचलावं हेच त्यांना कळेना. कारण आज अशा प्रकारचा पहिलाच गुन्हेगार त्यांच्यासमोर होता. ते थोडा वेळ त्याच्याकडे पहातच राहिले. मग थोडा विचार करून त्यांनी पोलिसांना राजनला सोडायला सांगितले.

प्रधान– 'राजन ! सांग तुला काय सांगायचय ते.'

राजनने प्रथम हातातील रक्ताळलेला सुरा खाली ठेवला.

राजन– 'सर, माझा हा पहिलाच गुन्हा आहे. हा गुन्हा मी केला नसून माझ्याकडून घडला आहे. सर, मी हा वार चरणवर केला आहे.'

प्रधान– 'ओह, चरण ! त्याची तर मी इथ आल्यापासून वाट पहातोय की कधी तो एखादा गुन्हा करील व मी त्याला माझा हिसका दाखवीन. त्याच्या नावावर २०–२५ बेकार केसेस आहेत.'

राजन– 'मला माहीत आहे सर ! पण केवळ तुम्ही इथे आहात म्हणून तर तो इतके दिवस गप्प होता. पण त्याच्यातली गुर्मी गप्प नव्हती.'

प्रधान– 'पण हे झालं कसं ?'

राजन– 'तेच तर तुम्हाला सांगतोय सर. मी व माझे चार–पाच मित्र आमच्या जवळील चौकात गप्पा मारत एकाबाजूला उभे होतो. तेवढ्यात हा जोरात

गाडीवरून आला. मी चपळाईने बाजूला झालो म्हणून उडता उडता वाचलो नाहीतर माझे काही खरे नव्हते. म्हणून मी खवळून त्याला आवाज टाकला, 'काय रे दिसत नाही का ?' हा पठ्ठा स्वत:ला किंग समजत होता. वळून परत माझ्याकडे आला.

चरण– 'क्या बे, क्या बोला ?

राजन– 'काय दिसत नाय का ? उडलो असतो तर ?'

चरण– 'साल्या जगायचंय का तुला ?'

राजन– 'अरे जा. स्वत:ला काय समजतोस तू ? मनात आलं तर तुला पण संपवीन मी. पण मला फाल्तुगिरी नाही आवडत. तू तिकडे कितीपण दादागिरी कर. पण माझ्या वाटेला गेला तर मी पण कमी नाही. लक्षात ठेव.'

'एवढं ऐकेपर्यंत त्याचाही पारा बराच चढला होता. तो मला मारायला लागला. मग मीही त्याला प्रत्युत्तर देऊ लागलो. त्याच्या ठोशा बरोबरच माझेही त्याला सणसणीत ठोसे बसत होते. आमच्यात बरीच मारामारी झाली. शेवटी त्याने वैतागून गुप्ती काढली व माझ्यावर एक उभा वार केला. पण मी तो चपळाईने हुकवला व शेजारच्या खांबावर माझं थोडं डोकं आपटलं. तो आता दुसरा वार करण्याच्या तयारीत होता. एवढ्यात शेजारून एक फळवाला गाडी घेऊन चालला होता. त्याच्या गाडीवर हा सुरा होता. तो चपळाईने मी उचलला व तो माझ्यावर वार करण्याआधीच मी हा सुरा त्याच्या पोटात खुपसला. त्याच्या हातातील गुप्ती वरचेवर तशीच राहून खाली कोसळली. त्याचबरोबर चरणही खाली कोसळला. मी तसाच सुरा घेऊन इथे आलोय. आणि तुम्हाला आता एवढंच सांगायचंय की मी जर त्याच्यावर वार केला नसता तर मेलोच असतो. माझी स्वप्नं मेली असती, माझं करिअर मेलं असतं, माझ्या आईवडिलांनाही माझ्याशिवाय कोण आहे ? त्यांची म्हातारपणाची काठीही मेली असती. आणि दुसरं म्हणजे चरणला अजून जास्तच माज चढला असता आणि समाजाला त्याचा अजून जास्तच त्रास झाला असता. तुम्ही त्याला शिक्षा करणार तो गुन्हा घडल्यावर पण त्या शिक्षेने त्याने केलेला गुन्हा हा कधीच भरून न येणारा असतो. म्हणून माझ्या मते मी त्याला जागेवरच शिक्षा करून एकप्रकारे माझ्या दृष्टीने बरंच केलंय.'

'दुसरं एक सांगायचं म्हणजे, सर ! तुम्ही साऱ्या गावात विचारा मी कसा आहे ते. तुम्ही मला काय शिक्षा करायची ती करा. मला मान्य आहे पण तुम्ही माझ्यावर केस नोंदवू नका. मला मान्य आहे की मी गुन्हा केलाय पण तुम्ही जर माझ्यावर केस नोंदवलीत तर तिचा भावी आयुष्यात मला फार त्रास होणार आहे. कदाचित प्रत्येक नोकरी मिळण्याच्या वेळेस मला या केसचा त्रास होईल. आणि तुम्हाला तर माहीत आहे की आजकाल नोकऱ्या मिळणं किती कठीण आहे ते. म्हणून तर शालेय जीवनापासून ते आत्तापर्यंत मी कधीच डिस्टिंक्शन सोडलेलं नाही. आणि तरीही तुम्ही माझ्यावर केस केलीत तर माझ्याकडे फक्त दोनच मार्ग राहतील.'

'त्यातला पहिला म्हणजे ही केस विसरून नेहमीप्रमाणेच चांगला अभ्यास ठेवून चांगली नोकरी मिळवण्याचा प्रयत्न. हा पहिलाच मार्ग प्रथम मी स्वीकारीन पण ज्या ज्या वेळेस माझ्या प्रत्येक नोकरीत ही तुमची केस अडचण म्हणून येईल तेव्हा मग दुसरा मार्ग.'

'आणि ह्या दुसऱ्या मार्गात मी एक बेकार म्हणून असेन. जीवनात जगायला काहीच शिल्लक नसेल. मग जीवावर उदार होईन, मरायला तयार होईन आणि म्हणूनच माझ्याकडून भयानक गुन्हेगारी सुरू होईल. मग काळ्या बाजाराने व हप्ते गोळा करूनच मी माझे जीवन जगेन.'

'म्हणून मला तुम्हाला एवढंच सांगायचंय सर, की माझ्यासारख्या एका हुषार विद्यार्थ्याला भावी आयुष्यात गुन्हेगार बनवायचे की नाही हे देवाच्याही हातात नसून केवळ तुमच्याच हातात आहे.'

इन्स्पेक्टर प्रधान पापणी न पडता एकटक त्या युवकाकडे पहात व ऐकत होते. एक विचित्रच गुन्हेगार त्यांच्यासमोर उभा होता.

प्रधान–'तुला काय व्हायची इच्छा आहे राजन ?'

राजन–'सर ! आपल्यासारखाच एक कीर्तिवंत व कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी.'

प्रधानांनी थोडा विचार केला व पोलिसांना राजनला कोठडीत बंद करण्यास सांगितले. नंतर

प्रधानांनी गावातून राजन व चरणविषयी माहिती मिळवली. चरण दवाखान्यात होता, वाचला होता. पण तरीही त्याने पोलीस चौकीत तक्रार केली नव्हती. कारण त्याच्या घरच्यांनाही आपला दिवटा कसा आहे हे माहीत होते व केस केली तर तर आपणच गोत्यात येऊ हे ते जाणून होते.

राजन एक हुषार विद्यार्थी म्हणून शालेय-जीवनापासूनच प्रसिद्ध होता. तो कविता व कथाही चांगल्या लिहीत होता. तसेच उत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणूनही प्रसिद्ध होता. गावातील त्याच्या शालेय शिक्षकांनीही त्याच्याबद्दल एवढच सांगितलं की त्याच्यासारखा हुषार तोच. आपल्या प्रचंड आत्मविश्वासाच्या बळावर तो मनात आणेल ती गोष्ट करू शकतो. तसेच हा कोणालाही न घाबरणारा व मोठ्यांचा आदर करणारा असून तो प्रत्येक गोष्ट योग्य तीच व योग्य विचारानेच करतो.

दुसऱ्या दिवशी सकाळीच पोलीस राजनच्या कोठडीकडे गेला. राजन शांतपणे एकटक कुठेतरी पहात कसला तरी विचार करत बसला होता.

पोलीस–' राजन.'

राजन एकदम शुद्धीवर आला.

पोलीस–' तुला साहेबांनी बोलवलय.'

राजन त्याच्या मागोमाग गेला.

प्रधान–' तुला मी सोडलंय. चरणने तुझ्यावर केसच नाही नोंदवली. आणि जरी नोंदवली असती तरी तुला सोडून द्यायचंच मी ठरवलं होतं.'

राजनच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. तो पटकन् खाली वाकला व प्रधानांचे पाय पकडले.

प्रधान–' अरे राजन हे काय ?'

राजन–' सर, तुम्ही आज मला समजून घेऊन मुक्त केलंय सर. मला एक जीवदानच दिलंय सर. खरंच सर, मी तुमचे उपकार जन्मातही विसरणार नाही. आता मी दुप्पट आत्मविश्वासाने माझं करिअर पूर्ण करीन व मगच तुमच्याकडे येईन. खरंच सर, मी तुम्हाला कधीच विसरणार नाही.

प्रधान–' पण राजन, चरणने केस नाही नोंदवली तरी तू इथे कशाला आलास ?'

राजन–' सर मला चांगले माहीत होते की तो माझ्यावर केस नोंदवणार नाही. कारण त्याच्या 'Black List' नेच त्याला परत गोत्यात आणले असते. पण तरीही मी इथे आलो कारण मी तुम्हाला पहिलेच सांगितलेय सर, की मी स्वतःच, स्वतःला एका विशिष्ट मर्यादेच्या बंधनात पकडून ठेवत असतो. आणि दुसरं म्हणजे लोकांचा माझ्यावर असलेला स्वच्छ, निर्मळ विश्वास. मी जर इथे आलो नसतो तर लोकांना वाटले असते की मीही आता मारामाऱ्या, गुन्हेगारी करू लागलोय. पण आज मी इथे माझा गुन्हा कबूल करून माझे बंधन व लोकांचा स्वच्छ विश्वास परत जतन केलाय, सर ! आता मी जातो सर, पण मी तुम्हाला कधीच विसरणार नाही. परत तुम्हाला भेटेन ते जीवनात यशस्वी झाल्याचे पेढे घेऊनच.'

राजन निघून गेला. त्याच्या मागोमाग चार वर्षेही निघून गेली. या काळात प्रधानांची बदली होऊन पुन्हा आज ते याच चौकीवर आले होते. पण राजनला मात्र ते अजूनही विसरले नव्हते. आज त्याच चौकीवर, त्याच खुर्चीवर ते केस-फाईल चाळत होते. एवढ्यात त्यांना आवाज आला ' सर !'

त्यांनी फाईल बाजूला सारून समोर पाहिले तर इन्स्पेक्टरच्या ड्रेसमधला एक तरुण उभा. प्रधानांचे त्याकडे लक्ष जाताच त्याने त्यांना एक ' सॅल्यूट ' मारला. प्रधानांनी त्याकडे नीट निरखून पाहिले व चटकन त्यांच्या लक्षात आले, चार वर्षांपूर्वी हातात रक्ताळलेला चाकू घेऊन उभा असलेला राजन आज हातात मिठाईची बॉक्स घेऊन उभा होता.

प्रधान–' राजन !'

राजन–' यस सर ! बरोबर ओळखलंत. तुमचा खूप तपास केला. शेवटी कळलं की तुम्ही परत इकडेच आहात म्हणून सर ! तुम्हाला आता तीन पेढे द्यायचेत.'

प्रधान–' तीन !'

राजन–' हो तीन !'

पहिला– तुम्ही मला खऱ्या मनाने समजून घेतल्याने मी माझे इष्ट ध्येय गाठू शकलो म्हणून.

दुसरा– माझे लग्न पुढच्या आठवड्यात आहे म्हणून. आणि

तिसरा– या कथेसाठी सर ! मला या कथेला प्रथम पारितोषक मिळालंय. प्लीज सर ! माझी फार इच्छा आहे की ती तुम्ही आत्ताच वाचावी.

प्रधानांनी ती कथा वाचली. सर्व कथा त्यांची व राजनच्या घडलेल्या केसचीच होती. प्रधानांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. ते उठून पुढे आले. राजन त्यांच्या पाया पडणार पण त्या आधीच त्यांनी त्याला ओढलं व छातीशी धरलं.

प्रधान–'राजन मी आज फार खूष आहे. मला तुझ्यासारख्या युवकांचा फार अभिमान आहे.'

राजन–'पण सर, याचे सर्व श्रेय तुम्हालाच आहे. बरं सर ! मी निघतो आता. लग्नाची तयारी करायची आहे. ही घ्या पत्रिका आणि हो लग्नाला जरूर–जरूर यायचे; नाहीतर त्या दिवशी मी लग्न सोडून तुमच्याकडे येईन. मला तुमचे भव्य स्वागत करून सर्व लोकांना अभिमानाने सांगायचंय की आज मी जो यशस्वी आहे तो केवळ आपल्यामुळेच.'

प्रधान–'हो राजन ! मी नक्की नक्की येणार !'

राजन–'अच्छा सर निघतो मी. I will wait.'

राजन निघून गेला होता. पण तो गेला होता तरी ते त्याच्याच वाटेकडे डोळे लावून बसले होते. आपण आज एका गुन्हेगारास समजावून घेऊन त्याचं जीवन यशस्वी केल्याबद्दल इन्स्पेक्टर प्रधान अतिशय समाधानी होते.

*

---

# नाती-गोती

नाती-गोती समाजात असतात
युगे अन युगे तीच जपायची असतात
नाती असतात दोन प्रकारची
रक्ताची नि मानलेली.
रक्ताची नाती तुटत नाहीत
अन् मानलेली नाती सोडवत नाहीत
रक्ताची नाती शेवटपर्यंत रक्ताचीच राहतात
अन् मानलेली नाती रक्ताची बनतात
अशी ही नाती लोणच्याच्या फोडीसारखी असतात
आणली तर तोंडाला चांगलीच चव आणतात
नाहीतर खोकल्याने बेजार करून टाकतात.

कु. अनीता अरविंद आंब्रे
१२ वी साहित्य

# शब्द

कधी शब्द सुकून जातात
निष्प्राण होऊन आतच पाचोळतात
कधी शब्द फुलून येतात
फुलपाखरासारखे भिरभिरत राहतात
कधी शब्द खट्याळ होतात
ओठांपेक्षा डोळ्यांतच खुलतात
कधी शब्द रुसून बसतात
फुगऱ्या गालात फुगून बसतात
कधी शब्द बोचरे होतात
नको असतांना मनात सलतात
कधी शब्द शस्त्र होतात
मनावर आघात करत रहातात.
कधी शब्द मुके होतात
न बोलता सांगून जातात.

कु. माणिक सूर्यवंशी
तृ. व. साहित्य

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुका ( १९९० ) –एक विश्लेषण

कु. सुषमा वि. कुलकर्णी (द्वितीय वर्ष साहित्य)

आठ राज्ये आणि केंद्रशासित पाँडेचरीमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये देशाचे राजकीय चित्र पालटले. १९८५ ची लाट आता विरून गेली आहे; प्रवाह काँग्रेसविरोधी आहे. बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश, गुजरात व ओरिसातील काँग्रेसचे किल्ले एका पाठोपाठ एक जमीनदोस्त झाले. पाँडेचरी आणि मणिपूर येथील लढत तुल्यबळ झाली. या सर्व कुरुक्षेत्रात काँग्रेसचा एकमेव गड वाचला, तो म्हणजे महाराष्ट्र !

महाराष्ट्रातही काँग्रेसच्या बालेकिल्ल्याची, बुरुजांची पडझड झाली. परंतु गड हातातून गेला नाही. याचे श्रेय मुख्यमंत्री श्री. शरद पवारांनाच द्यावे लागेल. १९८५ मध्ये काँग्रेस ( आय ) सत्तेवर आला तेव्हा त्यांचे संख्याबळ १६२ होते. श्री. शरद पवार यांच्याबरोबर समाजवादी कॉन्ग्रेसने ( ५४ सदस्य ) प्रवेश केल्यावर सत्तारूढ पक्षाची संख्या २१६ झाली. निवडणुकीच्या आधी विधानसभेत त्यांचे २८८ पैकी २१२ सदस्य होते. यावेळी काँग्रेस ( आय. ) ला १४१ म्हणजे १९८५ पेक्षा ७१ जागा कमी मिळाल्या.

**पक्षीय बलाबल**

| मतदार संघ | काँग्रेस (आय) | भा ज प शिवसेना | जनता दल | मा. क. प. | शे. का. प. | काँग्रेस (एस्) | अपक्ष | मुस्लिम लीग | भा क प. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण (३१) | ९ | १६ | २ | १ | ३ | – | – | – | – |
| मुंबई (३४) | ९ | २४ | – | – | – | – | – | १ | – |
| उ. महाराष्ट्र (४९) | ३० | ११ | ५ | १ | – | १ | १ | – | – |
| विदर्भ (६६) | २५+१ | २२ | १० | | – | – | ७ | – | १ |
| मराठवाडा (४६) | २३ | १६ | ३ | – | ३ | – | – | – | १ |
| प. महाराष्ट्र (६२) | ४५ | ५ | ५ | १ | २ | – | ४ | – | – |
| एकूण २८८ | १४१+१ | ९४ | २५ | ३ | ८ | १ | १२ | १ | २ |

या तक्त्यावरून स्पष्ट होते की १४१ सदस्य, रिपब्लिकन पक्षाचा एक व बारा अपक्ष यांच्या पाठिंब्यावर कांग्रेसचे सरकार चालणार आहे. साध्या बहुमतापेक्षाही ( १४५ ) कांग्रेसला चार जागा कमी मिळाल्या आहेत.

कांग्रेस ( आय ) ला पश्चिम महाराष्ट्रात भरघोस पाठिंबा मिळालेला दिसतो. मागील निवडणुकीपेक्षा फक्त दोन जागा कमी मिळाल्या. या यशामागे प्रामुख्याने साखर कारखाने, कांग्रेसचे या भागातील कार्य, तसेच पक्षसंघटनेची उत्तम बांधणी ही कारणे आहेत. याउलट मुंबई– कोकण भागात कांग्रेस ( आय ) ला खूपच हादरा बसलेला दिसतो. प्रामुख्याने भा. ज.प.–शिवसेना युतीने या भागात चांगले स्थान मिळवलेले आहे. याचे कारण म्हणजे कांग्रेस ( आय ) चे या भागातील पक्षसंघटनेचे अपयश, कांग्रेसमधील बंडखोरी व हिंदुत्वाची लाट आणि सेना–भाजप युतीचा प्रभावी प्रचार हेच म्हणावे लागेल. विदर्भातही थोडया फार याच कारणांमुळे कांग्रेसला अपयश आलेले दिसते. परिणामी कांग्रेस ( आय ) पुढे या युतीच्या रूपाने प्रभावी विरोधी पक्ष विधानसभेत प्रथमच उभा राहिला आहे.

थोडक्यात, महाराष्ट्राच्या मतदारांनी श्री शरद पवार यांच्या पक्षाला स्पष्ट बहुमत दिलेले नाही; हे खरे असले तरी स्पष्ट बहुमत अन्य कोणत्याही पक्षाला व आघाडीला दिलेले नाही. त्यामुळे सर्वांत मोठा पक्ष म्हणून श्री. पवारांना प्रथम संधी दिली गेली आणि पवारांच्या नेतृत्वाखाली संमिश्र सरकार स्थापन झाले. संमिश्र सरकार म्हणण्याचे कारण असे की, इंदिरा कांग्रेस, महाराष्ट्र इंदिरा कांग्रेस, आणि अपक्ष गट अशांचे मिळून कामचलाऊ बहुमत निर्माण झाले असून श्री. पवार हे सर्वांत मोठ्या गटाचे नेते म्हणून मुख्यमंत्री बनले. शांत चित्ताने विश्लेषण करतांना आता श्री. पवार मुख्यमंत्री झाले आहेत ही वस्तुस्थिती मान्य करूनही असे म्हणावे लागेल की, महाराष्ट्राच्या जनतेने इंदिरा कांग्रेसला नाकारले आहे. केवळ सांसदीय लोकशाही पद्धतीची अपरिहार्यता म्हणूनच सर्वात मोठ्या पक्षाला मंत्रिमंडळ बनवण्याची प्रथम संधी द्यायची, या संकेताच्या अनुसार इंदिरा कांग्रेसला ती संधी मिळाली आहे.

कांग्रेस (आय) ची आजची स्थिती ही विजयी पक्षाची नाही. महाराष्ट्रातील कांग्रेस (आय) ची सत्ता पाच वर्षांसाठी म्हणून आली असली तरी त्या पाचपैकी प्रत्यक्षात किती वर्षे किंवा महिने ती टिकते हे पहायचे ! कारण १४५ ही अतिमहत्त्वाची किमान संख्या गाठू न शकलेले हे सरकार म्हणजे अल्पमतातील सरकार, म्हणजेच तकलादू बहुमताचे दुबळे सरकार ! महाराष्ट्राच्या नशिबी संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने- नंतर प्रथमच इतके दुबळे सरकार आले आहे. १९७८ साली काहीशी अशीच परिस्थिती होती, पण त्याहून आजची परिस्थिती अधिक जिकिरीची आहे.

याउलट भाजप–शिवसेना युतीने जे यश मिळवले ते सर्व टीकाकारांना चकित करणारे आहे.

जनता दलाला अनेक घटक अनुकूल होते. शेतकरी संघटना आणि कामगार आघाडी जनता दलाच्या मदतीला होती. कांग्रेसमधून अनेक नेते फुटून जनता दलात निवडणुकीच्या तोंडावर आले होते. केंद्रातही जनता दलाचेच सरकार ! पंतप्रधानही प्रचारासाठी उपलब्ध ! इतकी अनुकूलता असूनही जनता दलाला फक्त २५ जागा मिळाल्या.

तसेच या निवडणुकीत कामगार आघाडी नामशेष झाली. रिपब्लिकन खोब्रागडे व आंबेडकर गटांना एकेक जागा मिळाली, पण रिपब्लिकन पक्ष (शरद पवार गटाचा) भोपळा फुटला नाही. शेकाप १३ वरून ८ वर घसरला. या पार्श्वभूमीवर भाजप १६ वरून ४२ आणि शिवसेना २ वरून ५२ ही झेप देदीप्यमान खरीच ! युतीला सत्ता न मिळताही मिळालेले यश प्रचंड आहे. भाजप सेना युती सत्तेवर आली नाही म्हणून युतीचा पराभव झाला असे म्हणणारे खुशाल म्हणोत. परंतु अन्य राजकीय पक्षांचा इतिहास पहाता युतीचा मोठाच विजय झाला आहे ! सत्तारूढ पक्षाला बहुमतापर्यंत पोहोचू दिले नाही. आणि सत्तारूढ पक्षाच्या ⅓ जागा जिंकल्या ही विजयाचीच चिन्हे आहेत. शिवाय महाराष्ट्र विधानसभेत १९५७ नंतर प्रथमच खणखणीत, प्रभावी, आक्रमक, तरुणांचा भरणा असलेला विरोधी पक्ष बसणार आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्ट्या

...२

तो पर्यायी पक्ष ठरणार आहे. आणि श्री. शरद पवारांची दुर्बल सत्ता या समर्थ विरोधी पक्षाला कसे तोंड देते हे पहाणे रोमहर्षक ठरणार आहे.

आता सत्तारूढ काँग्रेस (आय) पक्षाचे आतले चित्र कसे आहे ते पाहू. विधिमंडळ काँग्रेस (आय) पक्षात अनेक नाराज नेते आहेत. शिवाय मंत्रिमंडळात वर्णी न लागलेले नाराज असणारच. पवारांनी आपल्या कार्यशैलीप्रमाणे पहिले अधिवेशन सुरळीत पार पाडण्यासाठीच अधिवेशनानंतर १७ मंत्री घेण्यात येतील असे जाहीर केले. हेतू हा की त्या सतरांमध्ये आपली वर्णी लागेल या आशेने सगळेच्या सगळे म्हणजे १३० आमदार स्वस्थ रहावेत. म्हणजे पावसाळी अधिवेशनापर्यंत तरी पवार सरकार टिकेल; तोपर्यंत सर्वांचा राग काढला जाईल आणि सरकार पाच वर्षांच्या दिशेने वाटचाल करू लागेल. शरदराव चाणाक्ष आहेत, ते काहीही करू शकतील. परंतु बाळासाहेब ठाकरे जे बोलले त्यात खरोखर तथ्य असेल तर ते गंभीर आहे. शरद पवारांच्या मागे काँग्रेस (आय) चे १४१ व अपक्ष ८ असे १४९ आमदार आहेत. त्यात वसंतदादा गटाचे सुमारे ३० आहेत तर विदर्भातील ७ व मराठवाड्यातील ११ हे कट्टर पवारविरोधी आहेत. राजीव फोर्सचे ३० सुद्धा पवार विरोधीच आहेत. तेव्हा ५० पवारगट, ३० दादागट, ४८ पवार विरोधी गट आणि १२ ते १५ तटस्थ अशी पवारांच्या विधानसभा पक्षाची रचना आहे.शरदरावांना या सगळ्यांना सांभाळून राज्य चालवायचे आहे.

१९७८ साली ३२ आमदार घेऊन स्वत: शरद पवार दादा-तिरपुडे मंत्रिमंडळातून बाहेर पडले व जनता पक्षाबरोबर पुलोद स्थापन करून ते मुख्यमंत्री झाले. आता पवारांच्या एखाद्या सहकाऱ्याने पवारांचाच १२ वर्षांपूर्वीचा कित्ता गिरवला तर? तर पवारांना काव्यात्मक न्याय मिळेल, आणि असे करणाऱ्याला पवार दोष देऊ शकणार नाहीत. मोगलाईत विश्वास-घाताबद्दल जसे कोणालाच सोयरसुतक नसे तसेच काँग्रेस संस्कृतीचे आहे. त्यामुळे पवार पाच वर्षे म्हणून सत्तेवर आले आहेत ती सत्ता कदाचित ५ वर्षे टिकेलही किंवा अल्पजीवीही ठरेल !

❋

# सहज मनी विचार आला !

अशाच एका संध्याकाळी
मी पाहिलं मावळणाऱ्या सूर्याला
त्याकडे पहाता, मनी माझ्या विचार आला
सकाळी होता शांत एवढा
जसा बालपणात मग्न होता
ऊन सावलीच्या खेळामध्ये
पाठशिवणीचा खेळ खेळत होता.
दुपारी निखाऱ्याप्रमाणे
रखरखीत तळपत होता
सहज मनी विचार आला,
तारुण्यातील दु:खांना तोंड तो देत होता
शोधत होता चांदणी तो
आगीत त्या तळपत होता.
पण
तोच का हा मावळता सूर्य
बघता याला विचार आला
वाटले वृद्ध झाला हा आता
जीवनाच्या शेवटच्या क्षणाला
तो हसतमुखाने जात होता
या तळपत्या सूर्याचा, क्षणात एका अंत झाल
सहज मनी विचार आला

कु. अनीता विजय भोसले (१२ वी साहित्य)

❋

# ‘ देव चालले ’ ( ग्रंथ परिचय )

प्रोरे बी. व्ही. (द्वि. व. साहित्य)

ज्या वेळी ‘ देव चालले ’ हे पुस्तक वाचण्यासाठी घेतले तेव्हा मनात बरेच तर्क-वितर्क चालले होते. पुस्तकाच्या शीर्षकावरून तरी पुस्तक खूप जुनें असेल व सध्याच्या संगणकाच्या युगात हे वाचायला आवडेल का ? असे मनात येऊन गेले. परंतु मी थोडेफार देवाला मानतो म्हणून पुस्तक वाचायला घेतलेच. लेखक दि. बा. मोकाशी यांचे वाचायला घेतलेले पहिलेच पुस्तक म्हणून प्रस्तावना वाचली. प्रस्तावना वाचतानाच पुस्तकाने एक प्रकारे घर केले व पुस्तक वाचून काढायचेच हा विचार मनात ठाण मांडून बसला.

पुस्तक वाचतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे कथेतील चौघेही भाऊ जरी एकत्र आले असले तरी ते मनाने खूप दूर गेले होते. चौघांचेही मनसुबे अत्यंत वेगळे होते. आबा हा सर्वांत थोरला होता, परंतु तो पैशाच्या मागे लागला होता. तो बऱ्यापैकी पैसा बाळगून होता. परंतु बाकीचे भाऊ पैसा मिळवण्याच्या पाठीमागे हात धुऊन लागले होते. कोणाचाही देवावर खरा विश्वास नव्हता. फक्त रामू हा देवभक्त होता. कोणी आपल्या फायद्यासाठी मारुतीचा भक्त होण्याचा विचार करत होता. परंतु यातून असे दिसून येते की सर्व पुस्तक वाचतांना एकदाही धर्मग्रंथ वाचण्याचा संदर्भ नाही. म्हणूनच देव बदलण्याचा खटाटोप दिसून येतो. परंतु जर का ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथाचे वाचन असते तर असे विचार आलेच नसते. कारण ज्ञानेश्वरीत सांगितल्याप्रमाणे कोणत्याही देवाची भक्ती, पूजा केली तरी ती एकाच देवाला म्हणजे श्रीकृष्णालाच अर्पण होते. परंतु यात असे काहीच दिसत नाही, रामू हा अत्यंत गरीब असा भाऊ. त्याच्या येण्याने कोणालाच आनंद झालेला दिसून येत नाही. कारण त्याच्याकडे पैसा नाही. नरहरी देवावर त्याची भक्ती आहे. त्याला देव येथून आबाकडे जावेत असे वाटत नाही. कारण आबा हा पैसेवाला आहे. तसेच जगू व नरू या दोघांनाही देवा बद्दल काही वाटत नाही. उलट नरूला हरिकाकांनी सांगितल्याप्रमाणे देवाच्या खाली पुरून ठेवलेले धन काढण्यासाठी घाई झाली आहे. ते धन वडिलांनी रामूसाठी ठेवलेलं आहे हे माहीत असून सुद्धा तो ते पैसे आपल्या धंद्यासाठी लावण्याची धडपड करीत आहे. आणि रामू आपल्या गरिबीची वडिलांना सुद्धा कीव यावी म्हणून हमसून हमसून रडतो. त्यांचा वेळ सुद्धा वाड्यात जात नाही. म्हणून सर्व भाऊ जुन्या वस्तू काढतात. परंतु रामू हा जाणकार व घराची आस्था असणारा असल्यामुळे माळ्यावरील नांगर व बाकीची हत्यारे काढून सर्व माळा साफ करतो. कपडे काढून आपल्याला किती दिवस टिकतील याचा विचार करून ते कपडे तो आपल्याबरोबर घेतो व कपड्यांवर होणारा पुढील खर्च टाळण्याचा प्रयत्न करतो. परंतु बाकीचे तसे काहीच करीत नाहीत.

रामूला देवांप्रमाणेच घराबद्दलही खूप आस्था आहे. पडणारे घर थोडीशी डागडुजी करून नीट उभे करू व येथून पुढे कधीही सुटीत येऊन राहू अशी व्यवस्था करण्याची त्याची इच्छा आहे. परंतु हे त्याच्या तिन्ही भावांना मान्य नाही. यावरून त्यांची घराबद्दलची अनास्था दिसून येते.

शेवटी देव जाण्याचा दिवस उजाडतो व देवाची पूजा करून देव जाण्याची तयारी होते. या संदर्भात देव जाईपर्यंत प्रत्येक व्यक्तीचे मनोगत, गावकऱ्यांचे त्यांच्या घरातील देवाबद्दल असणारे प्रेम, भक्ती यांचे लेखकाने अतिशय चांगल्या प्रकारे वर्णन केले आहे. जगूचे शांतीबद्दलचे प्रेमही अतिशय चांगल्या प्रकारे दाखविले आहे. तसेच संन्यासी काकांबद्दल सर्वांचे अनादराचे वर्णनही लेखकाने समर्पकपणे केले आहे. पुस्तक अतिशय हृद्य व चांगल्या प्रकारे लिहिले आहे. ते वाचून आपल्याला अगदी निराळाच अनुभव येतो.

*

## झंकार (गझल)

झेलले हासून सारे वार मी
घेतली नाही कधी माघार मी
स्पंदनांची वाढली तेव्हा गती...
ऐकला जेव्हा तुझा होकार मी
आपुले नाते कधी जुळणार का ?
चंद्रमा तू, आंधळा अंधार मी
वेचली होती जिथे मागे फुले
वेचतो आता तिथे अंगार मी
पूर तेव्हा ओसराया लागला
पोचलो जेव्हा नदीच्या पार मी
जी कधीही छेडली नाहीस तू
त्याच वीणेचा मुका झंकार मी

प्रदीप कुलकर्णी (तृतीय वर्ष, वाणिज्य)

*

## पोरका

वाऱ्यावावधानाच्या भितीनं
इसाव्याला छपराखाली गेलो
छप्पार उडून ग्यालं पक्षावानी
म्होरचच हिरवं झाड
इज पडून काळं पडलं
तसाच लेंगा धरून
चिखलातून देवळाकडं पळालो
काटं मोडून पायाची चाळण झाली
चिखलाची काळी वाट लाल झाली
देवाळ तरी काय...... ?
पावसाच्या पाण्याबरूबर माती वगळून यायची
शेंदराच्या दगडाला हात म्या जोडलं
अन् तसाच एका दगडाला टेकून पडून ऱ्हायलो
तापलेल्या मातीचा अंगाव आला
अन् मला माह्या मायची याद आली

विक्रांत ढवळे (तृ. व. शास्त्र)

*[ ६३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी निवड. व शांता शेळके पुरस्कार श्री. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पुरस्कार (देहूगाव) मिळालेली कविता. ]

*

# प्राणिशास्त्र विभागाची कारवार अभ्यास–सहल

कु. इंद्रायणी गोडबोले (तृतीय वर्ष प्राणिशास्त्र)

कोठेही जायचं ठरल्यानंतर सगळ्यांकडून एकच प्रश्न विचारला जातो. 'तिथे काय आहे ?' तसं म्हटलं तर हा प्रश्न चुकीचा नाही. कारण नवीन ठिकाणी जातांना काहीतरी बघायलाच जायचं अशी आपली दृढ कल्पना असते. 'कारवार'ला जातांना तिथले समुद्री प्राणी बघायला जायचं, त्याचबरोबर तिथल्या निसर्गाची विशालता अनुभवायला जायचं हे ठरलेलं होतं.

महाराष्ट्र सोडून कर्नाटकात प्रवेश केला की लगेचच एक गोष्ट नजरेस येते ती म्हणजे लाल माती. कारवार हे उत्तर कर्नाटकातील विशाल समुद्र किनारा लाभलेलं गाव आहे. ते जिल्ह्याचं ठिकाण आहे. कारवारमध्ये रहाण्यासाठी बरीच हॉटेल्स, लॉजेस आहेत. एकंदरित गाव बरंच सुधारलेलं आहे. पण शहरीपणा कमी असल्याने छान वाटलं. तिथल्या जेवणात भात, सांबार, भाजी, पोळी, मासे किंवा चिकन असे पदार्थ असतात. तिथले लोक अगत्यशील व बोलण्यास उत्सुक होते. तसा भाषेचा प्रश्न फारसा कोठे आलाच नाही.

कारवारचा समुद्र हा अगदी मस्त आहे. कुठल्याही तऱ्हेचं प्रदूषण नसलेल्या त्या ठिकाणी समुद्राची विशालता जाणवते व उपनिषदांची आठवण येते की पाण्यातूनच सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली आहे व शेवटी सर्व पाण्यातच येऊन मिळणार आहे.

कारवारमध्ये संध्याकाळी म्हणजे सूर्यास्ताच्या वेळी व नंतर समुद्रात व आकाशात रंगांची जी उधळण झाली होती ती कागदावर उतरवायला चित्रकारही अपुरा पडेल. लाटालाटांवर होणारे लक्षलक्ष सूर्यांचे दर्शन, क्षणाक्षणाला नवीन छटा धारण करणाऱ्या विलोभनीय रंगसंगती, व निसर्गाची ही विविधअंगी विशालता कॅमेऱ्याच्या त्या छोट्या पेटीत किती साठवणार ? ती डोळ्यात साठवून घेणे हा येवढा एकच उपाय होता. समुद्री हरितवर्णाच्या किती अनंत छटा असू शकतात, गडदनिळा समुद्र किती विलोभनीय असू शकतो हे इथे बघायला मिळते.

येथे समुद्रातल्या जलचर सृष्टीचे आपल्याला सुस्पष्ट दर्शन होते. तेथील प्राणी, मासे व माशांचे प्रकार बघून आपण पुन्हा एकदा आश्चर्याने स्तिमित होतो. छोटे–मोठे मासे, त्यांच्या रंगछटा व त्यांच्या अंगावरची वेगवेगळ्या रंगांतली चित्रं पाहत रहावी अशी असतात. सकाळी समुद्रकिनारी फिरायला गेल्यावर तिथल्या ओल्या रेतीत असणाऱ्या अनेक बारीक छिद्रांमध्ये बारीक प्राणी रहात असतील ह्याची कल्पना येते. लहान लहान खेकड्यांना आपल्या पावलांच्या आवाजाने धोक्याची जाणीव होते व ते पाण्याकडे पळतांना दिसतात. तिथे किनाऱ्यावर अजून Squill, Prawns, Puffer-fishes असे इतरही प्राणी बघायला मिळतात.

तिथल्या 'Arga Beach' वर तर ओल्या रेतीत असंख्य तारा मासे (Star-fishes) रेतीत आतमध्ये लपून बसल्यासारखे असतात. एवढ्या लहान लहान प्राण्यांची सुरेख हालचाल व स्वतःचा जीव वाचवण्याचा त्यांचा प्रयत्न बघून मनास विलक्षण वाटते.

तिथल्या शंख, शिंपले, कवड्या, कोरल्स या जलसंपत्तीच्या बाबतीत तर काय लिहायचे ? अक्षरशः शंखांचे अगदी ढीगच्या ढीग किनाऱ्यावर पडलेले दिसतात. त्या शंखांमध्ये Hermit-crabs असतात.

तिथेही निसर्ग आपले श्रेष्ठत्व निर्विवाद सिद्ध करतो.

भरतीच्या प्रत्येक लाटेबरोबर पाण्याची पातळी वाढत जाते. हा अनुभव अगदी मजेशीर आहे. समुद्राच्या पाण्यात भिजण्यासारखा अनुभव नाही! कितीही लांबवर नजर टाकली तरी पाण्याशिवाय काहीही दिसत नाही. त्या पाण्यावर हेलकावे खात, डौलाने कोळी लोक आपल्या नावा, होडकी पाण्यात नेत असतात. मोठीच्या मोठी जाळी समुद्रात फेकून माश्यांचा व्यवसाय करतात. पण एकंदर कष्टांच्या मानाने त्यांना आर्थिक प्राप्ती होत नाही असे दिसले. पण ते मोठ्ठं जाळं जेव्हा जोर लावून समुद्रातून बाहेर काढतात तेव्हाचा अनुभव जरा वेगळाच असतो. असंख्य तडफडणाऱ्या माशांपैकी एक-दोन माशांना तरी परत पाण्यात टाकण्याचा मोह आपण आवरू शकत नाही.

रांपण बीचवर असे जाळे टाकून मासे पकडण्याच्या क्रियेस 'रांपण ऑपरेशन' असे म्हणतात. रांपण बीचवर जेव्हा मासे पकडण्यासाठी मोठ जाळे टाकलेले असते तेव्हा लक्षात रहाण्यासारखी एक गोष्ट म्हणजे त्या जाळ्यावर बसलेले सी-गल (Sea-gull) पक्षी. त्या पक्ष्यांच्यावरून ते जाळे समुद्रात नक्की कोठपर्यंत आहे ह्याचा अंदाज येतो. कारण हे पक्षी त्या जाळ्यावर मासे व इतर लहान किडे खाण्यासाठी बसलेले असतात. हे पक्षी अतिशय सुंदर असतात. त्यांचा रंग स्वच्छ पांढरा असतो. हे सीगल-पक्षी रशिया व उत्तर युरोपात सुरू होणाऱ्या कडक थंडीपासून बचाव करण्यासाठी आशियात स्थलांतर करतात. हे जलपक्षी असल्याने साहजिकच समुद्र, नदी, तलाव वगैरे ठिकाणी सापडतात. त्यांचे खाद्य लहान कीटक व मासे. निसर्गाने त्यांना सफाई करण्याचे काम दिले आहे. त्यामुळेच पक्षीवर्गात ते 'सफाई पक्षी' (स्कॅव्हेंजर क्लास) म्हणून ओळखले जातात.

कारवार मध्ये KFDC म्हणजे कर्नाटक मत्स्य विकास केंद्र आहे. तेथून मोठ्या प्रमाणात माशांची निर्यात केली जाते. तिथे मोठे-मोठे बर्फाचे ठोकळे बनवून, शीतगृहात मासे सुस्थितीत ठेवले जातात. अतिशय मोठ्या प्रमाणात व अतिशय चांगल्या रीतीने इथले काम चालते. त्यासाठी गोड्या पाण्याचे Liquid Ammonia च्या साह्याने बर्फात रूपांतर केले जाते.

आमची सहल शैक्षणिक असल्यामुळे तिथल्या सागरी प्राणी व जीवनाचा अभ्यास करणाऱ्या संस्थांना आम्ही भेट दिली. Marine Biology Research Centre मध्ये एका देवमाशाचा हाडांचा सांगाडा (संपूर्ण) ठेवलेला आहे. त्याचे वजन ३ टन आहे. तिथल्या लोकांनी दिलेल्या माहितीच्या अनुसार मृतावस्थेत असलेल्या देवमाशाचे वजन १५० टन होते. त्याला तिथेच किनाऱ्यावर गाडून नंतर त्याचा सांगाडा आणून तिथे ठेवला आहे. तिथे अजूनही बऱ्याच प्रकारचे प्राणी होते.

कारवारच्या Governmet College मध्ये आम्ही गेलो होतो. तिथे पण वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी आम्ही पाहिले. तिथे १८ फूट लांबीचा king-cobra आम्ही पाहिला.

तिथे CMFRI (Central Marine Fisheries Research Institute) मध्ये आम्ही Sea-otter पाहिला. ह्याला समुद्रातले कुत्रे पण म्हणतात. ह्या प्राण्याचे वैशिष्ट्य म्हणजे जेव्हा त्याला एखादा प्राणी खायचा असेल आणि तो प्राणी जर कवचात असेल तर हा प्राणी (sea-otter) पाण्यात पाठीवर पोहून छातीवर दगड ठेवतो व तो कवच्यातला प्राणी दोन्ही हातांनी त्या दगडावर आपटतो. त्यामुळे कवच फुटतं व Sea-Otter त्या प्राण्यास खातो.

कारवारमधल्या आमच्या ३ दिवसांच्या वास्तव्यात तिथल्या बहुतेक सगळ्या Beaches वर सकाळ संध्याकाळ जात होतो. तिथल्या Beaches वर आम्हाला खूप वेगवेगळे प्राणी पहायला मिळाले.

आमच्या ह्या शैक्षणिक सहलीमुळे, खरे प्राणीशास्त्र हे चार भिंतीच्या आत बसून कधीच लक्षात येणार नाही, कळणार नाही तर ते निसर्गात मिसळून, निसर्गात फिरूनच शिकायला मिळते ह्याचा पूर्णपणे अनुभव आला. वेगवेगळे प्राणी हे प्रयोगशाळेतील बाटल्यामध्ये बघण्यापेक्षा ते मुक्तपणे समुद्रात, त्यांच्या रोजच्या घरात (पाण्यात) वावरतांना बघून जास्त आनंद होतो व त्यांचा अभ्यासही जरा विस्तारपूर्वक करता येतो. या वस्तुस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव आमच्या कारवार सहलीने आला हेच तिचे खरे महत्त्व.

# म. म. दत्तो वामन पोतदार– एक पुराण पुरुष

## ( जन्मशताब्दीनिमित्त पुण्यस्मरण )

प्रा. म. आ. कुलकर्णी (इतिहास विभाग प्रमुख)



महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी आपल्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्वाने व कार्याने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर व इतिहासावर आपला ठसा उमटविला आहे. इ. स. १८९० च्या ५ ऑगस्टला बीरवाडी ( कुलाबा ) येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील फर्गसन महाविद्यालयातील इतिहासाचार्य राजवाडे व रियासतकार सरदेसाई यांचे सहाध्यायी. त्यामुळे दत्तोपंतांचा परिचय ह्या व्यक्तींशी झाला व तो पुढे वाढीस लागला, इ. स. १९०६ मध्ये मॅट्रिक व लगेच इ. स. १९१० मध्ये ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. इ. स. १९१० च्या 'आषाढस्य प्रथम' दिनी राजवाडे व मेहेंदळे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना केली. त्या प्रसंगी एक कार्यकर्ता म्हणून पळापळ करण्यासाठी दत्तोपंत संस्थापकांच्या सेवेसाठी हजर होते. अशा प्रकारे भा. इ. सं. मंडळाच्या स्थापनेशी व त्यांच्या संस्थापकांशी पोतदारांचा संबंध अगदी आरंभापासूनच आला होता. १९१३ मध्ये ते रीतसर सभासद झाले. लगेच तीन वर्षांनी मंडळाच्या चिटणीस पदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली. मंडळाच्या पाक्षिक सभेत तसेच वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी पोतदार आवर्जून विविध विषयांवर एखादे टिपण अथवा निबंध वाचत. असे त्यांनी शेकडो निबंध वाचलेले आहेत. मंडळाचे ते २६ वर्षे चिटणीस होते. त्या कालखंडात त्यांनी विविध प्रकाशनांना मोठ्या सुंदर व मार्मिक प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. ह्या लिखाणातून त्यांची इतिहाससंबंधीची संकल्पना व चिकित्सक दृष्टी समजू शकते. राजवाडे यांचे समवेत कागदपत्रे व अन्य इतिहास साधने जमविण्याच्या कार्यात ते सक्रिय सहभागी असत. त्यांच्याबरोबर कागदपत्रांचे संपादन करणे, विविध कागदपत्रांची जुळवा जुळव करणे, अर्थ लावणे, त्यांची मुद्रणप्रत तयार करणे इ. कामे दत्तोपंतांना करावी लागत. पुढे राजवाडे काही कारणाने धुळ्यास गेले. त्यांच्या पश्चात मंडळाच्या घडणघडणीची सर्व जबाबदारी दत्तोपंत पोतदार व

दत्तोपंत आपटे यांच्यावर पडली. दत्तोपंत आपटे बैठक मारून अत्यंत एकाग्र चित्ताने कार्य करणारे कार्यकर्ते; त्यांनी छ. शिवचरित्र कार्यालयाची कचेरी स्थापन करून मंडळाच्या कार्याला एक निश्चित आकार दिला. पोतदार समाजात हिंडून सभासद गोळा करणे, मंडळाच्या कार्याला पैसा उभारणे, इ. कार्य करणारे. त्यांनी आपल्या जनसंपर्काने मंडळाचा नावलौकिक देशभर तसेच देशाबाहेरही नेवून पोहोचविला. आजही मंडळ एक आंतरराष्ट्रीय कीर्तीची व मराठ्यांच्या इतिहासाची एकमेव मान्यवर संस्था बनलेली आहे त्याचे सर्व श्रेय ह्या दोन राजवाडे सहकाऱ्यांनाच द्यावे लागते.

इ. स. १९११ साली पोतदार शिक्षण प्रसारक मंडळीच्या सेवेत शिक्षक म्हणून रुजू झाले. तेथून त्यांचा व मंडळीचा ऋणानुबंध प्रस्थापित झाला. मंडळींच्या सेवेत ते लगेचच आजीव सभासद झाले. मराठी शाळेचे प्रमुख म्हणून त्यांचेकडे इ. स. १९१६ मध्ये जबाबदारी सोपविण्यात आली. ही जबाबदारी त्यांनी नऊ वर्षे सांभाळली. त्याच वर्षी म्हणजे इ. स. १९१६ मध्ये त्यांच्याकडे भा. इ. सं. मंडळाचे चिटणीसपदाची जबाबदारीही सोपविण्यात आलेली होती. पुढे इ. स. १९२० पासून ते न्यू पूना कॉलेज (सध्याचे स. प. महाविद्यालय) मध्ये मराठी व इतिहास विषयाचे प्राध्यापक म्हणूनही अध्यापनाचे कार्य करू लागले. इ. स. १९२६ ते ३२ ह्या कालखंडात पोतदार नू. म. वि. प्रशालेचे प्रमुख होते. शि. प्र. मंडळीच्या सेवेतून त्यांची इ. स. १९३६ मध्ये स्वेच्छा सेवानिवृत्ती स्वीकारली. पुढे ते मंडळीच्या नियामक मंडळीचे कित्येक वर्षे अध्यक्ष होते. भा. इ. सं. मंडळाच्या प्रमाणेच पोतदारांचा सहभाग शि. प्र. मंडळीच्या जडणघडणीतही फार मोलाचा व महत्त्वपूर्ण होता. संस्थेचे आजीव सभासद व नियामक मंडळातील निवडून आलेले प्रतिनिधी ह्यांच्यामध्ये अर्थपूर्ण समतोल निर्माण करून पोतदारांनी शि. प्र. मंडळीच्या चौफेर प्रगतीचा भक्कम पाया घातला. संस्थेच्या 'आजीव सभासद' संकल्पनेला त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत एक नवा अर्थ व संदर्भ प्राप्त झाला.

**इतिहासासाठी राष्ट्रीय मंच**— ब्रिटिशांनी जसजसे भारतावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले तसतशी त्यांच्या हातात प्रशासनाची कागदपत्रे जमा होऊ लागली. त्यामध्ये राजकारणी, मुत्सद्दी संबंधींच्या कागदपत्रांबरोबरच महत्त्वाचा इतरही बराच मोठा पत्रव्यवहार होता. हे दप्तरखाने अभ्यासकांना व भारतीय विद्वानांना पहाण्यासाठी व अभ्यासासाठी उपलब्ध केले जावेत अशी मागणी केली जात होती. न्या. रानडे यांनी ह्यासाठी बरीच खटपट केली होती. त्यांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांचा गोषवारा आपल्या एका निबंधात मांडून हे दप्तर अभ्यासकांसाठी त्वरित खुले केले जावे अशी मागणी केली होती. ही चळवळ पुढे समर्थपणे चालविण्याचे श्रेय पोतदारांनाच द्यावे लागते. त्यांनी भा. इ. सं. मंडळाच्या माध्यमातून वारंवार ह्या विषयास तोंड फोडून सरकारकडे दप्तर अभ्यासकांस खुले केले जावे ही मागणी केली. सरकारलाही पोतदार व अन्य संशोधकांच्या मागणीकडे फार काळ दुर्लक्ष करणे अवघड झाले व इ. स. १९२९ नंतर पेशवे दप्तर हळूहळू खुले केले जाऊ लागले. भारताच्या इतिहासलेखन व संशोधनासाठी सर्व संबंधित व्यक्तींनी एकत्रित यावे, आपापले संशोधन व लेखन सर्वांपुढे मांडावे. या हेतूने पोतदारांनी 'अखिल भारतीय इतिहास परिषदे'ची उभारणी केली. ह्या संघटनेस सर्वच क्षेत्रांत मान्यता मिळवून देण्याचे व तिच्या नियमित सभा घेतल्या जाण्याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागते. आज ही संघटना आपली सुवर्णजयंती साजरी करीत आहे. ती पोतदारांच्या कार्याची, तळमळीची एक जिवंत स्मारकच ठरली आहे. ह्या संस्थेच्या रूपाने व माध्यमाने भा. इ. सं. मंडळाच्या कार्यास अखिल भारतीय व आंतराष्ट्रीय कीर्ती मिळाली आहे.

**कार्याची विविध क्षेत्रे**— संस्था स्थापन करणे व तिच्या कार्यास चालना देणे, तिचे नेतृत्व समर्थपणे करणे ही महाराष्ट्राची एक थोर परंपरा आहे. ह्या परंपरेचा वसा पुढे चालू ठेवण्याचे कार्य दत्तोपंतांनी समर्थपणे पार पाडले. इ. स. १९३८ ते ४४ या काळात ते महाराष्ट्र राष्ट्रभाषा समिती (वर्धा) चे अध्यक्ष होते. इ. स. १९४२–४९ मुंबई प्रांतिक हिंदुस्थानी बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम

केले. पुण्यातील महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे पोतदार १९४५ ते ४९ अध्यक्ष होते. ह्या त्यांच्या कार्याचा गौरव प्रयागच्या हिंदी साहित्य संमेलनाकडून इ. स. १९६५ मध्ये त्यांना 'साहित्य–वाचस्पति' ही पदवी देऊन करण्यात आला. पोतदार टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे इ. स. १९४८ मध्ये कुलगुरु झाले. त्याच वर्षी त्यांना अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या दिल्ली अधिवेशनाचे अध्यक्षपदही देण्यात आले. त्यापूर्वी काही दिवस त्यांना केंद्र सरकारकडून 'महा-महोपाध्याय' ही पदवीही मिळालेली होती. हे सर्व मान–सन्मान त्यांच्या विविध क्षेत्रांतील कार्याची पावतीच होती. इ. स. १९६१ ते ६४ पोतदार पुणे विद्यापीठाचेही कुलगुरु होते.

**समारोप**– महाराष्ट्र शासनाने दादासाहेब पोतदारांच्याकडे 'शिवचरित्र' लेखनाची जबाबदारी सोपविली. त्यांचा एकंदर स्वभाव व पिंड पाहता त्यांना एके-ठिकाणी ठाम बैठक मारून लेखन करायची फारशी सवय नव्हती. इतिहासाचे ते चालताबोलता 'कोश' होते. पण केवळ काही प्रस्तावना, पुरस्कार, भाषणे, एखाद दुसरी लेखवजा पुस्तिका ह्यापलीकडे त्यांनी फार लेखन केलेले नाही. अर्थात जे काही त्यांनी लिहून ठेवलेले आहे त्यावरून त्यांच्या दृष्टिकोनाची, ज्ञानाची व सखोल माहितीची कल्पना येते. 'शिव–चरित्र' लेखनासाठी निवांतपणा मिळावा म्हणून ते वाईला जाऊन राहिले पण तेथेही हे कार्य त्यांच्या हातून होऊ शकले नाही. लोकाग्रहास्तव ते वारंवार सार्वजनिक कार्याच्या अध्यक्षपदासाठी अथवा भाषणासाठी पुण्यास व अन्यत्र जातच राहिले. लोकांपासून ते दूर राहूच शकत नव्हते. लोकांचाही त्यांच्यावर खास लोभ व हक्क शेवटपर्यंत होता. याचेच प्रतीक म्हणजे त्यांना मिळालेली इ. स. १९६७ ची 'पद्मभूषण' ही भारत सरकारची पदवी होय. असा हा 'पुराणपुरुष' ६ ऑक्टोबर, १९७९ रोजी पुण्यातच इतिहासरूपी काळोख्या उदरात गडप झाला. मृत्युपूर्वी त्यांनी आपली सर्व आयुष्याची कमाई– कागदपत्रे, पुस्तके, वस्तु इ. शि. प्र. मंडळीला अर्पण केली.

*

## 'आश्वासन'

निवडणुकीतच आश्वासने
विश्वासाने दिली जातात
नंतर... ...आश्वासने
आश्वासनेच राहतात

*

## 'अस्तित्व'


मानवा, सोड हा अभिमान खोटा
नाही, तू, वा मी मोठा
यत्किंचित क्षुद्र अस्तित्व
तुझे माझे सृष्टीत.

कु. भारती वसंत साम्ब ( द्वि. व. साहित्य )

*

# आमचे काका

प्रा. त्र्यंबक प्र. लाळे (रसायन विभाग)



**[ महाविद्यालयाचे कुलसचिव श्री. य. पां. देशपांडे तथा 'काका' दि. ३१।१०।८९ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त हा गौरवलेख. ]**

एप्रिल ७१ चे दिवस, उन्हाळा मी म्हणत होता व अशा त्या तापलेल्या उन्हात मॉडर्न महाविद्यालयात मुलाखतीसाठी जावयाचे होते. आधीच नोकरीसाठीची मुलाखत म्हणजे अंगाला घाम सुटलेला आणि त्यातच उन्हाळ्याची भर. मा. ताटके सर, प्राचार्य लिमये, प्रा. डॉ. गाडगीळ, प्रा. गंभीर यांच्या नावाचा दबदबा चांगलाच पसरलेला होता. दुपारी ३ वाजता मुलाखतीसाठी बोलावलेले होते. भीत भीतच आवारात प्रवेश केला व जमलेल्या उमेदवारांमध्ये मिसळून जावे या इराद्याने हळूहळू जमावाच्या दिशेने सरकू लागलो; तोच ऑफिसच्या आतल्या दालनातून 'या' या अशी दिलखुलास आरोळी आली. पुढे होऊन बघितले तर रुबाबदार पोषाख केलेले प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे Y. P. ऊर्फ काका आपल्या अंगठ्याभरल्या बोटांनी पेपरवेटशी खेळत ओळखीची आपुलकी दाखवत होते. मनावर येऊ घातलेला ताण काकांच्या एका हास्याने निम्माशिम्मा उतरून गेला. काकांनी प्रेमाने आपल्या समोरच्या खुर्चीवर बसवले व थंडगार पेयाने आधी उन्हाचा त्रास नाहिसा केला मग धीराचे आणि अनुभवाचे चार शब्द सांगितले आणि त्या आपुलकीच्या आधारावर मुलाखत केव्हा संपली हे लक्षात सुद्धा आले नाही. हा फक्त माझाच अनुभव नाही. महाविद्यालयात नोकरीसाठी म्हणून आलेल्या आपल्यापैकी प्रत्येकाला काकांचा हाच जिव्हाळा लाभलेला आहे.

काका ऑफिसच्या त्या खुर्चीत अगदी शोभून दिसत. शक्यतो एकही दिवस रजा न राहता अखंड सेवेचे त्यांचे व्रत चटकन नजरेत भरत असे. काका आपल्या प्रत्येकाच्या कुटुंबातील एक अविभाज्य घटक केव्हा बनले हे आठवायचे म्हटले तरी आठवणे अवघड आहे. पहिल्या प्राचार्यांचा जादा कडकपणा काकांनी प्राचार्यांच्या ऑफिसच्या दाराशीच थांबवला होता. त्याची झळ क्वचितच इतरांना लागू दिली. अगदीच अशक्य असेल तरच काका असमर्थता दाखवायचे.

काकांनी आपल्या सेवेच्या काळात ५ प्राचार्य व त्याहीपेक्षा जास्त उपप्राचार्य यांच्याबरोबर तितक्याच आत्मीयतेने काम केले. शनिवारचा अर्धा दिवस व रविवारखेरीज आलेली सुट्टी काकांसाठी कधीच

नसायची. सकाळी १० ते सायंकाळी ६–६।। वा कधी-कधी त्यापलीकडेही काकांची ऑफिसची वेळ होती. कोणत्याही गोष्टीची माहिती नाही असे क्वचितच व्हायचे. त्यामुळे त्यांच्याकडे आलेल्या व्यक्तीला परत जातांना काम पूर्ण झाल्याचे समाधान मिळवता येत असे. शक्यतो कोणाला नाराज करावयाचे नाही व चेहऱ्यावरची प्रसन्नता ढळू द्यायची नाही हे तर काकांचे ब्रीद होते. ह्या त्यांच्या स्वभावामुळे ते विद्यार्थ्यांत तर प्रिय होतेच पण नव्या-जुन्या सर्वच सहकाऱ्यांबरोबर त्यांचे तेवढेच आपलेपणाचे संबंध होते. संगीत नाटकाची आवड ह्यामुळे याही क्षेत्रातील व्यक्तींबरोबर काकांनी स्नेहबंध जोडलेले होते. प्राचार्य गंभीर सरांच्या कारकीर्दीत काकांचे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलले होते. ह्या त्यांच्या स्वभावामुळे काकांनी वयाची ५८ वी कधी गाठली हे लक्षातच आले नाही आणि गेले वर्ष असे आले की काकांच्या निवृत्तीची चर्चा सुरू झाली. खरेतर प्रत्येकाला मनातून काकांना मुदतवाढ मिळावी व यांच्या निरलस सेवेचा लाभ महाविद्यालयाला तसेच कर्मचारी वर्गालाही व्हावा असेच वाटत होते, पण काकांना कोठे थांबायचे याचे अचूक भान होते. त्यांनी इतरांच्या प्रगतीची वाटले खुली केली व आनंदाने निवृत्ती स्वीकारली व आपल्यातले हे प्रसन्न व्यक्तिमत्त्व महाविद्यालयापुरते दूर झाले.

आजही लहर आली की काकांकडे जाऊन यावे, त्यांच्याकडून प्रसन्नतेचे ४/२ शितोडे अंगावर उडवून घ्यावेत व रोजच्या धकाधकीच्या जीवनाला सामोरे जावे असे वाटते. असे होते आमचे काका–महाविद्यालयाचा खंबीर आधार, व एक स्नेहाळ व प्रसन्न व्यक्तिमत्त्व. त्यांचा निवृत्तीचा काळ सुखासमाधानात जावा ही शुभेच्छा.

*

# महात्मा फुल्यांचे विचार

स्मिता व. खोत (द्वि. व. साहित्य.)

**[म. ज्योतिबा फुले पुण्यतिथि शताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा लेख.]**

म. ज्योतिरावांनी इ. स. १८४८ मध्ये सार्वजनिक जीवनात प्रवेश केला तेव्हा त्यांना प्रथम आपण स्त्रियांच्या व अतिशूद्रांच्या शिक्षणाचे कार्य हाती घ्यावे असे वाटले. ज्योतिरावांच्या जीवित कार्याचे १८४८ ते १८६५ व १८६५ ते १८९० असे दोन कालखंड पडतात. पहिल्या कालखंडात त्यांनी स्त्रीदास्यविमोचन व दलितोद्धार या प्रश्नांकडे लक्ष दिले. त्यांनी कन्याशाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाचा प्रारंभ केला. १८५६ मध्ये पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता मिळाली. ज्योतिरावांनीही पुण्यास सारसबागेमध्ये एक पुनर्विवाह घडवून आणला. या उपक्रमांना तत्कालीन सुशिक्षितांनी थोड्या प्रमाणात का होईना परंतु साथ दिली. प्राचीन हिंदू परंपरेचे गोडवे गाणाऱ्या आधुनिक जहाल संप्रदायाबद्दल ज्योतिरावांना सहानुभूती नव्हती. कुणालाही न

दुखावता नव्या-जुन्याचा समन्वय करीत संथपणे सुधारणा घडवून आणण्याची नेमस्त प्रागतिक संप्रदायाची कार्यपद्धती ज्योतिरावांच्या मते सदोष होती. या मार्गाने सामाजिक प्रगतीची मोठी मजल कधीच गाठता येणार नाही अशी त्यांची खात्री पटली होती. शूद्रातिशूद्रांची स्थिती सुधारावयाची असेल तर फुटकळ सुधारणांवर विसंबून न रहाता मूलगामी समाजपरिवर्तनासाठी झटले पाहिजे. आपल्या मानवी अधिकारांची जाणीव त्यांना देऊन ते प्राप्त करून घेण्यासाठी संघटितपणे झगडण्यास त्यांना प्रवृत्त केले पाहिजे. त्यासाठीच ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तेव्हापासून त्यांच्या सार्वजनिक जीवनातील दुसरा कालखंड अधिक प्रभावीपणे सुरू झाला. धार्मिक, सामाजिक जीवनातील गुलामगिरी समूळ नष्ट करणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते. ज्योतिरावांच्या या स्तुत्य उपक्रमाला बहुजन समाजातील जाणत्या लोकांकडून अनुकूल प्रतिसाद मिळाला. हरी गणेश पटवर्धन, विनायक बापूजी भांडारकर यांच्यासारख्या उच्चवर्णीय हितचिंतकांचा या समाजाला पाठिंबा होता. विधायक आणि आक्रमक अशा दोन्ही पद्धतींनी कार्य करण्याची ज्योतिरावांना गरज भासली. सत्यशोधक समाजाचा मुख्य लढा धर्मसंस्थेशी होता. धर्मसंस्थेचे वर्चस्व झुगारून देऊन जुन्या हानिकारक समजुती व अनिष्ट रुढी सोडून देतांना सनातनी ब्राह्मणांचा विरोध तर होतच होता, पण बहुजन समाजातील अंधश्रद्धेचा व धर्मभोळेपणाचा अडथळा येत होता. त्यांना तोंड देऊन ज्योतिरावांनी खऱ्या विशुद्ध धर्माचा अंगीकार करण्याची आपल्या अनुयायांना प्रेरणा दिली. संघर्षप्रवण मानवतावाद हेच ज्योतिरावांच्या समग्र विचारप्रणालीचे अंतःसूत्र आहे. माणूस हा वस्तुतः एकंदर प्राणिसृष्टीचाच एक घटक आहे परंतु सारासार विचारशक्ती व नैतिक प्रेरणा हे माणसाचे प्रमुख वैशिष्टय आहे अशी त्यांची धारणा होती. ज्योतिरावांच्या समग्र विचारांना धर्मभावनेचे अधिष्ठान होते हे तर खरेच, परंतु त्यांच्या प्रतिपादनात कोणत्याही विशिष्ट धर्मपंथाचा अभिनिवेश नव्हता. प्रस्थापितांशी संगनमत करणाऱ्या सबच मतलबी धर्मसंस्थांना त्यांचा विरोध होता. ते खऱ्या अर्थाने विश्वधर्माचे उपासक होते, ! मूळ धर्मभेद मानवा नसावा !, एकोपा असावा जगामाजी ' असा त्यांचा विशुद्ध व व्यापक दृष्टिकोन होता. हिंदू धर्मसंस्थेवर ज्योतिरावांनी वारंवार हत्यार उपसले तरी मनुष्यमात्राच्या जीवितसाफल्यासाठी धर्मभावनेची आवश्यकता आहे, अशी त्यांची दृढ धारणा होती. धर्मजीवनातील भाबडेपणा, दंभ व मिथ्याचार यांची त्यांना मनापासून चीड होती. परंतु नास्तिकता आणि धर्मपराङ्-मुखता यांनाही त्यांचा सक्त विरोध होता. ते स्वभावतः धार्मिक प्रवृत्तीचे असले तरी त्यांची धर्मकल्पना सांप्रदायिक नव्हती. त्यांच्या जीवनसरणीत श्रद्धा व प्रज्ञा यांचे कार्य परस्परपूरक होते. विश्वनियामक ईश्वरी शासनावर त्यांचा दृढ विश्वास होता. हे शासन न्यायनिष्ठ व दयाशील आहे अशी त्यांची धारणा होती.

ज्याला ईश्वराची कृपा संपादन करायची असेल त्याने आपल्या वैयक्तिक जीवनात न्यायनिष्ठा व दयाशीलता हे गुण तर आत्मसात केलेच पाहिजेत पण त्याचबरोबर माणसामाणसातील संबंध हे त्यावरच आधारले जावेत म्हणून रात्रंदिवस झटले पाहिजे. हाच वास्तविक मनुष्यमात्राचा धर्म होय. त्यालाच ज्योतिरावांनी सत्यधर्म, नीतिधर्म म्हटले आहे. त्यात धर्मभावनेचा आशय मानववाद हाच आहे. ज्योतिरावांचा परलोकाच्या अस्तित्वावर विश्वास नव्हता. ' स्वर्ग ' ही कल्पना मनुष्य समाजाच्या एका विशिष्ट अवस्थेत उदयाला आली आहे. मात्र मनुष्याच्या नैतिक जबाबदारीचे तत्व त्यांना पूर्णपणे मान्य असल्याने त्यांनी सत्य-असत्य, नीति-अनीती, पाप-पुण्य ही द्वंद्वे नाकारली नाहीत. इतकेच काय पण पाप-पुण्याचे विवेचन करतांना 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडम्' हे हिंदू धर्मग्रंथातील वचन उद्धृत करून त्यांनी त्याच्या खरेपणाची ग्वाही दिली आहे.

ज्योतिरावांनी आपल्या धर्मकल्पनेत आधुनिक इहवादाचा आशय ओतला आहे. मानवाचे नैसर्गिक अधिकार हा त्यांच्या सामाजिक विचाराचा केंद्रबिंदू आहे. त्यांना न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या तत्त्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारा समाज निर्माण करण्याची तळमळ होती. रूढीवादाच्या आहारी जाऊन व्यक्तिस्वातंत्र्याला थारा न देणारा साचेबंद जीवनक्रम त्यांना त्याज्य वाटत होता. पण बेबंद व

दिशाहीन लोकव्यवहारही त्यांना तितकाच हानिकारक वाटत होता विमुक्त, प्रगतिपर पण स्वयंशासित सामाजिक जीवन त्यांना अभिप्रेत होते. थोडक्यात ज्योतिराव खऱ्या अर्थाने तत्त्वनिष्ठ व स्वातंत्र्यवादी होते. मात्र त्यांना समाजाच्या सर्व थरांतील लोकांचे स्वातंत्र्य अभिप्रेत होते. आणि तेही एकदेशीय नव्हे, तर धार्मिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्वांगीण स्वातंत्र्याचे ते पुरस्कर्ते होते. म्हणून भारतीयांचे स्वातंत्र्य म्हणजे केवळ वरिष्ठ जातीचे स्वातंत्र्य नव्हे; त्यात शूद्रातिशूद्रांचे स्वातंत्र्यही अंतर्भूत आहे, असा त्यांचा आग्रह होता.

सामाजिक न्याय, समता, बंधुभाव या उदात्त तत्त्वांशी त्यांनी आपल्या धर्मश्रद्धेची व ईश्वरोपासनेची सांगड घातली होती. जगातील यच्चयावत पदार्थ निर्मिकाने मानवाच्या उपयोगासाठी निर्माण केले आहेत, त्यांचा यथोचित विनियोग न करता ते परत ईश्वराला अर्पण करण्यात शहाणपणा नाही. ज्योतिरावांनी आपल्या ईश्वरोपासनेच्या पद्धतीत बेंथॅम आणि जेम्स मिल यांच्या उपयुक्ततावादाचा आशय ओतला आहे. ईश्वराला कशाचीच गरज नाही, तेव्हा आपल्या कृतीचा विनियोग मनुष्यमात्राच्या कल्याणासाठी, विशेषतः अनाथ अपंगांच्या रक्षणासाठी केला पाहिजे. हीच खरी ईश्वरोपासना होय, असा ज्योतिरावांचा दृष्टिकोन होता. या दृष्टीने संन्यासवाद हा एक प्रकारचा पलायनवादच आहे. ईश्वराच्या जातिसातत्याच्या योजनेला तो विघातक आहे. म्हणून 'न्यायबुद्धीने सर्व वस्तूंचा उपभोग घेण्याने त्याच्या इच्छेला मान दिल्यासारखे होणार आहे. म्हणून न्यायाने वस्तूंचा उपभोग घ्यावा' असे त्यांचे आग्रहपूर्वक सांगणे होते. ज्योतिराव हे कट्टर एकेश्वरवादी होते. बहुदेवतावादाची कल्पना ही अज्ञानमूलक व भ्रामक आहे याबद्दल त्यांना तिळमात्र शंका नव्हती. ईश्वर या चराचर सृष्टीचा निर्माता व नियता आहे. त्याची न्यायनिष्ठा व दयार्द्रता ही परस्परपूरक आहेत. न्यायात मनुष्यमात्राच्या नैतिक जबाबदारीचे तत्त्व अंतर्भूत आहे. ज्योतिराव आपल्या भोवतालच्या सृष्टीचा उल्लेख करतांना तिच्या अनंताकडे आपले लक्ष वेधतात त्या मानाने मनुष्याची अवलोकनशक्ती आणि आकलन क्षमता किती मर्यादित आहे हे आपल्या ध्यानात आणून देतात. ईश्वराने 'सर्व प्राणीमात्रांत मानव प्राणी श्रेष्ठ केले आहेत,' हे खरे आहेच परंतु ईश्वराच्या अतर्क्य शक्तीचा वेध घेण्याच्या बाबतीत त्याचे बुद्धिसामर्थ्य अगदीच तोकडे आहे, हे विसरता कामा नये. या अफाट विश्वाचा निर्माता व शास्ता एकच आहे. 'मानवाचे धर्म नसावे अनेक। निर्मिक तो एक। ज्योती म्हणे। अशा शब्दात ज्योतिरावांनी 'एकच ईश्वर व एकच धर्म' या तत्वाचा कंठरवाने पुरस्कार केला आहे.

असे असले तरी कोणताही एक धर्म वा त्याचा स्वतःप्रमाण आदिग्रंथ ईश्वरदत्त व सर्वांगपरिपूर्ण आहे, असे त्यांना वाटत नव्हते. अशा प्रत्येक धर्मग्रंथाच्या आशयात काही शाश्वत स्वरूपाचा व काही कालसापेक्ष भाग असतोच, परंतु काळ बदलला तरी त्या ग्रंथातील कालसापेक्ष भागात बदल घडवून आणण्यास त्या त्या धर्मसंस्थेच्या ठेकेदारांचा कडवा विरोध असतो. त्यामुळे बहुधा प्रत्येक धर्माच्या अनुयायांच्या नित्यनैमित्तिक व्यवहारात विशुद्ध धर्मभावनेबरोबर अनेक संकुचित व शबल प्रवृत्तींचा शिरकाव होतो. म्हणून आपल्या सदसद्विवेक बुद्धीला प्रमाण मानूनच कोणत्याही धर्मग्रथाचे परिशीलन केले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. परंतु धर्म ही प्रत्येक मनुष्याची वैयक्तिक बाब आहे याबद्दल ज्योतिरावांच्या मनात तिळमात्र संदेह नाही. थॉमस पेन यांनी म्हटल्याप्रमाणे "To God, and not to man, are all men accountable on the score of religion." धर्माच्या बाबतीत सर्व माणसांना फक्त ईश्वरापाशीच आपल्या उभ्या आयुष्याचा हिशेब चुकता करावा लागेल. इतर कुणालाही यासबंधी त्याला जाब विचारण्याचा अधिकार नाही. म्हणून आपण ईश्वराची उपासना कोणत्या स्वरूपात करावी व कोणत्या पद्धतीने करावी हे ठरविण्याची मोकळीक सर्वांना असली पाहिजे. हे धार्मिक निर्णयस्वातंत्र्याचे तत्त्व ज्योतिरावांच्या एकंदर लेखनात सर्वत्र अनुस्यूत आहे.

ज्योतिराव हे महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. त्यासाठी त्यांनी जन्मभर बहुजन समाजाचे प्रबोधन केले. अस्पृश्यता ही आपल्या सामाजिक जीवनातील एक अनर्थकारक व लाजिरवाणी

बाब आहे. आर्यांच्या सूडबुद्धीचा तो उद्वेगजनक परिपाक आहे, त्यातच आणखी ह्या अमानुष रुढीची जनसामान्यांवरील पकड सैल होऊ नये म्हणून त्यांनी तिचा धर्मभावनेशी कायमचा संबंध जोडण्याची कारवाई केली. ह्या तर दुष्टबुद्धीचा कळसच होय असे ज्योतिरावांचे मत होते. हिंदू समाजात दृढमूल झालेली जातिसंस्था ही ईश्वरनिर्मित किंवा निसर्गसिद्ध नाही हे ज्योतिरावांनी वारंवार निक्षून सांगितले आहे. जन्मत: सर्व माणसे सारखीच आहेत. व्यवसायभेदावरून जातिसंस्थेचे समर्थन करता येणार नाही. व्यवसाय-स्वातंत्र्याचे हे युग आहे. कोणत्याही जातीतील माणसाला हवा तो व्यवसाय करण्याची मोकळीक आहे. म्हणूनच शूद्रातिशूद्रांच्या प्रगतीच्या मार्गात जर कोणता सगळ्यात मोठा अडसर असेल, तर तो जातिभेदांचा होय, अशी त्यांची खात्री पटली होती. म्हणून जातिभेदावर हल्ला करतांना ज्योतिरावांनी जागोजाग जे विचार मांडले ते कितीही प्रखर व प्रक्षोमक असले तरी मूलगामी समाजपरिवर्तनाशी बांधिलकी सांगणाऱ्या त्यांच्या भूमिकेशी ते सुसंगतच होते.

ज्योतिरावांच्या कार्याचे जे विधायक अंग होते त्यात त्यांचा ज्ञानप्रसार आणि विचारजागृती यावर खास भर होता. अव्वल इंग्रजीतील नवशिक्षित तरुणांनी आपल्या सामाजिक कार्यात उपयुक्त ज्ञानप्रसाराला प्राधान्य दिले होते. 'ज्ञान हीच शक्ती आहे' हे त्यांचे ब्रीदवाक्य ज्योतिरावांनाही पटले होते. म्हणूनच सरकारने बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना अग्रक्रम दिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ज्योतिरावांनी आपल्या लेखनातही व सत्यशोधक समाजाच्या चळवळीतही शिक्षणप्रसाराच्या कार्याला अग्रस्थान दिले होते. शूद्र व अतिशूद्र समाजातील लोकांना, शेतकऱ्यांना संधी कशी उपलब्ध करून देता येईल हाच विचार त्यांच्या मनात रात्रंदिवस घोळत होता. शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू होता. शेतकऱ्यांचे वाढते दारिद्र्य, धर्मभोळेपणा, प्रतिकूल परिस्थितीचे आघात अगतिकतेने सोसत राहण्याची वृत्ती, ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाला मान्यता यामुळे ते सर्व बाजूंनी नाडले जात आहेत. त्यांना लिहिता-वाचता येत नाही; हिशेब कळत नाही; कायद्याची माहिती नाही. शिवाय वकील, न्यायाधीश, कारकून हे सर्व एकाच जातीचे; तेव्हा कितीही जुलूम झाला, कसेही लुबाडले गेले तरी त्यांचा प्रतिकार करण्याची शेतकऱ्यांना हिंमत होत नाही. या नव्या राजवटीतही शेतकऱ्यांची ही हलाखी व दुर्बलता जशीच्या तशीच टिकून राहिली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अज्ञान हेच आहे. ह्या त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या नि:सत्व व प्रेरणाशून्य जीवनाच्या ठराविक चाकोरीतून त्यांना बाहेर काढायचे असेल, धार्मिक, सामाजिक व आर्थिक गुलामगिरीतून त्यांची मुक्तता करायची असेल, तर शिक्षणाखेरीज दुसरा मार्ग नाही, हे त्यांनी राजकर्त्यांना व बहुजन समाजातील नवशिक्षितांना पुन: पुन्हा निक्षून सांगितले आहे. समाजाच्या दुर्बल घटकांची दैन्यावस्था दूर करण्यासाठी त्यांनी लोकशिक्षणाला जसे प्राधान्य दिले होते तसेच सत्ता हे देखील समाज-परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे याचा ज्योतिरावांना विसर पडला नव्हता. शूद्रातिशूद्रांची धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट होऊन त्यांच्या हाती मोक्याची सत्तास्थाने आल्याशिवाय त्यांना उर्जितकाळ येणे शक्य नाही अशी ज्योतीरावांची धारणा होती. अत्यंत विपन्नावस्थेत खितपत पडलेले व शतकानुशतके विद्येला वंचित झालेले हे लोक नि:सत्व व प्रवाहपतित बनले आहेत. म्हणून त्यांना प्रगतिपथावर आणण्याच्या कामी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

अशा प्रकारे ज्योतिरावांनी आपल्या अंतर्भेदी दृष्टीने सामाजिक वास्तवातील गुंतागुंत उकलण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यामागील प्रेरणा पाहिली, तर ती उदात्त, मूलग्राही व व्यापक असल्याचे दिसून येते. तिच्यात संकुचितपणा, सांप्रदायिकता व स्थितिशीलता सहसा कुठे जाणवत नाही. प्रत्येक वेळी ते शोषितांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले होते. शोषित, मग ते कोणत्याही जातीचे, धर्माचे व कोणत्याही थरातील असोत, त्यांच्याविषयी त्यांच्या मनात खोल सहानुभूती होती. त्यांच्या सुखदु:खांशी ते तादात्म्य पावले होते. त्यांची गाऱ्हाणी त्यांनी वारंवार वेशीवर टांगली. त्यांच्या हितसंबंधांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा

केला. त्याकरिता प्रस्थापितांवर हल्ला चढविताना ते कधी कचरले नाहीत. त्यांची भाषा ही उद्विग्नतेची नाही, तर आव्हानाची आहे. श्रमिक शूद्रातिशूद्रांतील सुप्त शक्तीची त्यांना पुरेपूर ओळख पटली होती. तिच्या नवनिर्माणक्षमतेवर त्यांचा विश्वास होता. सामाजिक न्याय व समता यांच्या स्थापनेसाठी ही शक्ती जागृत करण्याची आवश्यकता त्यांना तीव्रतेने जाणवत होती आणि त्यासाठीच ते जन्मभर प्रयत्नशील होते. म्हणून 'सामाजिक क्रांतीचे अग्रदूत' हा त्यांचा गौरव यथोचितच आहे. ज्योतिरावांच्या पुण्यतिथीच्या शताब्दीचे हे वर्ष आहे. या शंभर वर्षांच्या अवधीत महाराष्ट्राच्या एकंदर सामाजिक जीवनात कितीतरी स्थित्यंतरे घडून आली आहेत. समाजाच्या विविध घटकांच्या परस्परसंबंधात फार मोठा बदल झालेला आहे. शोषकवर्गात काही नवे गट उदयास आले आहेत; शोषित वर्गाच्या संख्येत उत्तरोत्तर भर पडत आहे; आणि त्यांची स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्यांचा जीवनकलह अधिकाधिक बिकट होऊ लागला आहे. ज्योतिराव हे तर या एकंदर सर्वच शोषित जनांचे कृतिशील कैवारी होते त्यांचे व्यक्तित्व, विचार आणि कार्य यापासून स्फूर्ति घेऊन त्यांचे अनुयायी गरीब, कष्टकरी समाजाच्या शोषणमुक्तीसाठी संघटितपणे व जिद्दीने अहोरात्र झटतील, प्रस्थापितांशी शक्ती एकवटून सर्व आघाड्यांवर पद्धतशीरपणे झगडत राहतील, तरच त्यांच्या कार्याची पूर्तता होण्याचा संभव आहे. यातच महात्मा फुले यांच्या वारसदारांची खरी सत्वपरीक्षा आहे.

*

# भागवत धर्माचे संस्थापक–ज्ञानेश्वर

**दत्ता सावता माळी (११ वी सायन्स)**

संत ज्ञानेश्वरांचे नाव न जाणणारा मराठी माणूस सापडणे कठिणच. सरळ सोप्या मराठी भाषेत त्यांनी लावलेला गीतेचा अन्वयार्थ 'ज्ञानेश्वरी' च्या रूपाने अजरामर झाला आहे. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी असामान्य विद्वत्ता दाखविणाऱ्या या संत पुरुषाने आपल्या चमत्कारांनी आबालवृद्धांना चकित केले आणि अगदी खरोखरच सारा महाराष्ट्र ज्ञानेश्वरमय झाला.

अशा या महात्म्याची थोरवी सांगणे म्हणजे महाकठीण काम आहे. ज्ञानेश्वर ही एक केवळ संत व्यक्ती नसून तो एक प्रगाढ अभ्यासाचा विषय बनला आहे. ज्ञानेश्वरीच्या लिखाणाला यंदा सातशे वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने जिकडेतिकडे ज्ञानेश्वरांवर नव्याने अभ्यास केला जात आहे.

ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास प्रकर्षाने आपणाला असा निष्कर्ष काढता येतो की, ज्ञानेश्वरांनी भक्तिमार्गाचा अवलंब केला. पण तो भक्तिमार्ग केवळ मनोरंजनात्मक नव्हता. त्यांना समाजातील उच्चनीच भेदभाव त्याचप्रमाणे धर्मभोळेपणा व धर्मढोंगीपणा नको होता. म्हणूनच त्यांनी आपल्या अभंगातून–कीर्तनातून–प्रवचनातून अशा या ढोंगीपणावरती कोरडे ओढायला सुरवात केली.

तो काळ एक विशिष्ट परिस्थितीचा होता. ज्ञानाच्या मक्तेदारांनी कट केला होता. मराठी भाषेला हीन मानले होते. संस्कृतचा पगडा या समाजावरती बसविला होता. पण केवळ मूठभर लोकांकडेच ज्ञानाची मक्तेदारी असल्यामुळे हे ज्ञान सर्वसामान्य माणसाला घेता येत नव्हते. महाराष्ट्राच्या संस्कृतीला अशा प्रकारे हा राहू ग्रासू लागला होता. अंधार पूर्ण दाटलेला होता. परंतु अशा कठीण काळामध्ये पैठण क्षेत्री ज्ञानेश्वर जन्माला आले.

आणि काय आश्चर्य ! वाळीत टाकलेल्या या संन्याशाच्या पोराने कमाल केली. महाराष्ट्रामध्ये ज्ञानेश्वरांची गर्जना झाली. 'भगवद्‌गीता' ही संस्कृत भाषेमध्ये होती. मूठभर लोक सोडले तर संस्कृत भाषा कोणालाही येत नव्हती. अशा वेळी हे ज्ञान समाजातील प्रत्येक थरापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. म्हणूनच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे म्हणतात–

संस्कृत भाषेची भिंत । करूनी आघात । त्यांनी फोडीली । अज्ञाना दीन दलिता । भगवत् गीता । त्यांनी वदविली ।।

ज्ञानेश्वरांनी आपल्या योगाच्या सामर्थ्याने त्यांच्या जीवनात फार मोठे चमत्कार करून दाखविले. पैठणला शुद्धिपत्र आणायला गेलेले असतांना भटजींच्या सांगण्यावरून त्यांनी रेड्यामुखी वेद वदविले. विसोबा खेचराने मुक्ताईला खापर मिळू दिले नाही म्हणून बहिणीची इच्छा पूर्ण करण्यासाठी पाठीवर मांडे भाजले, ज्यांने मृत्यूवरही विजय मिळविला होता असा तो चांगदेव वाघावर बसून हातात सर्प म्हणून चाबूक घऊन आला असतांना त्याला प्रत्युत्तर म्हणून ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे ज्या भिंतीवरती बसली होती ती भिंतच आपल्या योगाच्या सामर्थ्याद्वारे त्यांनी चालविली आणि शेवटी त्यांनी जिवंत समाधी घेतली. अशा कितीतरी अद्भुत घटना त्यांच्या जीवनात घडल्या. त्यातील काही घटनांवरती संशोधन चालू आहे. वादविवाद देखील आहेत. हे सर्व वादविवाद विसरता ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याचे जर आपण अवलोकन केले तर त्यांना सामाजिक समता अपेक्षित होती. उदा. रेडा वेद बोलला याचाच अर्थ असा की रेड्यासारखा 'मठ्ठ' माणूस देखील वेद बोलू शकतो. आणि म्हणूनच मराठी भाषेतील आद्य क्रांतिकारक कोण असतील तर ते ज्ञानेश्वर होत. ज्ञानेश्वर नुसतेच क्रांतिकारक नव्हते ते ज्ञानमार्गी बंडखोर होते.

त्यांनी स्थापन केलेल्या भागवत धर्माची पताका डौलात फडकतांना आज आपण पहात आहोत. दर वर्षी देहू आळंदीवरून आषाढीला पंढरीला वारी जाते, दरवर्षी हजारो भाविक भक्तिभावनेने यात सामील होतात. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात कोठेही अशाप्रकारचा सोहळा आढळून येत नाही. आषाढीच्या वा कार्तिकेच्या वारीचे कोणालाही निमंत्रण पाठविले जात नाही. फोन केले जात नाहीत. असे असतांना देखील ठरलेल्या दिवशी आळंदी–देहूवरून भूवैकुंठ भूमी म्हणजे पंढरी येथे लक्षावधी भाविक भक्तिभावाने न चुकता नेमाने एकत्र येतात.

दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।

आणि हीच खरी संत शिरोमणी ज्ञानेश्वरांच्या अद्भुत कार्याची महती होय.

*

# हिन्दी विभाग

## 'देव देव' आलसी पुकारे

(गुंजन गुप्ता ११ वी सायन्स)

हम मानवको दो श्रेणियों में विभाजित कर सकते हैं, प्रथम कर्मवीर, द्वितीय कर्मभीरु। कर्मवीर, संसार और समाज में अनंत असफलताओं, संघर्षों और हानियों से लड़ता हुआ अपने पथको स्वयं प्रशस्त करता है। कर्मवीर का सिद्धांत होता है 'करो या मरो'। इसके विपरीत कर्मभीरु मनुष्य काम करने से डरता है। स्वावलम्बन और आत्मनिर्भरता उससे कोसों दूर खडी रहती है, न उसमें उनके आव्हान की शक्ति है और न आदर की। क्या आपने कभी सोचा कि इस प्रकार के कर्मभीरु मानव के पुरुषार्थ और शक्ति को उससे किसने छीन लिया? उदासी ने उसके जीवन में घर क्यों बना लिया? आप इसका केवल एक उत्तर पायेंगे उसके सुनहरे जीवन को आलस्यरूपी कीटाणुने खोखला बना दिया है।

आलस्य मानव जीवन का सबसे बडा शत्रू है। वह उसके समस्त रचनात्मक शक्तियों को छीनकर उसके जीवनको मिट्टी का पात्र बना देता है। अलसी मनुष्य ही दैव का, भाग्य का, काल और समय का अनावश्यक आश्रय लेते हैं। ऐसे कायर पुरुषों का जीवन होता ही है केवल इसलिये निंदित और तिरस्कृत होकर दूसरों के बल पर जीवन बिताये।

आलसी भी चाहता है कि मैं भी औरोंकी भाँति काम करूँ, आगे बढूं, परंतु आलस्य-जिसने उसके आत्मविश्वास, शक्ति को नष्ट कर दिया है, आगे बढने के समय टांग पकडकर उसे घसीट लेता है। पग-पग पर उसे जीवन में कष्ट उठाने पडते हैं। परिणाम यह होता है कि वह जीवन से विमुख होकर उदासीन बन जाता है। चारों ओर से उसे निराशा घेर लेती है।

आलसी मनुष्य स्वयं तो कुछ कर नहीं सकता परंतु दूसरों के दोषों पर उसकी दृष्टि रहती है। उसके जीवन की उन्नति को आलस्य समाप्त कर देता है। मानव स्वयं अपने भाग्य का विधाता है। वह अपने उद्योग से, अपने अथक श्रम से अपने भाग्य

की रेखाओं को भी बदल सकता है। कर्मठ अपने उद्योग से अपना तथा समाज का अभ्युदय करता है। केवल जो आलसी होते हैं वे ही दैव-दैव पुकारा करते हैं, जिससे न वे स्वयं उन्नति कर पातें हैं और न समाज के प्रति अपने कर्तव्य का पालन कर पाते हैं।

भगवान श्रीकृष्ण ने भी गीता में अर्जुन को कर्मयोग का ही उपदेश दिया है। संसार में आकर मनुष्य को कर्म करना चाहिए तभी वह मानव कहलाने का अधिकारी है। उद्योग से मानव में स्वावलंबन की भावना का उदय होता है। वह अपना, समाज और देश का कल्याण कर सकता है। आलसी व्यक्ति धोबी के कुत्ते की तरह होता है जो न घर की रखवाली करता है और न घाट पर ही जाता है। कहने का तात्पर्य यह है कि आलसी व्यक्ति न अपना भला कर सकता है और न अपने परिवार का, न समाज का और न अपने राष्ट्र का।

# राखी

राखी का त्योहार, आया राखी का त्योहार ॥
भैया की कलाई पर राखी बाँधु।
तिलक लगा आरती उतारुँ।
नयनों की ज्योति, तेल है मेरा प्यार,
सजा लायी में आरती का थाल।
आया राखी का त्योहार ॥

राखी के ये धागे चार।
बाँधा है नित इनमें प्यार।
भाई है मेरे जीवन का सार।
उसीसे मेरे जीवन में बहार।
आया राखी का त्योहार ॥

जुग-जुग जिए मेरा भाई।
दीर्घायु हो, मेरी दुहाई।
हर साँस मेरी चाहे तुम्हारा प्यार।
यही मेरी मन-वीणा की झंकार।
आया राखी का त्योहार ॥

बाँधी कलाई पर रेशम की डोरी।
निभाओ बंधन, बहना हूँ तोरी।
हर नजर चाहे मेरी, तुम्हारा दीदार।
मेरे मन-बगीचे में है तुमसे ही बहार।
आया राखी का त्योहार ॥

आज का दिन है बडा खुशीका।
भाई के माथे पर चंदन का टीका।
मिले उसे जीवन में चिर-सुख का आगार।
मन कहता है मेरा यही बारबार।
आया राखी का त्योहार ॥

– शिल्पा सुरेन्द्र पुरंदरे
११ वी सी

# बापू

बापू, बलिदान ने आप के क्या किया ?
दर्द सिर्फ हमें दिया ॥
इन्सानियत तो कहीं भी नहीं दिखती,
दानवता जा रही है और भी बढती ॥
सत्य-अहिंसा है, स्वार्थ का सहारा,
हिंसा-बेईमानी, आदमी का धर्म बना रहा ॥
आज देश को जरूरत है 'बापू' की,
उन्हीं के सत्य की और अहिंसा की ॥
'बापू' के आदर्शों के नारे न लगाना,
'बापू' बन के कोई हमें दिखाना ॥

– संतोष कृ. वाळके

# जवाहरलालजी के पश्चात् का भारत

– मृदुला फाटक

" सारे जहाँ से अच्छा
हिन्दोस्ता हमारा । "

बडे अभिमान से हम गाते हैं यह गीत, परंतु क्या हम इस हिन्दुस्तान को सारे जहाँ से अच्छा बनाने की कोशिश कर रहे हैं ? या अवनति की गर्त में ढकेलते जा रहे हैं ? क्या यही ' शांतिदूत ' पंडितजी के सपनों का भारत है ? जहाँ शांति कहीं क्षणभर के लिए भी दृष्टिगोचर नहीं होती । आज भारत में चहुं ओर कोहराम मचा हुआ है । दुनिया को शांति और एकता का संदेश देनेवाले बापू और पंडितजी कि आत्मा अपने ही देश में फैलती इस अशांति और विषमता को देखकर कितनी तड़पती होगी ।

१८५७ से १९४७ तक देशवासियों पर एक जुनून सवार था । सभी देशप्रेम के पागल थे । हमारी स्वतंत्रता उनके इस पागलपन का ही परिणाम है । स्वतंत्र भारत की बागडोर प्रधानमंत्री बनकर पंडित जवाहरलाल नेहरूजी ने अपने हाथों में ली । वे देश के पुर्ननिमाण के काम में तन-मन से जुट गए । देशहित के लिए पंडितजी ने विदेशों के साथ अच्छे संबंध जोडे । उनका एक ही लक्ष्य था – भारत को प्रगति के पथ पर ले जाना ओर उसका सर्वांगीण आर्थिक विकास करना । चौबीसों घंटे अपने आप को देश के काम में व्यस्त रखकर ही वे हमारे आदर्श बनें । बडे-बूढ़ों ने तो उन्हें चाहा ही परंतु छोटे बच्चों के तो वे ' चाचा – नेहरू ' बन गए । एक न एक दिन तो हर किसी को जाना ही है , पंडितजजी भी चले गए परंतु जाने के पहले वे देश की उन्नति को गति दे गए । राजनैतिक तथा सामाजिक जीवन में एक नई चेतना जगाकर गए । भारत का नाम दुनियाभर में ऊँचा उठाकर चले गए ।

पंडित नेहरूजी के चले जाने के बाद भारत का यह चित्र भी बहुत जल्द धुंधला होता गया । राष्ट्रहित की जगह बहुत जल्द स्वहित ने ली । नेहरूजी का आदर्श सामने रखकर जो सत्ताधारी बने, उन्होंने उस आदर्श का उपयोग केवल अपने स्वार्थ के लिए ही कर लिया । नैतिकता की जगह स्वार्थ की राजनीति फलने – फूलने लगी । राजनीति के खिलाडियों ने ' बहुजन हिताय, बहुजन सुखाय ' को ' स्वहिताय, स्वसुखाय ' में बदलकर खेल खेलना प्रारंभ किया । ईमानदारी की जगह बेईमानी ने और शिष्टाचार की जगह भ्रष्टाचार ने कब ली किसीको पता भी न चला ।

परिणाम भी तुरंत दिखने लगा । राजनीतिज्ञों की भ्रष्टाचारी नीति से तंग आकर क्रांति जगह – जगह जन्म लेने लगी । विद्रोह धधकने लगा । इस विद्रोह की एक चिनगारी ने पंजाब में तो वडवानल का रूप धारण किया । सारे पंजाब को धूल में मिलाने के लिए वह अपनी धधकती जिव्हा फैलाने लगी । आतंकवादियों ने राज्य और केंद्र सरकार के नाकों दम कर दिया । अपनी खलिस्तान की माँग पर वे अडे रहे ।

भारत की उन्नति से जलनेवाले विदेशों को सुनहरा मौका मिला । बहती गंगा में उन्हों ने हाथ धोना प्रारंभ किया । भारत के गद्दारों की सहायत कर, भारत में अशांति फैलाने का सौभाग्य उन्हें हासिल हो गया । आज कोई खलिस्तान माँग रहा है; कल

कोई गुरखालैंड माँगता है; आसाम में 'बोडो आंदोलन' चलता है; और इन सब पर कोई ठोस उपाय नहीं मिलता। शासक इसकी ओर से आँखें बंद कर लेते हैं। सत्ताधारी पक्ष इसकी जिम्मेदारी विपक्ष पर और विपक्ष सत्ताधारी पक्ष पर डालते हैं। हर किसी बहाने को लेकर बस, एक दूसरेपर कीचड उछालते रहते हैं। इसी में धमाका उठता है 'बोफोर्स' का। चुनाव को लक्ष्य मानकर ऐसे विषयों का लाभ उठाया जाता है। और अनाडी की भाँति आम जनता राजनीति के खिलाडियों का यह खेल विस्मित हो कर देखती रहती है। कहाँ वे नेहरूजी आदि नेता, जो देश की समस्या को नीजि समस्या मानते थे; और कहाँ ये तत्वहीन राजनीति को अपनाने वाले स्वार्थी नेता। परिणामत: देश की एकता में भंग निश्चित होता है। मेरठ ओर मोगा हत्याकांडों को हम चुपचाप देखते, सहते जाते हैं।

एकता को टूटते हुए, अनीति और महँगाई को बढते हुए हम खुली आँखों से देखते है। आपदग्रस्त, आदिवासी, हरिजन आदि की समस्याओं का हल कोई ढूंढता ही नहीं। देश में नशीली दवाओं का प्रभाव बढता जा रहा है। जीवनावश्यक चीजों की माँग कभी पूरी नहीं की जाती है। परंपरा आधुनिक रूप धारण करती है। कहीं कोई रूपकँवर मौन–मूक सती जाती है। दहेज के कारण तो कितनी ही युवतियाँ अग्नि-परीक्षा दे देती है। जंगल–खेत उजाडकर मिलें खडी हो जाती है। क्या यही पंडितजी के सपनों का भारत था? हम सबके 'मेरा भारत महान' कहने में कितना खोखलापन है।

अगर हमें वास्तव में पंडितजी का स्वप्न, सत्य बनाना हैं; तो इस देश के इतिहास को याद करना होगा; क्रांतिवीरों के त्याग को याद करना होगा। तन – मन – धन से भारत को महान बनाने की कोशिश में जुट जाना होगा। हम सबको प्रार्थना करनी होगी।

"सुर कहता है साथ दे, दिया कहता है बाती दे। हे परमात्मा,

हम सबको पंडितजीका सपना, सत्य करने की, क्षमता दे, प्रगति का वरदान दे।

'जय हिंद'

*

---

# श्रद्धांजली

ए खुदा, मैंने तुझे हर जगह ढूंढा
पर तू कहीं नहीं मिला।
ढूंढा तुझे मंदिर में, मस्जिद में,
गिरिजाघर, गुरुद्वारे में,
पर तू कहीं नहीं मिला।
ढूंढा तुझे दिन के उजाले में,
अंधेरी रात के सन्नाटे में,
पर तू कहीं नहीं मिला।
पर मेरी कोशिश व्यर्थ नहीं गई,
तेरी–मेरी आखिर मुलाकात हुई।
यहीं इसी दुनिया में, 'भगवान' नाम के
इन्सान में, प्रकट रूप तेरा पाया मैंने।
ए खुदा, तू तो न मिला,
पर जिसे मैंने माना खुदा
उसे भी क्यों किया जुदा?
जिंदगी की सफर में हर एक को जुदा होना है।
जानेवाले को वापस नहीं बुलाऊँगा,
उनकी आत्मा को चिरशांति दे,
यही प्रार्थना करूँगा।

विजय पाटील

*

# 'आतंकवाद'–समस्या और समाधान

सुनीता गौड (११ वी विज्ञान)

हँसता–खिलखिलाता, जिंदादिल पंजाब आज सुबकियाँ ले रहा है। आतंकवादी स्थान–स्थान पर मासूमों के लहू से होली खेल रहे हैं। निरीह बच्चे अनाथ, बेसहारा हो रहे हैं तो युवतियों के सिंदूर खून से धोए जा रहे हैं। बूढे माँ–बाप अपनी बुढापे की लकडी को चिता की अग्नी में जलते हुए अपनी ही आँखो से देख रहे हैं। कैसी है ये विडंबना, कि जीवनपर्यंत गुरुद्वारों में उपासना करनेवाले हिन्दू परिवार आज हिंसा के शिकार बने हैं।

पंजाब के जिन सीमावर्ती क्षेत्रों में आज आतंकवाद जोरों पर है वहाँ अधिकांश हिन्दू परिवार हैं। पंजाब में पनपते आतंकवाद से घबराकर, हजारो हिन्दू परिवार वहाँ से कूच कर जगह–जगह शरण ले रहे हैं। क्यों छोड रहे हैं ये अपना घर और कितना उचित है इनका भय? शरीफ, असुरक्षित लोगों को बसों से उतारकर उनका कत्ल कर देना कहाँ की बहादुरी है? बसों, रेलों आदि में बम छिपाकर रखना कहाँ तक उचित है?

आतंकवाद से उत्पन्न समस्याओं का वर्णन करना असंभव है, क्योंकि आतंकवाद ऐसा अनोखा विष–वृक्ष है, जिसकी जडे ऊपर की ओर और शाखाएँ नीचे की ओर विकसित होती हैं। इसकी विषाक्त शाखाओं पर बैठ–बैठकर मानव–मानव का रक्त चूस रहा है। इस घिनौनी प्रवृत्ति ने हमारे देश एवं उसकी महान आत्माओं को विशेष क्षति पहुँचाई है।

आतंकवाद का सामान्य जनजीवन पर विशेष प्रभाव पडता है। इसके कारण राष्ट्रीय संपत्ति की क्षति होती है। स्कूल, कॉलेज. यातायात, कार्यालय, मिल–कारखानों का कार्य ठप्प पड जाता है। शहरों में कर्फ्यू का माहौल होता है।

स्वर्णमंदिर के हादसे में कई निरीह इन्सान मारे गए। देश की आर्थिक, सामाजिक व राजनीतिक स्थिति ध्वस्त–पस्त हो गयी। लोगों में इतनी हिम्मत नहीं कि वे आतंकवाद का डटकर मुकाबला कर सकें।

हमारा इतिहास क्रांतिकारी शहीदों ने अपने लहू से लिखा है; हमें आज तक उससे प्रेरणा भी मिली है। परंतु क्या भावी पीढी उससे कुछ प्रेरणा हासिल कर पाएगी? यह आतंकवाद उन्हें ऐसा करने नहीं देगा। नई पीढी को शहीदों की यादें भुलाने के लिए वह विवश करेगा। आतंकवाद हमारी नई पीढियों के दिलो–दिमाग पर ऐसा हावी हो जाएगा कि उनमें देशभक्ति की जगह देशद्रोह बडी तेजी से पनपने लगेगा। देशद्रोह की इस बाढ को प्रलंयकारी रूप धारण करने में देर नही लगेगी।

समय रहते ही हमें सचेत होना होगा। खरगोश बने आदमी के दिल को शेरदिल बनना होगा। आतंकवादी लोगों के खिलफ विद्रोह कर उन्हें और उनकी प्रवृति को जड समेत उखाडना होगा; इसके लिए प्राणोंकी परवाह न करते हुए तैनात होना होगा। इस काम में आम आदमी को सुयश प्राप्त हो, इसलिए सरकार को भी उचित कार्यवाही करनी होगी। गरीब, निरीह जनता की हरतरह से सहायता करनी होगी। आतंकवाद को उखाड फेंकने के लिए सरकार और आज जनता दोनोंका सहयोग आवश्यक है।

आतंकवाद की समस्या के समाधान के लिए धर्मोन्माद को भी मिटाना जरूरी ह। आतंकवाद के

घातक परिणामोंसे आगाह करनेवाली उचित शिक्षा आम जनता को दी जानी चाहिए । धर्म और राजनीति के बीच के अंतर को स्पष्ट करना चाहिए। धर्मान्धों के सहारे राजनीति के दांव-पेंच लडाना अनुचित है । क्योंकि धर्म का संबंध मनुष्य की आत्मा से है और राजनीति का संबंध उसकी सभ्यता से है। सभ्यता के स्वार्थ के लिए आत्मा का हनन कतई अच्छा नहीं हो सकता; बल्कि इसी आत्मा को ललकार कर हम आतंकवाद नष्ट कर सकते हैं। 'बापू' की कल्पना का 'सुराज्य' प्रस्थापित कर सकते हैं ।

*

# क्या होगा ?

वक्त कलम बनी
हादसे सियाही तो
तकदीर के पन्नों पर तब तो
कुछ न कुछ लिखा ही जाएगा ।
होगी क्या दासताँ
माहौल क्या होगा
आज क्या है, कल का पताही नहीं,
क्या से क्या हो जाएगा ।
पलकों में आँसू
होठों के पीछे हँसी कैद
क्या होगा किस्मत के न्यायालय में
और कौन रिहा हो जाएगा ।
दिल डूबा है आज
इरादों के नशे मे
झूम ले जिंदगी, जी भर आज
शायद कल ये नशा उतर जाएगा ।
खुशियों का जाम है
जिंदगी के प्याले में
छोडो भी, आज तो पी ले, जी ले,
कल देखेंगे, जब ये खाली हो जाएगा ।

— रेखा शर्मा
एस. वाय. बी. एससी. ए.

*

# सफर

सफर के लिए ही तो आए थे हम,
अकेले थे, मिले राह में हमकदम ।
मंजिल अलग थी, अलग थे खयाल,
जाने ये कैसे मिले बेमिसाल ।
चलते-चलते ये एहसास हो रहा है,
कि कारवाँ बदल रहा, है, रास्ते बदल रहे हैं,
कदम वही है. तन-बदन भी वही है,
ठान ली थी जिसपर, वे इरादे बदल रहे हैं ।
लब्जों में कैसे इन्हें बयाँ मैं करूँ,
बुलबुले ये दिल के हवा हो रहे हैं ।
कल की किरणें किस दिशा में चमके
शाम ढलने से पहले पता न चले ।
हमसफर के सहारे वक्त पर चल रहे हैं,
नई मंजिलों की खोज में हम चल रहे हैं ।
साथ तो आपका दो कदम ही रहा है,
उम्मीदों के डोरों से बांधे जा रहे हैं ।
निकल पडे हैं, निकल ही जाएँगे हम,
सफर के लिए ही तो चल पडे हैं, हम ।

— निरंजन जोशी
११ वी शास्त्र सी.

*

# झलक

जा लगा दिलमें हमारे,
जो तीर तुमने छोडा ।
क्या हाल सुनाऊँ आपको,
दिल ने धडकना छोडा ।
ऐसे नजर के तीर न चलाओ,
हम आपको याद आएँगे ।
आप की याद तो आती रहेगी,
याद हमारी तुम्हें भी सताएगी ।
प्यार में तडपना भी होता है ।
विरह की अग्नि में जलना, तुम भी जानोगी ।
तनहाई में हमने दिलको समझाया,
अब समझाना तुम भी जानोगी ।

— अ. समद गोलंदाज
एस. वाय. बी. एससी. बी,

*

# मकसद

आँसू पीने के लिए होते हैं,
बहाने के लिए नहीं ।
गम भुलाने के लिए होते हैं,
किसीको दिखाने के लिए नहीं ।
आँसू पीते जाओ,
गम भुलाते जाओ,
खुशियाँ लुटाते जाओ ।
आँसुओं को पीकर, गमों को भुलाकर,
खुशियोंको लुटाकर ही होगा,
पूरा हमारी जिंदगी का मकसद !

— ज्योति श्रीकांत शिवतरे
एफ. वाय. बी. ए.

*

# माया है

हर आज,
बीते कल की छाया है ।
हर आज,
अगले कल की काया है ।
छाया की काया,
और,
काया की छाया,
बस,
यही तो उसकी,
माया है ।।

— यशवंत राठोर
एस. वाय. बी. कॉम. बी.

*

# ऐसा भी होता है

ये मासूम भोले चेहरे
वक्त गुजरने पर नकाब लगने लगते हैं ।
मजबूरी समझे थे किसीकी
वक्त गुजरने पर बहाने लगने लगते हैं ।
चढाने चले, जो श्रद्धा के फूल.
चरनों तक पहुँचते–पहुँचते अंगारे बन जाते हैं ।
सजाई थी, अरमानों की डोली,
वक्त गुजरने पर चिता की आग होती है ।
मिले सफर में ऐसे लोग
जिनकी दोस्ती, दुश्मनी निभाती रहती है ।
क्या कहूँ, ये जिंदगी, ये मौत
किसी मोडपर ये एक सी लगने लगती है ।

— रेखा शर्मा
एस. वाय. बी. एससी. ए.

*

# जिन्दगी की ट्रैन

जन्म के टरमिनस से
धडकनों को
लाईन क्लीयर पाकर,
चल पडी
जिन्दगी की ट्रेन,
मौत के मुकाम पहुँचने केलिए।
फर्स्ट,
सैंकण्ड,
थर्ड,
सभी श्रेणी के डिब्बे।
माँ–बाप,
भाई–बहन,
बेटा–बैटी,
पति–पत्नी,
प्रेमी–प्रेमिका,
दोस्त–पडोसी,
मुसाफिर हैं,
विभिन्न श्रेणियों के।
टिकर का मूल्य ?
स्वार्थ–
मुख्य जंक्शन–
शादी–
चढाव–उतार ?
गरीबी–अमीरी,
कोयला की जगह हविश
और पानी के बदले–
शोक–
गार्ड का दिल,
और ड्राईवर ?
दिमाग।
पाप–पुण्य की
दो पटरियों पर
चलती है,
जिन्दगी की ट्रेन।
संतुलन बिगडा
ट्रेन गिरी–
मौत से पहले
जान चली।
जन्म के टरमिनस से
धडकनों को
लाईन क्लीयर पाकर,
चल पडी
जिन्दगी की ट्रेन,
मौत के मुकाम पहुँचने के लिए।

– यशवंत राठोर
एस. वाय. बी. कॉम. बी.

*

# इंग्रजी विभाग

## Air Pollution

**Rajiwade Laxman M.**
(T. Y. B. Sc. Chemistry)

Destruction of environment through all round pollution is a global problem. It is perhaps the most serious problem before the world, perhaps more serious even than the threat of a third world war. Like many other countries in the world, India is also facing this problem. Its root cause is population explosion. To fulfil the ever increasing daily needs of the ever increasing human population, all countries, ( perhaps with exceptions few and far between ) are engaged in large scale destruction of the environmnt; thus they are putting the earth in peril for purely short term benefits, and making it unsafe for future generations.

Thoughtless exploitation of such natural resources as wood, coal, fossil fuels etc, is making the problem of air pollution more acute with every passing day. The earth is covered with the coat of atmosphere. Atmosphere is notheing but air which is a mixture of all kinds of gases likes oxygen, hydrogen, nitrogen etc. Air is essential for every kind of life, for life exists in the air; air sustains life. But man, like a pest, is destroying that which gives sustenance to his life. Man is responsible for creating the problem of air pollution through his high technology and his sophisticated, expensive and materialistic way of living. Pollution is the high price that we are paying for it.

There is all round pollution everywhere,

on land, in the seas, in the rivers and in the air. It makes the air foul by smoke, gases and chemicals spued out by vehicles, machines etc. In addition to these all there are industrial wastes and effluents which pollute the atmosphere.

Scientifically, air-pollution may be defined as " the concentration and duration of air-contaminants that i ) cause a nuisance, ii ) are harmful to all kinds of life–human, animal and vegetable life, iii ) interferes with comfortable enjoyment of life, property and conduct of business.

A recent example of air-pollution is the tragedy of Bhopal in which thousands of people lost their lives as a result of the leakage of a toxic gas ( phosgene ) from a factory. Among other Indian cities which are getting dangerously polluted we may mention Bombay, Calcutta, Madras, Pune.

Air pollution is going beyond tolerance limit, and is making human life difficult. Man cannot survive even for a few minutes without pure air, and polluted air affects his health adversely. Some of the bad effects of air–pollutin are as follows–

i ) Its inhaltion causes headache, drowsiness, dizziness and even vomitting.

ii) The fumes of sulphur dioxide ($SO_2$) are harmful to the respiratory system.

iii ) It may cause lung cancer.

iv ) Microbes in polluted air may cause influenza or T. B.

v ) It causes ' smog ' and obstructs the vision of pilots and thus causes air– craft accidents.

vi ) It many cause damage to standing crops by entering the leaves of plants; it may reduce photosynthesis.

vi ) It poisons air and reduces the ozone layer of the earth – thus it exposes the earth to the radiation of the sun. If the ozone layer is destroyed, mankind will perish.

So it is essential to take immediate and effective steps to fight air–pollution. Some preventive measures are as follows–

i ) Air can be purified by natural purification. Sunlight, rain and vegetation play an important role in this process. As for instance, ultra violet rays in sunlight destroy microbes; the rain dissolves harmful gases and plants utilsie $CO_2$ in the air and release oxygen in photosynthesis. So parks, gardens and clean open spaces are very useful in fighting air pollution. But this natural process of air–purification is not adequate to solve the modern problem of allround air – pollution; it has its limitations.

ii) Artificial methods are necessary to control air pollution. These must be applied compulsorily on large scale in all industries. Their aim should be to minimise the emission of air–pollutants, to recover pollutants and to re–process and re–use them, to convert them into harmless by–products, to increase efficiency in using fuels and chemicals and to avoid waste.

Environmental scientists are impressing upon governments the urgent need to adopt these measures. It is the duty of every citizen to cooperate with them in their efforts to save our world from destruction.

# An Unforgttable Visit

**Rajalaxmi Parameswaran**
Class – IX C

Chug ! Chug ! Squeek ! Quick, the train is here ! These were some of the sounds I could hear at the railway station. I was waiting for my parents to arrive from Madras, for I was told that the train was late by thirty minutes. I sat down on a bench and gazed around me, watching the people, the stray dogs, cats and what not. My favourite pastime is watching people for God has made us in such a variety. It is absolutely true that it takes all types to make this world.

On my right, one bench away sat a lady of a huge circumference. She was eating ba nanas. I watched her peel the banana with great rapidity and put it into her mounth. One ! plop ! two, plop ! three, and so it went on till she had finished 12 bananas in just three minutes. Wow ! What a record ! She saw me gaping at her with an impressed look in my eyes and immediarely turned her head away. The banana peels were scattered all around the bench for after each banana she would throw the peels around her with great quickness

Then my attention was drawn to a thin and bespectacled man clutching a bag and walking towards me with long strides. He had focussed his eyes away from the groud and was looking at a train behind me. The result–he failed to see those treacherous peels. SWOOOOSH ! and a perfect landing ! The man landed on the floor with a shout and his glasses landed near him in pieces. All burst out laughing and I had difficulty in restraining myself because, I knew that may be I could meet with the same fate someday. The fatty who had been lost in dreamland woke up with a start and began scolding the man for disturbing her sweet sleep. The poor man ! He tried to make the lady realise that she was the root cause for everything but failed miserably.

The lady had more energy than him (naturally after having eaten 12 bananas !) On receiving a freezing scowl from her he fled howling to catch his train all the while cursing his fate. After he left the scene I burst out laughing. His face, when he fled from the lady was a real sight. If only I had a camera to capture it !

On my left I saw two dogs fighting- I watched them eagerly--one Mohammed Ali and the other Tyson. Both were equally matched. Tyson gave a punch to Ali and Ali in turn kicked Tyson. Forgetting that they were boxing, they bit each other's ears, scratched each other's legs. I wished they could understand human language so that I could be their referee. The first referee of such a kind,-straight I would land in the Guiness Book of World Records. While I was dreaming so I heard a hoot of a train. It was my parent's train. So much for Ali and Tyson ! I got up eagerly to meet my parents but the next moment I found myself on the ground. The same banana peels thrown by the fatty had brought me to the ground. What an experience !

# प्राध्यापकांची कामगिरी

**या वर्षात प्रकाशित झालेली पुस्तके–**

१) डॉ. सुरेश धायगुडे, 'पाश्चात्य साहित्यशास्त्र– सिद्धांत आणि संकल्पना' (निर्भय प्रकाशन, पुणे ३०.)

२) डॉ. दत्तात्रय पुंडे, 'कुसुमाग्रज–शिरवाडकर : एक शोध' (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे), 'वाङमयीन निरीक्षणे' (प्रतिमा प्रकाशन, पुणे,) संपादन 'केशवसुतांची निवडक कविता' (कै. डॉ. भीमराव कुलकर्णी व प्रा. भालचंद्र फडके यांचेसह), 'धर्मानंद : निवडक ललित' मध्ये सहलेखन.

३) प्रा. वाल्मीकी अहिरराव– Environmental Science Part I and II (निराली पब्लिकेशन्स, पुणे).

४) प्रा. सौ. कुलकर्णी व प्रा. झगडे– 'आरेखन' व 'Representation of Maps' (निराली प्र., पुणे).

५) प्रा. सौ. सुधा शाळिग्राम 'सामान्य मानसशास्त्र' (डॉ. भरत देसाई व प्रा. गीता मेहता यांचे बरोबर सहलेखन). 'मराठी नाटक आणि मनोविकृती' (सहसंपादन).

६) प्रा. सौ. आशा परुळेकर 'आरसा–मानसशास्त्रीय प्रश्नसंच', 'सरबते व शीतपेये', 'पालक मार्गदर्शिका'

**इतर वैयक्तिक उल्लेखनीय कार्य–**

१) प्रा. सुरेश कृष्णदास मेहता– लक्ष्मी सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड, लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३ डी चे सह–कोषाध्यक्ष म्हणून निवड.

**चर्चासत्रे व तत्सम उपक्रम–**

मराठीचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचा मेळावा व चर्चासत्र–

मॉडर्न महाविद्यालय मराठी विभाग आणि मराठी प्राध्यापक संघटना पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ८९ रोजी कनिष्ठ महाविद्यालयीन पातळीवर मराठीचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचा मेळावा व एक दिवसाचे चर्चासत्र असा कार्यक्रम आयोजित केला होता. या चर्चासत्राचे संयोजन डॉ. वि. भा. देशपांडे, प्रा. मेधा सिधये आणि मराठी प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले. या चर्चासत्राचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी केले तर समारोप मराठीतील ज्येष्ठ समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी केला. कनिष्ठ महाविद्यालयीन पातळीवर मराठीचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या विविध समस्या, अडचणी व त्यावर उपाय या संदर्भात या चर्चासत्रात निबंधवाचन झाले. त्याचप्रमाणे मराठीच्या अभ्यासक्रमाच्या स्वरूपाबाबतही निबंधवाचन व चर्चा झाली.

## साहित्यप्रश्नमंच – एक नवीन स्पर्धा

९ व १० जानेवारी १९९० रोजी मराठी वाङमयमंडळाच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन पातळीवर एक साहित्यप्रश्नमंच स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेचे संयोजक डॉ. वि. भा. देशपांडे आणि प्रा. मेधा सिधये होते. आंतरमहाविद्यालयीन पातळीवर, केवळ मराठी साहित्याच्या संदर्भातील प्रश्नमंचस्पर्धेचा उपक्रम करणारे आपले महाविद्यालय हे पुण्यातील पहिलेच महाविद्यालय आहे, हे नमूद करण्यास आनंद व अभिमान वाटतो. या स्पर्धेचे उद्‌घाटन प्रा. ग. प्र. प्रधान यांनी केले. आपल्या उद्‌घाटनपर भाषणात त्यांनी साहित्याच्या श्रेष्ठतेबाबत व त्यामुळे होणाऱ्या संस्कारांबाबत आपले मौलिक विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर होते. उद्‌घाटनाच्या प्रसंगी ज्ञानेश्वरीतील नमनाच्या ओव्यांचे गायन झाले तर उद्‌घाटनाचा समारोप कविवर्य वसंत बापट यांच्या 'केवळ माझा सह्यकडा' या कवितेच्या गायनाने झाला. प्रा. सुषमा जोग आणि प्रा. व्हनकळस यांच्या मार्गदर्शनामुळे, प्रतिमा उपाध्ये, मंजिरी जोशी, पूर्वा कुलकर्णी, शिल्पा जोशी, गौरी मांडके, मंजिरी देशपांडे या विद्यार्थिनींनी आपल्या मधुर गायनाने आनंददायक वातावरण निर्माण केले.

या स्पर्धेसाठी एकूण २१ प्रवेश अर्ज आले. कनिष्ठ महाविद्यालयीन गटात विमलाबाई गरवारे प्रशालेच्या

विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक आणि स. प. महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. १५० व रु. १०० ची पुस्तके पारितोषिक म्हणून देण्यात आली वरिष्ठ महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक अभियांत्रिकी महाविद्यालयाने तर द्वितीय क्रमांक नौरोसजी वाडिया महाविद्यालयाने मिळविला. या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. १५० व रु. १००।– अशी रोख पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण प्राचार्यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या परीक्षक म्हणून डॉ. कल्याणी हर्डीकर आणि सौ. मंगला गोडबोले यांनी काम केले.

प्रश्नमंचस्पर्धेची ही कल्पना प्राचार्य डॉ. नवलगुंदकर आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. वि. भा. देशपांडे यांनी उचलून धरली व स्पर्धेसाठी संपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन केले. श्री. एस्. वाय्. कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी श्री. इनामदार, श्री. ए. पी. कुलकर्णी, श्री. खरे यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. मराठी विभागातील प्राध्यापकांखेरीज प्रा. नरगुंद, कुवळेकर, लिमये, गायकवाड, आगाशे या सर्वांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी खूप परिश्रम केले. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. अभिजित डांगे, फडके, मृदुला फाटक यांनी स्पर्धेच्या पूर्वतयारीपासून अखेरपर्यंत उत्साहाने कामे केली. सर्वांच्या सहकार्याने हा नवीन उपक्रम यशस्वी रीतीने पार पडला. मराठी वाङ्मयमंडळाच्या वतीने सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद !

प्रा. मेधा सिधये

## SEMINAR ON TRENDS IN CORPORATE FINANCE

The post–graduate department in the faculty of commerce organised a one day seminar on ‘ Trends in Corporate Finance ’ on Saturday, 24 th March 1990. Teachers from different colleges in Pune and outside areas, company executives and post graduate students participated in the seminar. The seminer was arranged in three sessions. Prof A. G. Gosavi worked as director of the seminar.

In the 1st session Prin. Dr. S. N. Navalgundkar gave an inaugural address. Prof. A. G. Gosavi read a paper on ‘ Trends in Corporte Finance– A Review. ’ The paper discussed the recent developmernt in corporate financing. Mr. M. M. Vaidya, Vice – President ( Finance ) Kirloskar Bros. Ltd., Pune presided over the session. In his concluding remarks and observations he indicated how the different methods of corporte financing were evolved to meet the varied needs of corporate enterprises.

The second session covered the topics of ‘ Lease Financing ’ and ‘ Commercial Paper. ’ Prof P. D. Parkhi read a paper on ‘ Lease Financing.’ The paper discussed the nature, merits and demerits of lease financing and the prospects of leasing companies. Prof. Y. R. Waghmare presented a paper on ‘ Commercial Paper ’–a new instrument of corporate finance, dealt with the nature,

features, regulations and other aspects of commercial paper. Mr. N. D. Patankar, General Manager, Kirloskar Leasing & Finance Ltd., Pune presided over the session. Prof. P. D. Parkhi and Mr. Patankar answered the questions raised in the discussion.

In the third session the following papers were presented–

( i ) Debentures as a source of finance– by Shri Sanjay Sonna M. Com. Part I.

(ii) Public Deposits – by Miss. Vidula Kulkarni, M. Com.

(iii) Increasing Responsibilities of Stock Exchange – by Prof P. C. Mutha.

In his paper Prof. Mutha discussed the growing responsibilities of the stock exchange with reference to Mega Issues, Takeovers, Double Taxing of Dividend, Delayed Payment of Dividend, Transfers, Control on Speculation etc. Mr. M. R. Mayya, Executive Director, Bombay Stock Exchange, presided over the session. In his concluding speech he explained the role of stock exchange and approach of authorities with reference to the points raised in the discusson.

Prof S. G. Datar summarised the deliberations of the seminar and proposed a vote of thanks.

Poona University and Kishor Pumps Ltd. Pimpri, Pune provided the funds for the organisation of the seminar.

Prof **A. G. Gosavi**
Vice – Principal
Director of the Seminar

# वार्षिक अहवाल १९८९–९०

## क्रीडा संघटना : वरिष्ठ महाविद्यालय

### –: उज्ज्वल यशाचे मानकरी :–

आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत पुरुष संघाने विजेतेपद मिळविले.
आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत मुलींचा संघ विजेता ठरला.
महाविद्यालयीन तृ. व. वाणिज्य शाखेतील विद्यार्थी श्री. कैलास बागल यांची अखिल भारतीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठ संघातर्फे निवड झाली.

### " श्री शिवछत्रपती " पुरस्काराचे मानकरी

१९८८–८९ ह्या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सरकारने कु. स्वाती कुलकर्णी ह्या विद्यार्थिनीला " शिवछत्रपती " पुरस्कार जाहीर करून सत्कार केला.

### पुणे शहर विभागातर्फे प्रतिनिधित्व केलेले महाविद्यालयीन खेळाडू

| | |
|---|---|
| १) श्री. राजेश गायकवाड | व्हॉलीबॉल |
| २) श्री. सुधीर पालांडे | ,, |
| ३) श्री. संदीप भागवत | ,, |
| ४) श्री. सतीश शिवरकर | ,, |
| ५) कु. गायत्री भोपटकर | कबड्डी |
| ६) कु. संगीता सोनावणे | ,, |
| ७) कु. विजया धुमाळ | ,, |
| ८) कु. शैलजा कुलकर्णी | ,, |
| ९) कु. माधवी कुबेर | ,, |
| १०) कु. भारती टिळक | खो खो |
| ११) श्री. जयंत गोखले | बुद्धिबळ |
| १२) कु. सीमा प्रधान | व्हॉलीबॉल |
| १३) कु. अर्पणा गोहाड | व्हॉलीबॉल |
| १४) श्री. विश्वजित मुंजे | वजन उचलणे |

१९८९–९० ह्या शैक्षणिक वर्षात आंतरमहाविद्यालयीन " वजन उचलणे " ह्या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयास जनरल चॅम्पियनशिप मिळाली. ह्यात श्री. विश्वजित मुंजे, श्री राजेंद्र काकडे, श्री तानाजी तोडकर, श्री. अभिजीत देशपांडे व श्री. अविनाश पाटील ह्यांची कामगिरी अतिशय मोलवान ठरली. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## पुणे विद्यापीठातर्फे आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी प्रतिनिधित्व

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश गायकवाड | द्वि. व. कला | व्हॉलीबॉल |
| श्री. सुधीर पालांडे | तृ. व. कला | ,, |
| श्री. संदीप भागवत | द्वि व. वाणिज्य | ,, |
| श्री. कैलास बागल | तृ. व. वाणिज्य | क्रॉसकंन्ट्री |
| कु. संगीता सोनावणे | द्वि. व. कला | कबड्डी |
| कु. विजया धुमाळ | द्वि. व. वाणिज्य | कबड्डी |
| कु. भारती टिळक | तृ. व. कला | खो खो |
| कु. अनीता रानडे | प्र. व. वाणिज्य | क्रिकेट |
| श्री. जयंत गोखले | प्र. व. काम्प्युटर | चेस |
| श्री. धनेश दळवी | तृ. व. वाणिज्य | बॉस्केटबॉल |

## राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत खालील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रतिनिधित्व केले

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश गायकवाड | द्वि. व. कला | व्हॉलीबॉल |
| श्री. सुधीर पालांडे | तृ. व. कला | व्हॉलीबॉल |
| श्री. सतीश शिवरकर | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| श्री. संदीप भागवत | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| कु. संगीता सोनावणे | द्वि. व. कला | कबड्डी |
| कु. भारती टिळक | तृ. व. कला | खो खो |
| श्री. जयंत गोखले | प्र. व. काम्पूटर | चेस |

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी आंतरवर्गीय स्पर्धा उत्साहाने भरविण्यात आल्या व यशस्वीपणे पार पडल्या

## वैयक्तिक सर्वसाधारण नैपुण्यपद

१) सतीश शिवरकर, S.Y. B.Com 'D' मुले
'मॉडर्न श्री' रमेश आगरवाल, S.Y. B.Com.

वरिष्ठ महाविद्यालयास मिळालेल्या यशामागे मा. प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग, व शिक्षकेतर कर्मचारी ह्यांचे सतत मिळणारे प्रोत्साहन व मार्गदर्शन आहे हे कृतज्ञतेने नमुद केले पाहिजे.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. जी. एम. बनसुडे, | श्री फयाज शेख, | कु. संगीता सोनावणे | श्री. के. एस. लागू |
| कार्याध्यक्ष | I. C. S. R. (Gents) | ( I. C. S. R. Ladies ) | क्रीडा संघटक |

# क्रीडा संघटना : कनिष्ठ महाविद्यालय ८९-९०

**उज्ज्वल यशाचे मानकरी–**

महाविद्यालयाचा मुलींचा कबड्डी संघ राज्य पातळीवरील स्पर्धेत अजिंक्य. खालील विद्यार्थीनींची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड.

१) कु. अनिता पारवे ११ वी कला.
२) कु. भाग्यश्री पारवे ११ वी कला.

मुलांचा व्हॉलीबॉलचा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयी.

महाविद्यालयाच्या राहुल थिटे ह्या विद्यार्थ्याची राष्ट्रीय पातळीवर जलतरण स्पर्धेसाठी निवड. तसेच अमरजितसिंग चौहान ह्याची कबड्डीसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली. राजेश कळसकर ह्यास राज्य पातळीवरील ज्युदो स्पर्धेत ५६ किलो गटात तृतीय क्रमांक.

नेहरू जन्मशताब्दीनिमित्त दिल्ली येथे भरलेल्या "भारतीयम्" साठी कु. वैशाली म्हाळगे व कु. वशाली खेडकर ह्यांची अनुक्रमे लेझीम व दोरीवरचा मल्लखांब प्रात्यक्षिकांसाठी पुणे विभागातर्फे निवड.

प्रतिवर्षाप्रमाणे आंतरवर्गीय सामने (सांघिक व वैयक्तिक) ह्याही वर्षी भरविण्यात आले.

मुलांचे सर्वसाधारण विजेतेपद १२ वी तुकडी 'ब' ह्या वर्गास मिळाले.

मैदानी स्पर्धा वैयक्तिक सर्वसाधारण विजेतेपद–

मुले – श्री राम राजमाने १२ वी कॉमर्स.
मुली– कु. स्वाधा भट ११ वी शास्त्र.

कनिष्ठ महाविद्यालयास मिळालेल्या ह्या यशामागे मा. प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी ह्यांचे सतत मिळणारे प्रोत्साहन, मार्गदर्शन आहे, हे कृतज्ञतेने नमूद केले पाहिजे.

प्रा जी. एम, बनसोडे
कार्याध्यक्ष

प्रा. विनोद छाब्रा
प्रा. विनय शेरीकर
क्रीडा संघटक

# कनिष्ठ महाविद्यालय शैक्षणिक अहवाल

**कनिष्ठ महाविद्यालय समिती ( १९८९–९० )**

कार्याध्यक्ष : उपप्राचार्य प्रा. पद्माकर आपटे

सदस्य : श्रीमती सुरेखा परब

सौ. वीणा नरगुंद

सौ. गौरी चाफेकर

सौ. रंजना देव

सौ. वसुंधरा कांबळे

श्री. भालचंद्र भोमे

कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी आणि बारावी वर्गाच्या प्रत्येकी दहा तुकडया आहेत. त्यात कला शाखा ४, शास्त्र शाखा ८, आणि वाणिज्य शाखा ८ तुकडया अशी विभागणी आहे.

१९८९–९० या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी अकरावीमध्ये नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना मा. प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले. शालांत परीक्षेत (इ. १०) बोर्डाच्या गुणवत्ता यादीतील गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या एकांकिका, नाटयवाचन, संगीत, वक्तृत्व इ. विविध स्पर्धांमध्ये इ. ११ व १२ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोठा होता. या स्पर्धांचा तपशील व निकाल कलामंडळाच्या अहवालात दिलेला आहे.

१२ वी शास्त्रमधील निवडक विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेत उत्तम यश मिळावे या हेतूने ' स्कॉलर बॅच ' हा विशेष उपक्रम चालविला जातो. १५ एप्रिल ते १० जून या काळात रोज सकाळी ११ ते २ या वेळात शास्त्र विषयाचे जादा तास घेण्यात आले. बोर्डाच्या धर्तीवर चाचण्या घेण्यात आल्या. ह्या ' स्कॉलर बॅच ' मधील विद्यार्थ्यांनी मार्च १९८९ मधील उच्च माध्यमिक १२ वीच्या परीक्षेत खूपच चांगले यश मिळविले.

स्कॉलर बॅच उपक्रमासाठी खालील शिक्षकांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळाले.

| | |
|---|---|
| रसायनशास्त्र | : श्री. रा. ग. लिमये श्री. गोखले, सौ. कुलकर्णी, सौ. चाफेकर. |
| पदार्थविज्ञान | : श्री. भोमे, श्री. दशपुत्रे, श्री. मराठे. |
| वनस्पतिशास्त्र | : श्री. दांडेकर, कु. भोसले. |
| गणित | : सौ. नवाथे, सौ. राजाध्यक्ष. |

वाणिज्यशाखेच्या हुषार विद्यार्थ्यांना खालील शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले.

सौ. नरगुंद, सौ. आगाशे, सौ. गोसावी, सौ. नवाथे, श्री. लिमये द. ल. इ. ११, १२ वी मधील मराठी विषयाची विशेष गोडी असलेल्या विद्यार्थ्यांना सौ. सिधये यांनी मार्गदर्शन केले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांना सहकार्य देणाऱ्या सर्व शिक्षकांचे हार्दिक आभार. वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल माननीय प्राचार्य यांचे आभार. पर्यवेक्षक कु. परब, तसेच कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्ग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार

प्रा. पद्माकर आपटे
उपप्राचार्य

## साहित्य — संघटना

कलाशाखेकडील भाषा व सामाजिक शास्त्रांच्या संदर्भात साहित्य संघटनेच्या विद्यमाने हिंदी विभाग, मराठी विभाग, मानसशास्त्र विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांनी पुढील कार्यक्रम आयोजित केले.

हिन्दी विभागातर्फे वक्तृत्व स्पर्धा, नाट्यवाचन स्पर्धा, व्याख्याने आयोजित करण्यात आली. महाविद्यालयात हिंदी दिवसही साजरा करण्यात आला. विभागाच्या वतीने विविध आंतरमहाविद्यालयीन आणि आंतरराज्यीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कु. मृदुला फाटक, कु. सुनीता सोनी व श्री. रवीन्द्र महाजन यांनी प्रथम तर कु. सपना अजित किशोर आणि कु. अपर्णा जड्डावार यांनी द्वितीय क्रमांकाचे यश मिळविले. कॅनरा बॅंकेतर्फे घेण्यात आलेल्या हिंदी वक्तृत्व स्पर्धेत कु. मृदुला फाटकला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रा. वाणी, प्रा. माळवे यांनी यासाठी मार्गदर्शन केले.

मराठी विभागातर्फे २ मार्च ९० रोजी डॉ. रामचंद्र देखणे यांचे ' लोककला – बहुरूपी भारुडे ' या विषयावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान, तसेच ६ मार्च ९० रोजी प्रा. आरती दातार यांचे ' देव चालले,' या दि. बा. मोकाशी यांच्या कादंबरीवर चर्चायुक्त व्याख्यान आयोजित केले गेले. डॉ. वि. मा देशपांडे आणि डॉ. स्नेहल तावरे त्यांनी त्यासाठी सहकार्य केले.

मानसशास्त्र विभागातर्फे येरवडा येथील केंद्रीय मानसिक आरोग्य आणि संशोधन संस्थेला तसेच ' कामायनी विद्यामंदिर, ' गोखलेनगर, पुणे, या संस्थेला द्वितीय वर्ष साहित्य शाखेच्या मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. या अभ्यास भेटी, प्रा. सुधा शाळिग्राम यांनी आयोजित केल्या. द्वितीय वर्ष मानसशास्त्र–विशेष विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ' शिक्षकांचे व्यक्तित्व आणि व्यावसायिक गुण आणि त्याचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम ' प्रा. विषयावर निबंध वाचले.

राजशास्त्र विभागातर्फे राज्यशास्त्र–विशेष घेणाऱ्या द्वितीय आणि तृतीय वर्ष साहित्य विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी ' म. फुले यांचे विचार ' या विषयावर निबंध–स्पर्धा आणि त्याला जोडून परिसंवाद आयोजित केला गेला. परिसंवाचे अध्यक्षस्थान डॉ. व. कृ. क्षीरे यांनी भूषविले. ' मार्क्सचे विचार आणि पूर्व युरोपातील सद्य:-स्थिती ' या विषयावर दि. ५ फेब्रु १९९० रोजी डॉ. राजेन्द्र व्होरा यांचे तसेच दि. १३ फेब्रु. १९९० रोजी डॉ. सुहास पळशीकर यांची ' सार्वत्रिक निवडणुका १९८९–९० या विषयावर ' या विभागातर्फे व्याख्याने आयोजित केली गेली. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सुनील कवडे यांनी या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले.

वरील सर्व कार्यक्रमांच्या संयोजनात सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन अधिकारी आणि कर्मचारीवर्ग यांचे अमोल सहकार्य लाभले.

**सुधा शाळिग्राम**

## कोहसिप – मानसशास्त्र – विभाग

मानसशास्त्र विभागाच्या वतीने कोहसिप योजने अंतर्गत खालील कार्यक्रम आयोजित केले गेले.

१) ' परिणामकारक अभ्यासात मानसशास्त्राचा कार्यभाग ' या विषयावर डॉ. एस्. बी. गोगटे यांचे १७ जानेवारी ९० रोजी उद्‌बोधक व्याख्यान झाले.

२) प्रा. अर्चना आंबेकर यांनी ८ फेब्रुवारी ९० रोजी ' महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्या–आकलन आणि निराकरण ' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. स्वतःच्या समस्या स्वत: जाणून घेऊन त्यांना सामोरे कसे जावे याचे दाखले देऊन वर्णन केल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे व्याख्यान मार्गदर्शक ठरले,

**सुधा शाळिग्राम**

# मराठी विभाग – मराठी वाङ्मय मंडळ

यंदाच्या शैक्षणिक वर्षात मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनासाठी ७ ऑगस्ट १९८९ रोजी 'केसरी' चे संपादक डॉ. शरच्चंद्र गोखले यांना निमंत्रित केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर होते. प्रा. मेधा सिधये यांनी आपल्या प्रास्ताविकात वाङ्मय मंडळाच्या उपक्रमाची माहिती दिली.

१४ ऑगस्ट ८९ रोजी आपल्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा 'विविधगुणदर्शन' कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये श्री. परेश मोकाशी, मृदुला फाटक, प्रिया शहा, अनुपमा कोन्हाळकर, वर्षा दीक्षित, अनिरुद्ध खुटवड, फडके इ. विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या विद्यार्थ्यांनी कथाकथन, नाटयवाचन, नाटयाभिनय, काव्यवाचन, मुलाखत, उत्स्फूर्त वक्तृत्व इ. प्रकारचा सुंदर कार्यक्रम सादर केला, कार्यक्रमाचे संयोजन प्रा. मेधा सिधये यांनी केले. म. वा. मंडळाच्या इतर उपक्रमांचा उल्लेख सदर अंकांत यापूर्वी 'चर्चासत्रे व तत्सम उपक्रम' यामध्ये स्वतंत्रपणे आला आहेच. त्यामुळे त्याचा येथे पुन्हा उल्लेख केलेला नाही.

# कोहसिप – मराठी विभाग

कोहसिप योजनेच्या अंतर्गत मराठी विभागाने खालील कार्यक्रम १९८९–९० या वर्षात केले.

१) ज्ञानेश्वरीच्या सप्तम शताब्दी वर्षानिमित्ताने ज्ञानेश्वरीवर डॉ. श्रीकृष्ण देशमुख यांचे १० जानेवारी ९० रोजी व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर होते.

२) साहित्य आणि ललित कला यांचा परस्पर संबंध दृढ स्वरूपाचा आहे, याची अधिक जाणीव करून घेण्यासाठी 'साहित्य आणि ललित कला यांचा परस्पर संबंध' या विषयावर एक चर्चासत्र दि. २१ व २२ ऑक्टोबर ८९ रोजी घेण्यात आले. या चर्चासत्रात संगीत, नृत्य आणि नाटक, या कलांचा समावेश करण्यात आला होता.

'साहित्य आणि संगीत' या चर्चासत्राचे अध्यक्ष श्री. सुधीर मोघे होते आणि डॉ. श्रीरंग संगोराम यांनी निबंधवाचन केले. दुसऱ्या चर्चासत्राचा विषय 'साहित्य आणि नृत्य' असा होता. श्रीमती रोहिणी भाटे यांनी अध्यक्षस्थान भूषविले आणि डॉ. सुचेता चापेकर यांनी नृत्याभिनयासह आपला निबंध सादर केला, त्याच दिवशी दुपारी 'साहित्य आणि नाटक' या विषयावर चर्चा झाली, डॉ. चंद्रशेखर बर्वे यांनी नाटकातील उताऱ्यासह आपल्या निबंधाची चर्चा केली. अध्यक्ष डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी या चर्चासत्राचा समारोप केला. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आभार मानले. अनेक मान्यवरांची या चर्चासत्राला उपस्थिती होती.

३) 'साहित्य प्रकारांचे अध्यापन' या विषयावरील चर्चासत्र दि. २४ व २५ मार्च १९९० रोजी घेण्यात आले. साहित्य प्रकारांचे अध्यापन करतांना येणाऱ्या अडचणी, शंका आणि कशा प्रकारे हे अध्यापन करावे हे गृहीत धरून वरील चर्चासत्राची आखणी करण्यात आली होती. त्यामध्ये केवळ कविता, कथा आणि कादंबरी या तीनच साहित्य प्रकारांचा अंतर्भाव, करण्यात, आला होता.

दि. २४ मार्चला 'कविता,' या वाङ्मयप्रकारावर डॉ. अरविंद वामन कुलकर्णी यांनी, 'कथा' वाङ्मयप्रकारावर, डॉ. अंजली सोमण यांनी, आणि 'कादंबरी' या वाङ्मयप्रकारावर डॉ. आनंद यादव यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले. या चर्चासत्राचे उद्‌घाटन अधिष्ठाता, प्रा. य. प्र. कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य शं. ना. नवलगुंदकर होते. या तीन चर्चासत्राचे समालोचन डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले. या कार्यक्रमाला अनेक प्राध्यापकांची उपस्थिती होती.

**डॉ. स्नेहल तावरे**

## Science Association (89-90)

The inauguration of the activities of Science Association was done at the Hands of Dr. B. D. Kalkarni, Head of the Chemical Engineering Division, N. C. L. Pune. On this occasion he was felicitated by the students and staff of the College for receiving Young Scientist Award.

The inaugural function was followed by an exciting, inspiring lecture by Dr. Kulkarni on VEDIC MATHEMATICS. The students & staff enjoyed his lecture as well as the post – lecture discussion.

The major activity organised by the Science Association in the year 88–89 was the SCIENCE QUIZ CONTEST. It was open to both junior and senior college students of our college. The contest received overwhelming response as 120 students in 24 different teams participated in it. There were four preliminary rounds and one final round. All the members of Science Association took painstaking efforts to make the quiz coutest a success. Student volunteers specially Mr. Suryavanshi & Mr. Mahabaleshwarkar worked hard during all the rounds of the contest. Other science staff members also voluntarily worked as Quiz Mastes, Subject experts, Time Keepers etc. The activity produced a lot of enthusiasm & excitement amongest the students. The following teams emerged as the successful teams & were declared as the 1st three Winnieng teams.

1st Prize Rs. 200 /- XII Sc. Team.

Members :
1) Jaydeep Roy (Captain)
2) Prachetas Raykar
3) Yogesh Wadadekar
4) Taber Sherkhan
5) Santosh Ranade

2nd Prize Rs. 150 /- F. Y. B. Sc. Team

Members :
1) S. Rajesh (Captain)
2) Anita Gaikwad
3) Mrinalini Nimkar
4) Bhanudas Wagh
5) Kartikeya Rendhani

3rd Prize Rs. 100 /- S. Y. B. Sc. Team

1) Sapna Ajit Kishor (Captain)
2) Rekha Sharma
3) Shashikant Wali
4) Sandeep Khanzode
5) Samarjit Sathe

The prize dist :bution function of the Quiz Contest was celebrated with Dr. R. A. Mashelkar, Director N. C. L., as Chief Guest. On this occasion he gave a popular lecture on : Opportunities in Sciences & New Materials. His lecture was supported by rare collection of slides. For students of Modern College, it was a nice exposure to the scientific world whena National scientist like Dr. Mashelkar led a valuable discussion with students after his lecture.

In addition to science quiz, the association had arranged subjectwise lectures / dis cussions which were beneficial to the S. Y. and T. Y. students.

**Achievements :** Meghana Lele of T. Y. B. Sc. won a second prize in programme writing contest (dbase III+) organised by Dan Consultants. Heartiest Congratulation.

## वाणिज्य संघटना

प्रा. सदस्य – प्रा. डॉ. सौ. भारती डोळे
प्रा. सौ. संजीवनी राहुणे
प्रा. अ. वि. कांबळे
प्रा. जीविता गुजर
प्रा. सौ. रेखा आगाशे

विद्यार्थी सदस्य – कु. गोराडे
कु. बल्लाळ

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी संघटनेतर्फे खालील कार्यक्रम करण्यात आले.

१) **भित्तीपत्रक--** या वर्षी 'कॉम'चे दोन अंक प्रकाशित करण्यात आले. १८ वर्षांवरील व्यक्तींना मतदानाचा हक्क, नवीन भाग व कर्जरोख्यांची विक्री, स्त्रियांसाठी निघालेली नवीन सिगारेट यासारख्या विविध विषयांवर या अंकांमधून विद्यार्थ्यांनी लेख लिहिले होते.

२) **शैक्षणिक भेटी** – विद्यार्थ्यांनी खालील संघटनांना भेटी देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला.

१) हॅन्डमेड पेपर इन्स्टिटयूट.
२) मराठा चेंबर ऑफ कॉमर्स.

३) **जाहिरात स्पर्धा** – संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी जाहिरात स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. श्री. आशुतोष बर्वे (कमर्शियल आर्टिस्ट) यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

४) **व्याख्याने** – विद्यार्थ्यांसाठी खालील व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

1) Preparation for Competitive Examinations,
व्याख्याते श्री. श्रीनिवास इनामदार

2) Chartered Accountancy – Course and Career
व्याख्याते श्री. जुगलकिशोर राठी व श्री. वर्धमान जैन

५) **वाणिज्य प्रश्नमंच** – या वर्षी प्रथमच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य विषयांशी संबंधित अशा प्रश्नोत्तरांचा प्रश्नमंच कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने भाग घेतला होता.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जाहिरात स्पर्धा आयोजित केली होती. त्याचप्रमाणे खालील ठिकाणी शैक्षणिक भेटी देऊन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याची प्रत्यक्ष माहिती घेतली.

१) शिवाजीनगर डाक व तारघर, पुणे.

२) जनता सहकारी बँक, शिवाजीनगर पुणे.

वरील सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. ऑफिसमधील श्री. पानसे यांनी संघटनेच्या सर्व कार्यक्रमांना सहकार्य केले.

**भारती डोळे**
कार्याध्यक्षा, वाणिज्य संघटना

## कलामंडळ – वार्षिक अहवाल

विविध कलाप्रकारांत प्राविण्य दर्शवून, अनेक पारितोषिके मिळवून आणण्याची परंपरा मॉडर्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या वर्षीही कायम राखली आहे हे नमूद करण्यास आम्हास अतिशय आनंद होत आहे. १९८९–९० या वर्षात आंतरमहाविद्यालयीन पातळीवरील विविध स्पर्धा झाल्या. तसेच, कला मंडळातर्फे अंतर्गत पातळीवरील स्पर्धा घेतल्या गेल्या. या स्पर्धांची व त्यांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाची माहिती खाली देत आहोत.

**पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा–**

'महाराष्ट्रीय कलोपासक' या नाट्यसंस्थेतर्फे होणाऱ्या या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने 'बंदागडल' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेने स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळविला व पुण्यातील अंतिम फेरीत तिसरा क्रमांक पटकावला. अजित शिरोळे यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झालेल्या या एकांकिकेतील प्रमुख कलाकार अनीता गोळे यांना स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे कै. माई भिडे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेची अंतिम फेरी राज्यपातळीवर घेण्यात आली. तेथे अनीता गोळे यांनी सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनयाचा पुरस्कार मिळविला. या एकांकिकेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला–

अजित शिरोळे, अनिता गोळे, मृदुला फाटक, अश्विश्री अत्रे, विनायक पंडित, प्रसाद फाटक, प्रवीण धनुरकर, मनीषा जव्हेरी, रवींद्र महाजन, सचिन शिंदे, चारुदत्त देशपांडे, परेश मोकाशी, मंजूषा दातार, श्रीधर विसाळ, किरण जितीकर. या विद्यार्थ्यांना प्रा. जगदीश चिंचोरे यांनी मार्गदर्शन केले.

**डॉ. गदगकर आंतरमहाविद्यालयीन संगीत स्पर्धा–**

बी. जी. वैद्यकीय महाविद्यालयातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या या संगीत स्पर्धेतील शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, वाद्यसंगीत व वाद्यवृंद या प्रकारांत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला–

संदीप कर्नावट, संदीप नाईक, एम्. पी. राज, दीपक देवळालीकर, अनुपम बॅनर्जी, लीना श्रोत्री प्रतिमा उपाध्ये, अपर्णा क्षीरसागर, समीर ओक, संजीव तांबे, अविनाश बर्वे, मंजिरी देशपांडे, शिल्पा जोशी, पूर्वा कुलकर्णी. या विद्यार्थ्यांना प्रा. लीना पाटणकर यांनी मार्गदर्शन केले.

**इनसिक स्पर्धा–**

फर्गसन महाविद्यालयातर्फे होणाऱ्या या स्पर्धेतील विविध प्रकारांत खालील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**पथनाट्य–** गिरीश कानिटकर, नीतिन पैलवान, माधव शिंदे, प्रशांत घोडके, मनोज मोरे, राजेंद्र काटे, राजू गायकवाड, संजय पिरंगुट, चंद्रशेखर कांबळे, रोहिणी गायकवाड, शिल्पा कुलकर्णी, गौरी देशपांडे, विनोद पाटील, मुकुंद पाचारणे, वैभव महाशब्दे, दीपक परबत, नंदकुमार कांबळे.

**गझल–** अनुपम बॅनर्जी, मनीष गोस्वामी.

**फोटोग्राफी–** अनिरुद्ध खुटवड.

**जाहिरात निर्मिती–** विनायक पंडित, प्रिया शहा, मंजूषा दातार, अनिता गोळे, अविनाश बर्वे, रवींद्र महाजन, श्रीधर विसाळ.

**समूहनृत्य–** अल्पना ओसवाल, वैशाली धात्रक, मनीषा मुथियान, वैशाली शहा, सुरेखा ओगले, संगीता कसवा, चिन्मयी लंगोटे, जयश्री लाड.

**विवक्ष–** बद्रीश हुलहुली, टी. एल. वेंकटेश.

**वादविवाद–** परेश मोकाशी, प्रकाश पवार.

**वाद्यवृंद–** अर्चना कुलकर्णी, अर्चना बापट, एम्. पी. राज, अनुपम बॅनर्जी, संदीप कर्नावट, श्रीकांत आठल्ये, मनीष गोस्वामी, दीपक देवळालीकर, सचिन गोखले, संजय असरानी, तुषार पिंगळे, समीर ओक, नीतिन कर्वे. या विद्यार्थ्यांना प्रा. जगदीश चिंचोरे, प्रा. नायडू व प्रा. बहुलीकर यांनी मार्गदर्शन केले.

**फिरोदिया करंडक आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन स्पर्धा–**

या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला– शिल्पा कुलकर्णी, गिरीश कानिटकर, राजेंद्र गायकवाड, संगीता देव, रोहिणी गायकवाड, नीता डोंगरे, मिलिंद देशपांडे, विनोद पाटील, मनोज मोरे, वैभव महाशब्दे, अनिल कुलकर्णी, दत्ता माळी, एम्. पी. राज, संदीप कर्नावट, प्रभाकर रंधवे, राजेंद्र काटे, सचिन गोखले, शिवाजी माळवदर, मंजिरी जोशी, संजय जाधव, राजू धोत्रे, विजय पाटील, अनिल अहिवळे, महेश तापकीर. या विद्यार्थ्यांना प्रा. नरेंद्र नायडू यांचे मार्गदर्शन लाभले.

**महाकवी कालिदास स्पर्धा–**

अ. भा. वि. प. आयोजित करीत असलेल्या या संगीत स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांचा सहभाग होता– समीर ओक, संगीता देव, अपर्णा क्षीरसागर, मंजिरी जोशी, मंजिरी देशपांडे, वैशाली पुणेकर, अनुराधा बापट, मेघना लेले, विक्रांत कुलकर्णी. या विद्यार्थ्यांना प्रा. लीना पाटणकर यांनी मार्गदर्शन केले.

**सिंबायोसिस नाट्यवाचन स्पर्धा–**

सिंबायोसिस महाविद्यालयातर्फे होणाऱ्या या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयास सांघिक द्वितीय क्रमांक मिळाला. यात पुढील विद्यार्थ्यांचा सहभाग होता– अनीता गोळे, अंजली जोशी, परेश मोकाशी. परेश मोकाशी यांना या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट वाचनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. या स्पर्धकांना प्रा. जगदीश चिंचोरे यांनी मार्गदर्शन केले.

**प्रसंगनाट्य स्पर्धा–**

अ. भा. वि. प. आयोजित करीत असलेल्या या स्पर्धेत पुढील विद्यार्थी सहभागी झाले होते. शिल्पा कुलकर्णी, गिरीश कानिटकर, अनिल कुलकर्णी, विनोद पाटील, मनोज मोरे, सीमा कुलकर्णी, अर्चना गोरे, वैभव महाशब्दे, दत्ता माळी, चंद्रशेखर कांबळे, नंदिनी खोत, राजू फुगे, वैशाली देशमुख, किशोरी गोखले, वर्षा कुलकर्णी. या स्पर्धेसाठी प्रा. आनंद पाध्ये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**संकेत थिएटर्स, वाई, द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा–**

या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या 'भीखमंगे' या एकांकिकेस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तीत खालील विद्यार्थ्यांचा सहभाग होता– श्रीधर विसाळ, परेश मोकाशी, विनायक पंडित, किरण जितीकर, विजय शिंदे. या स्पर्धेत परेश मोकाशी यांना वैयक्तिक अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

**महाविद्यालयांतर्गत स्पर्धा–**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी व गुणी विद्यार्थ्यांना प्रकाशात आणण्यासाठी कलामंडळ दरवर्षी रांगोळी, मेंदी, पोस्टर, संगीत, कथाकथन, नाट्याभिनय, नाट्यवाचन व एकांकिका स्पर्धा घेते. या सर्व स्पर्धा यंदाही उत्साहात पार पडल्या. स्पर्धक व प्रेक्षक श्रोते यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. या स्पर्धांचा तपशील पुढील प्रमाणे–

**पोस्टर स्पर्धा–**

१) वर्षा परदेशी　　२) अपर्णा जल्लावार　　३) प्रेमा दोडामनवार

उत्तेजनार्थ : रेखा शर्मा.

प्रा. सुनीता गोसावी यांनी स्पर्धेस मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून श्री. अनिल उपळेकर यांना निमंत्रित केले होते.

**रांगोळी स्पर्धा–**

**कनिष्ठ महाविद्यालय**

| ठिपके प्रकार | बिनठिपके प्रकार |
|---|---|
| १) मंजूषा राहाणे | १) मधुरा केळकर |
| २) राजश्री ढमढेरे | २) सीमा पानसरे |
| ३) जस्मिन दानवडे | ३) नयना सातपुते |

**वरिष्ठ महाविद्यालय**

| ठिपके प्रकार | बिनठिपके प्रकार |
|---|---|
| १) स्वाती साळी | १) सविता कोल्हापुरे |
| २) निवेदिता पानसरे | २) माधवी वाटवे |
| ३) नंदा मिणियार | ३) वैशाली चौगुले |
| उत्तेजनार्थ– एस. एस. शेळके | उत्तेजनार्थ– सुरेखा ओगले |

**मेंदी स्पर्धा–**

**कनिष्ठ महाविद्यालय**

१) नयना चौगुले　　२) जया गलांडे　　३) प्रभा सावंत

उत्तेजनार्थ– प्रतिमा ढाकणे

**वरिष्ठ महाविद्यालय**

१) कीर्ती देव　　२) चारुमती केळकर　　३) वैशाली शहा

उत्तेजनार्थ– अल्पना ओसवाल　　नंदा मिणियार
प्रतिभा लोखंडे　　सविता कोल्हापुरे

या स्पर्धांस प्रा. लीना पाटणकर, प्रा. निर्मला मोने व प्रा. वीणा नरगुंद यांनी मार्गदर्शन केले. परीक्षणाची जबाबदारी श्री. विवेक खाडिलकर व सौ. शुभदा वाकळकर यांनी सांभाळली.

संगीत स्पर्धा–

## कनिष्ठ महाविद्यालय

हिंदी चित्रपटगीत–

१) आरती मनोहर
२) उषा पाटील व लीना पालेकर (विभागून)
३) रोहिणी गायकवाड

उत्तेजनार्थ– आरती टिकेकर

मराठी भावगीत–

१) लीना खरे     २) रोहिणी गायकवाड
३) अनंत बवरे व ३) आरती मनोहर (विभागून)

शास्त्रीय संगीत–

१) शिल्पा जोशी     २) पूर्वा कुलकर्णी

नाट्यसंगीत––

क्र. १) भाग्यश्री देशमुख     २) गौरी मांडके

वाद्यसंगीत––

क्र. १) देवेंद्र गुजर     २) हेमलता जोशी
३) राहूल जोशी व प्रशांत दंडवते ( विभागून )

## वरिष्ठ महाविद्यालय

हिंदी चित्रपटगीत––

क्र. १) अनुपम बॅनर्जी     २) अपर्णा क्षीरसागर व प्रतिमा उपाध्ये ( विभागून )
३) अविनाश बर्वे

उत्तेजनार्थ–– एम्. पी. राज

मराठी भावगीत––

क्र. १) अपर्णा क्षीरसागर     २) अविनाश बर्वे     ६) प्रतिमा उपाध्ये

नाट्यसंगीत––

क्र. १) समीर ओक     २) वैशाली फडके

वाद्यसंगीत––

क्र. १) दीपक देवळालीकर २) सचिन गोखले ३) संजीव तांबे

या स्पर्धांचे संयोजन व मार्गदर्शन प्रा. अनिल व्हनकळस यांनी केले. प्राथमिक व अंतिम अशा दोन फेऱ्यांमधील परीक्षणाचे काम सौ. शरयू बर्वे, सौ. हेमा गुर्जर व सौ. शुभांगी बहुलीकर यांनी पाहिले.

एकांकिका, नाट्याभिनय, नाट्यवाचन व कथाकथन स्पर्धा––

या स्पर्धातील विद्यार्थ्यांचा सहभाग दर वर्षी वाढत आहे. या वर्षीच्या स्पर्धांचे संयोजन प्रा. दत्ता लिमये यांनी केले. प्रा. अनिल व्हनकळस, प्रा. जगदीश चिचोरे, प्रा. वीणा नरगुंद व प्रा. लीना पाटणकर यांचेही या स्पर्धांना मार्गदर्शन लाभले. या स्पर्धांचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे––

## कनिष्ठ महाविद्यालय

**नाट्याभिनय--**

क्र. १) वैशाली देशमुख २) अपर्णा जल्लावार ३) अनिल कुलकर्णी

**कथाकथन--**

क्र. १) मीनल पुराणिक २) वैशाली देशमुख ३) दत्ता माळी

**नाट्यवाचन (सांघिक)**

क्र. १) कोणासही नाही २) स्वामी (अकरावी 'आय') ३) एकच प्याला (बारावी 'बी')

**नाट्यवाचन ( वैयक्तिक )**

| विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|
| क्र. १) अनिल कुलकर्णी | १) रूपाली गावडे |
| २) गिरीश कानिटकर | २) रोहिणी गायकवाड |

**एकांकिका ( सांघिक )--**

क्र. १) डॉक्टर, रोगी आणि यम उत्तेजनार्थ-- डाग

**एकांकिका ( वैयक्तिक )--**

विद्यार्थी--

क्र. १) मनोज मोरे २) गिरीश कानिटकर ३) मुकुंद पाचारणे

उत्तेजनार्थ-- दिनेश थेटे

उत्कृष्ट दिग्दर्शन-- गिरीश कानिटकर

## वरिष्ठ महाविद्यालय

**नाट्याभिनय--**

क्र. १) नितिन पैलवान २) मृदुला फाटक ३) प्रिया शहा

**कथाकथन--**

क्र. १) कोणासही नाही २) कोणासही नाही ३) विजय शिंदे

**नाट्यवाचन ( सांघिक )--**

क्र. १) चक्र २) लाल छत्रीतला जादूगार ३) (विभागून) शिल्प
-- रहस्य आणि तरुणी

**नाट्यवाचन ( वैयक्तिक )**

| विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|
| क्र. १) अनिरुद्ध खुटवड | क्र. १) मंजिरी गांगल |
| २) प्रभाकर रंधवे | २) स्वाती जोशी |
| ३) विजय शिंदे | ३) रोहिणी कुलकर्णी |
| उत्तेजनार्थ-- विनायक पंडित | उत्तेजनार्थ-- अल्पना ओसवाल |
| ,, दिलीप नांगरे | ,, अश्विनी गोसावी |

**एकांकिका ( सांघिक )**

क्र. १) लाल छत्रीतला जादूगार २) शिल्प ३) पांडगो इलो रे बा इलो

एकांकिका ( वैयक्तिक )

| विद्यार्थी | | विद्यार्थिनी | |
| --- | --- | --- | --- |
| क्र. १) | प्रभाकर रंधवे | क्र. १) | अश्विनी गोसावी |
| २) | राजू गायकवाड | २) | सुषमा गायकवाड |
| ३) | विजय शिंदे | ३) | स्वाती जोशी |

उत्तेजनार्थ— सागर वडापूरकर

,, नासिर शेख

उत्कृष्ट दिग्दर्शन— प्रभाकर रंधवे

संपूर्ण स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कलाकार— गिरीश कानिटकर. परीक्षक म्हणून श्री. राजेंद्र देशपांडे, प्रा. ब. य. भिडे व सौ. कांचन अभ्यंकर यांना निमंत्रित केले होते.

नाट्यक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालयाकडून दिली जाणारी नाट्यशिष्यवृत्ती या वर्षी अनीता गोळे यांना देण्यात आली.

कलामंडळाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्य डॉ. नवलगुंदकर यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती सुहास जोशी यांच्या हस्ते संपन्न झाला.

विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याकरिता महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी पारितोषिके पुरस्कृत केली आहेत, ती पुढीलप्रमाणे—

- प्रा. अमृता सातभाई पुरस्कृत कै. सरस्वतीबाई पेडणेकर पारितोषिक.
- प्रा. बाळासाहेब भिडे पुरस्कृत कै. माई भिडे पारितोषिक.
- प्रा. विनोद छाब्रा पुरस्कृत कै. जुगलकिशोर छाब्रा पारितोषिक.
- प्रा. विनय शेरीकर पुरस्कृत कै. मुरलीधर शेरीकर पारितोषिक.
- प्रा. सुधीर वैशंपायन पुरस्कृत पारितोषिक.
- प्रा. एस. के. मेहता पुरस्कृत पारितोषिक.
- प्रा. अनिल व्हनकळस पुरस्कृत पारितोषिक.
- प्रा. सुरेखा परब ,, पारितोषिक.

आपल्या महाविद्यालयातून यशस्वीपणे शिक्षण पूर्ण केलेल्या खालील माजी विद्यार्थ्यांनीही पारितोषिके पुरस्कृत केली आहेत—

- श्री. बिपिन पाटोळे पुरस्कृत कै. विजय पाटोळे स्मृती करंडक.
- बी. कॉम. 'सी' व 'बी' डिव्हिजनने दिलेला 'सिबिकॉम' करंडक.
- प्रा. अतुल देशपांडे पुरस्कृत पारितोषिक.
- श्री, विकास पेशवे पुरस्कृत पारितोषिक.
- श्री. दवदत्त पाठक ,, कै. वे शा. सं. दामोदरशास्त्री पाठक पारितोषिक.

वरील सर्वांचे मनापासून आभार !

कलामंडळाचे काम वर्षभर सतत चालू असते. त्यासाठी अनेकांच्या मदतीची गरज भासते व तो नेहमीच मिळतेही. माननीय प्राचार्यांचे मार्गदर्शन व प्रेरणा उत्साहवर्धक असते. सर्व उपप्राचार्य, प्रा. डॉ. वि. भा. देशपांडे, रजिस्ट्रार श्री. एस. वाय. कुलकर्णी कार्यालयातील त्यांचे सहकारी. कलामंडळातील सदस्य व इतर सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल व ग्रंथालयातील सर्व सेवकवर्ग, शारीरिक शिक्षण विभागाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व सेवकवर्ग अशा सगळ्यांचेच सहकार्य मोलाचे असते. त्यांच्या सहकार्यामुळेच कलामंडळाचे काम सुव्यवस्थितपणे पार पडते. वरील सर्वांचे मनापासून आभार !

| | |
| --- | --- |
| दाबके | जगदीश चिचोरे |
| सचिव, कलामंडळ | कार्याध्यक्ष, कलामंडळ |

# राष्ट्रीय सेवा योजना

एप्रिल महिन्यात कोंढणपूर येथे वनराईतर्फे कोंढणपूर व परिसरातील ग्रामस्थांच्या जाहीर शपथविधी समारंभास प्रा. शहा व विद्यार्थी हजर होते.

यंदाच्या वर्षी अतिवृष्टीमुळे भाजे येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडलेली शवे काढण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी आणि मॉडर्न महाविद्यालय N. S. S. तर्फे प्रा. बर्वे यांच्याबरोबर भाजे येथे मदतनीस म्हणून विद्यार्थ्यांची तुकडी रवाना झाली होती. 'खडकवासला' येथे 'वनराई' या संस्थेमार्फत वनखात्याच्या वृक्षारोपणाचा कार्यक्रम करून एक दिवसीय शिबीर यशस्वी केले.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपण व श्रमदान करण्यात आले. ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षकदिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी गुरुजनांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य. डॉ. शं. ना. नवलगुंदकर, उपप्राचार्य, डॉ. पायरे व प्रा गोसावी आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. ७ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन' साजरा करण्यात आला. इंडियन इन्स्टीटयूट ऑफ एज्युकेशनतर्फे आयोजित साक्षरता दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यंदाच्या वर्षीही 'फॅमिली वेलफेअर सेंटर', पोलीस लाइन, यांच्या सहकार्याने शिवाजीनगर भागातील पोलीस लाइन येथे आरोग्य, कुटुंबनियोजन, पोलिओ डोस यासंबंधी विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केले. तसेच, महाविद्यालयातर्फे 'म. गांधी सप्ताह' पाळण्यात आला. त्यामध्ये परिसर स्वच्छता व श्रमदान करण्यात आले. तसेच मा. मोहन धारीया यांचे ३ आक्टोबर ८९ रोजी गांधींचे तत्त्वज्ञान याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच म. गांधींचे विचार यावर प्राचार्यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाने रेडक्रॉस संघटनेच्या साहाय्याने रक्तदान शिबिर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला, शाकाहाराचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी 'साधु वासवानी मिशन तर्फे' शाकाहारीदिन पदयात्रेत विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

यंदाच्या वर्षी महाविद्यालयाने विशेष हिवाळी शिबिर दत्तक खेडे 'फुलगाव' जि. पुणे येथे घेतले. २४–१२–८९ ते २–१–९० या १० दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी कॉलेजमधील व त्याव्यतिरिक्त तज्ज्ञ व्यक्तींनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी केले. त्यावेळी फुलगावचे सरपंच मा. श्री. नारायणराव खुळे, प्रा. रायकर, माजी प्राचार्य. श्री. चिरपुटकर, प्रा. साळुंके, श्री. मनोळी, प्रा. श्री व सौ. गंधे इ. मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. या शिबिरास पुणे विद्यापीठातर्फे श्री. पिंगळे व कु. शैलजा पिरंगुटे हे उपस्थित होते. प्रा. साळुंके व श्री. मनोळी यांनी 'व्यायाम–आहार–व्यक्तिमत्त्व विकास आणि स्पर्धा परीक्षा' यामध्ये असलेला परस्परपूरक संबंध समजावून सांगितला प्रा. शहांनी 'साक्षरता जन आंदोलन' याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी फुलगावचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण केले. विद्यार्थ्यांनी 'श्रुतीसागर' या आश्रमास भेट दिली व आश्रमात श्रमदान व परिसर स्वच्छता केली. त्याचबरोबर, 'स्वामी स्वरूपानंद सरस्वती' यांनी 'युवाशक्ती आणि आव्हाने' याबाबत मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन शंकानिरसन केले. तसेच 'Resource Club' तर्फे आलेले 'Blind Men's Association' चे श्री यन्द्वाणकर आणि श्री. सॅबिस्टीन यांनी अंधत्वनिवारणाविषयी घ्यावयाची काळजी व सद्यस्थिती याबद्दल माहिती दिली. 'पर्यावरण आणि ग्रामीण विकास आणि युवकांचा सहभाग' याविषयी माजी केंद्रीय मंत्री श्री. मोहन धारिया यांनी व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री. राजाभाऊ माटे (निवारा संस्था) यांनी स्वीकारले. यावेळी वृक्ष प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच साक्षरता दिंडी आणि वृक्ष दिंडीही आयोजित करण्यात आली होती व विद्यार्थ्यांनी, गावातील तरुण मंडळ, महिला मंडळ आणि ग्रामस्थांनी यात अतिशय उत्साहाने भाग घेतला, तसेच वृक्षारोपणही करण्यात आले. प्रा. सौ. गंधे (वनस्पतीशास्त्रज्ञ) यांनी 'रोपवाटिका व वृक्षसंकलन' या विषयी

गावकरी व विद्यार्थ्यांना माहिती दिली व दैनंदिन जीवनातील वनस्पतींचे उपयोग सांगितले. श्री ताम्हणकर यांनी पोखरा व्हॅलीसंबंधी तर प्रा. घैसास यांनी लक्षद्वीत बेटावरील निसर्गरम्य स्लाईड शो दाखविला. वाणिज्य विषयातील विविध परीक्षा यावर मा. उपप्राचार्य श्री गोसावी यांनी तर श्री. प्रा. एम्. ए. कुलकर्णी यांनी N. S. S.चे उद्दिष्ट याबाबत उपयुक्त माहिती दिली. 'हरी उद्धव धोत्रे माध्यमिक विद्यालयाच्या' उद्घाटन समारंभ व लेझीम प्रात्यक्षिकास विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. या समारंभाचे अध्यक्षस्थान प्रा. साळुंके यांनी भूषविले. तसेच विद्यार्थ्यांतर्फे क्रीडा साहित्य खरेदीसाठी विद्यालयास रु. १५१।– ची देणगी देण्यात आली. प्रा. वाणी यांनी समाजसेवेशी संबंधित बाबींवर मार्गदर्शन केले, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर चे श्री. चंद्रकांत जाधव यांनी माहिती दिली. तसेच प्रा. पांडे यांनी 'झाडांची व्यावहारिक तत्त्वावर लागवड' याबाबत उपयुक्त माहिती दिली. बजाज ऑटोचे Personal Dept चे मॅनेजर श्री मुद्देबिहाळकर यांनी कारखान्यातील सामाजिक बांधिलकी यावर तर श्री. विलास सोहोनी यांनी बायोगॅस व गोबर गॅस यांचा वापर याबाबत माहिती दिली. तसेच खादी ग्रामोद्योग संस्थेचे प्रमुख श्री. चंद्रचूड यांनी खादीचे महत्त्व याबाबत माहिती दिली. याशिवाय, नॅशनल सर्व्हिस स्कीम, यावर प्रा. महाजन, श्री. एकसांबेकर यांनी विविध योजनांची माहिती दिली. तसेच, फुलगाव महिला मंडळ, युवक मंडळ आणि शिबिरार्थी यांच्या वतीने हळदीकूंकू समारंभ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. तसेच ३१ डिसेंबर व १ जानेवारीस गत वर्ष निरोप व नव वर्ष स्वागत करण्यात आले. त्यानिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. फुलगाव शिबिरार्थींनी 'संभाजी महाराज समाधी' तुळापूर येथील समाधीस्थानाचे दर्शन व परिसर स्वच्छता केली. तसेच दररोज केलेल्या श्रमदानाने रस्ते, स्वच्छता विविध योजना पुऱ्या केल्या. तसेच चं. प. भिशीकर यांनी समाजसेवा म्हणजे काय ? हे समजावून सांगितले. शिबिराचा समारोप श्री. प्रा. रमेश नन्दे ( पुणे विद्यापीठ ), श्री. डी. एन. महाजन, श्री. खेर आणि श्री. मुल्ला (हरीउद्धव धोत्रे विद्यालय फुलगाव ) यांच्या भाषणाने झाला. या शिबीर काळात अनेक पालकांनी, शिक्षकेतर कर्मचारी व प्राध्यापकांनी शिबिरास भेट दिली.

१२ जानेवारी ते १९ जानेवारी हा कालावधी 'युवा सप्ताह' म्हणून साजरा करण्यात आला. यात विवेकानंद जयंती प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली. तसेच १५ जानेवारी रोजी अंधांविषयी असलेली सामाजिक जाणीव व्यक्त करण्यासाठी पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन तर्फे आयोजित पदयात्रेस विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला व निधी जमविण्यास सहाय्य केले. तसेच १५ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद मा. श्री. रमेश नन्दे (पुणे विद्यापीठ रा. से. यो. प्रमुख) यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे मा. श्री. डी. एन. महाजन होते. या कार्यक्रमास प्राचार्य आणि इतर प्राध्यापक मंडळी हजर होती. १५ जानेवारीस तिळगूळ समारंभ साजरा करण्यात आला. २६ जानेवारी रोजी ध्वजवंदन, श्रमदान व वृक्षरोपण कार्यक्रम तसेच माजी प्राचार्य चिरपुटकर, प्रा. राजगुरु यांनी अनुक्रमे विवेकानंदस्वामींचे विचार व रा. से. यो. संबंधी मार्गदर्शन केले. ३० जानेवारी रोजी हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. तसेच, २ जानेवारी ९० रोजी रिसोअर्स क्लब व पुणे विद्यापीठातर्फे आयोजित अंधजन पदयात्रेस विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला व निधी जमविला. तसेच यंदाच्या वर्षी 'प्रौढ साक्षरता मोहिमे' अंतर्गत किमान एका अज्ञान व्यक्तीस साक्षर करण्याच्या दृष्टीने प्रौढ साक्षरता मोहिम वर्षभर राबविली. तसेच 'वनराई' या संस्थेच्या रोपवाटिका कार्यशाळेत श्रमदान व रोपांची लागवड हा कार्यक्रम सप्ताहभर आयोजित करण्यात आला. तसेच सातपुडा पर्वत येथे गिरीभ्रमणासाठी प्रा. गोहील यांच्याबरोबर विद्यार्थ्यांची तुकडी रवाना झाली होती. तसेच फर्ग्युसन कॉलेज व पुणे विद्यापीठ आयोजित 'सामाजिक वनीकरण' या विषयावरील कार्यशाळेत प्रा. शहा यांनी सहभाग घेतला.

तसेच खादी ग्रामोद्योग खानापूर येथे आयोजित दोन दिवशीय चर्चासत्रात प्रा. शहा, सुजित म्हस्के, सुनिता गावडे यांनी सहभाग घेतला. २० मार्चला सातपुडा गिरीभ्रमणाचा स्लाईड शो दाखविण्याचा

कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी श्री एकसांबेकर व त्यांचे सहकारी, रमेश नन्दे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

तसेच, यंदाच्या वर्षी महाविद्यालयातील तृ. व कला शाखेतील कु. मंजुषा शहाणे व श्री. उमेश रावडे ह्यांची पुणे विद्यापीठातर्फे आक्टोबरमध्ये भरलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिर, अलाहाबाद, उत्तर प्रदेश यासाठी निवड झाली. आणि या संघाने ' पुणे विद्यापीठ उत्कृष्ट संघ ' हा पुरस्कार प्राप्त केला. तसेच, जामिया मिलीया इस्लामिया ' नवी दिल्ली येथे फेब्रुवारीमध्ये भरलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी पुणे विद्यापीठातर्फे राजेश बाठे (प्र. व. वाणिज्य) आणि कु. कविता देशपांडे (S. Y. B. Sc.) यांची निवड झाली. तसेच उत्कल विद्यापीठ, भुवनेश्वर, ओरिसा येथे मार्चमध्ये भरलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी पुणे विद्यापीठातर्फे कु. रेवती आफळे (T. Y. B. Com.) हिची निवड झाली.

तसेच, महाविद्यालयाने २१ मार्च रोजी जागतिक वनदिन साजरा केला. याप्रसंगी श्री. वर्तक, डॉ. पांडे, प्रा. रायकर व बॉटनी विभागातील इतर प्राध्यापकांनी सामाजिक वनीकरण, वनदिनाचे महत्त्व यावर व्याख्यान पारदर्शिकांच्या साहाय्याने दिले. केतकावळे येथे २५ मार्च रोजी महिला शिबिरामध्ये आरोग्य, साक्षरता इ. सर्वेक्षणामध्ये २५ मार्च रोजी विद्यार्थी सहभागी झाले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सर्व कार्यक्रमात प्राचार्य नवलगुंदकर, उपप्राचार्य पाथरे, उप प्रा. गोसावी, उप प्रा. मराठे, प्रा. रायकर, प्रा. गंधे प्रा. सौ. गंधे, आणि इतर सर्व प्राध्यापक, तसेच शिक्षकेतर कर्मचारी व श्री व सौ. मनोळी, श्री. पासलकर तसेच माझे सहकारी प्रा. गोहील, प्रा. दीक्षित, प्रा. साळुंखे आणि प्रा. दशपुत्रे तसेच सर्व सेवाभावी संस्थांनी उत्स्फूर्त सहकार्य केले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**श्री. उमेश रावडे**
**कु. मंजुषा शहाणे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. रमेश शहा**
कार्यक्रमाधिकारी रा. से. यो.

## वक्तृत्व व वादविवाद मंडळ

या वर्षी वादविवाद मंडळाचे उद्घाटन लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या डॉ. वि. ग. भिडे ( माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ ) यांच्या व्याख्यानाने झाले.

या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी आंतर महाविद्यालयीन स्तरावरील वक्तृत्व, वादविवाद, निबंधलेखन, वाचन, कथाकथन, प्रश्नमंजूषा या स्पर्धात उत्साहाने भाग घेतला. या स्पर्धांमधील आपल्या स्पर्धकांचा सहभाग निश्चितच स्पृहणीय होता. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी स्पर्धकांना केलेल्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार. सर्व उपप्राचार्य, कलामंडळातील सहकारी प्राध्यापक, कै. प्रा. भगवान माळवे, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, ग्रंथालय विभाग यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद ! ज्या स्पर्धांत आपल्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे—

१) श्री. फुलचंद बाळचंद कर्नावट करंडक वादस्पर्धा, पुणे.
   १. कु. मृदुला दत्तात्रय फाटक, द्वि. व. वाणिज्य– उत्तेजनार्थ पारितोषिक
२) स्वा. सावरकर वाङ्मय वक्तृत्व मंडळ, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा.
   १. कु. सरिता मुकुंद जोगळेकर, द्वि. व. वाणिज्य—उत्तेजनार्थ.
   २. कु. रोहिणी केशव कुलकर्णी, द्वि. व. वाणिज्य— उत्तेजनार्थ.

३) कविवर्य मोरोपंत वक्तृत्वस्पर्धा, बारामती.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- ' पर्यावरण असमतोल व वनसंवर्धनाची गरज ' या विषयाचे प्रथम पारितोषिक रोख रुपये ५१.

२. कु. मृदुला दत्तात्रय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- ' सिनेनटांचा राजकारणातील प्रवेश ' या विषयाचे प्रथम पारितोषिक रोख रु. ५१.

४) कविवर्य मोरोपंत वादस्पर्धा, बारामती.

चांदीची फिरती ढाल विजेता संघ-सांधिक प्रथम क्रमांक

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- प्रथमक्रमांक, रोख रु. ३३३.

२. कु. मृदुला दत्तात्रय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- उत्तेजनार्थ.

५) न्या. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा, पुणे.

१. मृदुला दत्तात्रय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- उत्तेजनार्थ

६) ' इर्नसिक १९८९-९० ' फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे आयोजित मराठी वादविवाद स्पर्धा.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- प्रथम क्रमांक- व मानचिन्ह.

७) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर, जिल्हा- धुळे आयोजित वादस्पर्धा- फिरत्या करंडकाचा मानकरी संघ.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला- प्रथम क्रमांक, रोख रु. १०१

२. श्री. प्रकाश मारुती पवार, तृ. व. कला-- उत्तेजनार्थ.

८) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर, जिल्हा-धुळे, आयोजित कथाकथन स्पर्धा.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला--तृतीय क्रमांक, रोख रु. २५.

२. श्री. प्रकाश मारुती पवार, तृ. व. कला-- उत्तेजनार्थ.

९) स्व. नेमगोंडा दादा पाटील स्मृती वक्तृत्व स्पर्धा-- नेमिनाथनगर-- सांगली.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- रोख रु. ५०१, ढाल व प्रमाणपत्र.

१०) ब्राह्मो युवा संघटना, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- तृतीय क्रमांक-- रु. ७५.

११) प्रबोधन गोरेगाव ( मुंबई ) आयोजित प्रबोधन वक्तृत्व व कथाकथन स्पर्धा

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला-- तृतीय क्रमांक, रोख रु. १००.

१२) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे आयोजित हिंदी वक्तृत्व स्पर्धा (महाराष्ट्र राज्यस्तरीय.)

१. कु. मृदुला दत्तात्रेय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- प्रथम क्रमांक.

२. कु. सुनीता पांडुलाल सोनी, अकरावी वाणिज्य-- प्रथम क्रमांक रु. ३५.

१३) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे आयोजित हिंदी वक्तृत्व स्पर्धा ( महाराष्ट्र-- गुजराथ आंतर राज्यस्तरीय, औरंगाबाद येथे. )

१. कु. मृदुला दत्तात्रेय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- प्रथम क्रमांक-- रु. ७५.

२. कु. सुनीता पांडुलाल सोनी, अकरावी वाणिज्य-- उत्तेजनार्थ रु. ११.

१४) श्री. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज काव्यवाचन स्पर्धा देहूगाव ( पुणे )

१. श्री. विकास ढवळे, तृ. द. शास्त्र-- तृतीय क्रमांक-- रु. ५१ रोख.

१५) आनंदवन संघटना, इचलकरंजी आयोजित पंडित नेहरु जन्मशताब्दी निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा.

१. कु. प्रतिमा विजय परदेशी, तृ. व. कला-- तृतीय क्रमांक.

१६) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पिंपरी—चिंचवड आयोजित 'श्री स्वामी विवेकानंद जयंती-निमित्त वक्तृत्व स्पर्धा.

१. कु. सुनीता पांडूलाल सोनी, अकरावी वाणिज्य-- तृतीय क्रमांक, कप, रु. १०१.

१७) स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया, जुन्नर तालुका-- म. फुले व डॉ. आंबेडकर स्मृतिशताब्दी व जन्मशताब्दी निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धा.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला— द्वितीय क्रमांक, रु. २०१ व चषक.

१८) रामकृष्ण मठ, पुणे आयोजित स्वामी विवेकानंद वक्तृत्वस्पर्धा.

१. कु. नंदिनी अशोक खोत, बारावी वाणिज्य-- द्वितीय क्रमांक.

२. कु. अरुंधती अरुण सरस्वते, बारावी वाणिज्य-- उत्तेजनार्थ.

१९) श्री. ना. दा. ठाकरसी मानव्य— वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे आयोजित आंतरमहाविद्यालयीन हिंदी वक्तृत्व स्पर्धा.

१. कु. मृदुला दत्तात्रेय फाटक, द्वि. व. वाणिज्य-- फिरती ढाल, द्वितीय क्रमांक. रु. ७५.

२०) रयत शिक्षण संस्था, सातारा आयोजित पद्म-भूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आंतरमहाविद्यायीन वक्तृत्व स्पर्धा.

१. श्री. परेश श्याम मोकाशी, तृ. व. कला— उत्तेजनार्थ, रु. १५१, स्मृतिचिन्ह.

२. श्री. प्रकाश मारुती पवार, तृ. व. कला— स्मृतिचिन्ह.

२१) हिंदी दिवसानिमित्त कॅनरा बॅंक, विभागीय कार्यालय, पुणे आयोजित हिंदी वक्तृत्व स्पर्धा.

१. कु. मृदुला दत्तात्रेय फाटक, द्वि. व. वाणिज्य— प्रथम क्रमांक.

२. कु. सुनिता पांडूलाल सोनी, अकरावी वाणिज्य--द्वितीय क्रमांक.

२२) हुंडा निर्मूलन व दक्षता समिती आयोजित वक्तृत्वस्पर्धा

१. परेश शाम मोकाशी, तृ. व. कला, द्वितीय क्रमांक पारितोषिक रु. ३००.

**प्रा. गीताराम गायकवाड**
**कार्याध्यक्ष**

# कर्नावट करंडक आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

या वर्षी 'श्री. फुलचंद बाळचंद कर्नावट करंडक आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा' दि. ५ जानेवारी १९९० रोजी संपन्न झाली. पुणे शहर व बाहेरील एकूण १४ महाविद्यालयांच्या २८ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयांशीं संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी खुली होती. हे स्पर्धेचे अकरावे वर्ष होते.

'राष्ट्रीय आघाडीचे सरकार देशाला समर्थ व स्थिर शासन देईल !' हा वाद स्पर्धेचा प्रस्ताव होता. स्पर्धेचे उद्घाटन प्रा. शरद वाघ ( टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे–३० ) यांचे हस्ते झाले. परीक्षक म्हणून प्रा. एस्. व्ही. कुलकर्णी, सौ. सीमा देशपांडे, प्रा. स. म. गोळवळकर यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे हस्ते झाले.

'कर्नावट मानचिन्ह' जिंकण्याचा मान तिसऱ्यांदा सर परशुरामभाऊ महाविद्यालय, यांच्या संघाने मिळविला. या विजयी संघात कु. स्वाती म्हाळंक व श्री. राजेश देशमुख हे स्पर्धक होते.

प्रथम पारितोषिक (विभागून) कु. स्वाती म्हाळंक ( स. प. महाविद्यालय ) कु. चारुता जोशी (अभियांत्रिकी )

द्वितीय पारितोषिक– श्री. राजेश देशमुख ( स. प. महाविद्यालय ).

उत्तेजनार्थ– प्रशस्तीपत्रके– श्री. नीतीन दातार ( अभियांत्रिकी ), श्री. सौरभ पोंक्षे ( बृहन्महाराष्ट्र ) कु. मृदुला फाटक ( मॉडर्न ), कु. दिपाली खासनीस ( एम्. आय्. टी. ) श्री. निलेश मोकाशी ( गरवारे वाणिज्य ), श्री. योगेश भिडे ( फार्मसी– नाशिक ).

या स्पर्धेसाठी मा. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर, उपप्राचार्य पद्माकर आपटे, उपप्राचार्य डॉ. अशोक पाथरे, उपप्राचार्य अ. गो. गोसावी, उपप्राचार्य मराठे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. सुरेखा परब, ( पर्यवेक्षिका), प्रा. जगदीश चिंचोरे. प्रा. जयंत अहिवळे, प्रा. वीणा नरगुंद, प्रा. प्रेमा आगाशे, कै. प्रा. भगवान माळवे, कुलसचिव श्री. एस्. वाय्. कुलकर्णी, प्रा. अनिल व्हनकळस, विद्यार्थी परेश मोकाशी, मृदुला फाटक, मंजूषा दातार तसेच कलामंडळातील सदस्य प्राध्यापक व अन्य सहकारी प्राध्यापक, सर्व कर्मचारीवर्ग यांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी अतिशय परिश्रम घेतले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

प्रा. गीताराम गायकवाड.
कार्याध्यक्ष

# एन. सी. सी.

१९८९–९० या शैक्षणिक वर्षामध्ये १२९ विद्यार्थी एन. सी. सी. मध्ये दाखल झाले होते. विविध युनिट्समधील त्यांची विभागणी खालील प्रमाणे होती.

| | Unit | Number of Cadets |
|---|---|---|
| i ) | 2 MAH. Girls NCC | 21 |
| ii ) | 3 MAH. Air Squn | 13 |
| iii ) | 3 MAH. Naval | 42 |
| iv ) | 36 MAH. BN | 53 |

**विशेष उल्लेख :** आपल्या महाविद्यालयाच्या 36 MAH. BN मधील माजी विद्यार्थी राकेश पेद्राम ह्याने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी ( खडकवासला ) मधील अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असून पुढील प्रशिक्षणासाठी तो I. M. A. (डेहराडून) मध्ये दाखल झाला आहे. दुसरा माजी विद्यार्थी पांडे ह्याने I. M. A. मधील प्रशिक्षण पूर्ण केले असून तो भारतीय सेनेत अधिकारी म्हणून दाखल झाला आहे. पेद्राम व पांडे या दोघांचे अभिनंदन.

कु. वैशाली मालगे ह्या विद्यार्थिनींची नवी दिल्ली येथे झालेल्या 'भारतीयम्' मध्ये दोरीवरील मल्लखांब प्रात्यक्षिकासाठी निवड झाली. 'भारतीयम्' मध्ये तिने प्रत्यक्ष भाग घेतला.

मच्छिंद्र लोंढे ह्याने नेमबाजी स्पर्धेत स्पृहणीय यश मिळविले. त्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

नाविकदलाच्या छात्रांना Lt. A. L. Pathre, तसेच 35 MAH. BN. मधील छात्रांना Maj. P. D. Apte यांनी मार्गदर्शन केले.

एन. सी. सी. च्या विविध उपक्रमांना माननीय प्राचार्य यांचेकडून सर्व सहकार्य मिळाले. तसेच कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्गाकडून उत्तम सहकार्य मिळाले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**मेजर पद्माकर आपटे**

# भूगोलशास्त्र विभाग वृत्तान्त

**विभागीय उपक्रम :**

प्रथम सत्रात या वर्षी भूगोल विभाग व महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद यांच्या विद्यमाने 'पर्यावरणीय समस्या व व्यवस्थापन' या विषयावर १७ डिसेंबर १९८९ रोजी एकदिवशीय परिसंवाद प्रा. आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. या परिसंवादात महाविद्यालयातर्फे प्रा. अहिरराव यांनी '१९८७ ते १९८९ या काळातील वाहन ध्वनिप्रदूषणाचा तौलनिक अभ्यास' या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला. परिसंवादात डॉ. प्रभाकर करमरकर, प्रा. ढेकणे, प्रा. तोडकर, प्रा. सप्तर्षि या तज्ज्ञांनी पर्यावरणीय समस्यांविषयी आपले क्षेत्रीय अभ्यासावर आधारित विचार प्रसृत केले.

१२ ते १४ जानेवारी १९९० या दरम्यान पुण्यात झालेल्या महाराष्ट्र भूगोल अध्यापक महामंडळाच्या 'सर्वांसाठी भूगोल' या प्रदर्शन व माहितीपर कार्यक्रमात विभागातर्फे महाराष्ट्र, भारत सागरतळरचनेची प्राकृतिक भूरूपे यांची प्रतिमाने, स्थलनिर्देशक नकाशातील सांकेतिक खुणा व चिन्हे, संगीत पृथ्वीगोल व भूगोलशास्त्राच्या विविध ज्ञानशाखांचे प्रदर्शन सादर करण्यात आले.

पुण्यातील गणपती उत्सवाच्या काळात उत्सवामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचे मापन प्रा. अहिरराव व प्रा. आल्हाट यांनी विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन पूर्ण केले. या मौलिक संशोधनात तृतीय वर्ष साहित्य या वर्गातील परेश मोकाशी, सुशील गुजर, वर्षा खोरगडे, सुजाता जाधव, सोमनाथ काजळे, कु. भोसले, शिंदे या विद्यार्थ्यांनी जनमानसातील प्रतिक्रिया अजमावण्यासाठी सर्वेक्षण केले. या अभ्यासपूर्ण सहभागाचा उपयोग 'अयोध्या चॅरिटेबल ट्रस्ट' या संस्थेच्या प्रदूषण नियंत्रण प्रकल्पासाठी होणार आहे.

दि. २१ फेब्रुवारी १९९० रोजी 'ज्यूनियर जिऑग्राफर्स मीट' या उपक्रमान्तर्गत भूरूपशास्त्र तज्ज्ञ डॉ. श्रीकांत कार्लेकर यांनी पारदर्शिका व व्याख्यानाद्वारे भारताच्या पश्चिम सागरी किनारपट्टीवरील सागरी भूविशेष व सागरपातळीतील बदल सादर केले.

# अभ्याससहल वृत्तान्त

२५ डिसेंबर १९८९ रोजी १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी शिरवळनजिक ' शिर्के पेपर मिल ' या उद्योगाला भेट देऊन त्या अनुषंगाने ग्रामीण भागातील लघु उद्योग व रोजगार उपलब्धी तसेच हवा व जल प्रदूषण व त्याच्या नियंत्रणउपायाची पाहणी केली. प्रा. आल्हाट व प्रा. झगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२७ डिसेंबर १९८९ रोजी ११वी कला ( ब ) या वर्गाची ग्रामीण वस्ती सर्वेक्षण सहल मुळशी तालुक्यातील बेलावडे या गावी आयोजित केली होती. आदिवासी वस्तीचे प्रतीक असलेल्या या गावात शिक्षण; दवाखाना, दळणवळण, किराणाकेंद्र अशा सुविधांचे दुर्भिक्ष्य असल्याने जीवनमानही खालावलेले आहे.

२९ डिसेंबर १९८९ रोजी ११ वी कला ( अ ) या वर्गाची सर्वेक्षण सहल वेल्हेपेठ या मुख्यत्वे बाजारपेठेच्या कार्यावर आधारित तालुकास्थानी आयोजण्यात आली होती. महाराष्ट्रातील मागासलेल्या तालुकाक्षेत्रांपैकी वेल्हेपेठ हा आदिवासींचे अधिक्य असलेला एक प्रमुख तालुका आहे. येथे ७० टक्क्यांपेक्षा जास्त कार्यकारी लोकसंख्या व्यापारकार्यात गुंतलेली आहे. भौगोलिकदृष्टचा डोंगराळ परिसरातील मोक्याच्या केंद्रवर्ती स्थानक्षेत्रात या वस्तीच्या अस्तित्वाला अधिकतम लाभ झाले आहेत. परिणामी केंद्रवर्ती बाजारपेठेची वस्ती म्हणून ही वस्ती उत्क्रांत झाली. तोरणा, राजगड व रायगड याच परिसरात असल्याने पर्यटनालाही वाव आहे. या अभ्याससहलीचे संयोजन प्रा. आल्हाट व प्रा. झगडे यांनी केले.

३१ डिसेंबर १९८९ रोजी अकरावी विज्ञान या वर्गाची अभ्याससहल पुणे–आळंदी–शिरूर मार्गावरील फुलगाव या वस्तीसाठी प्रा. साळुंके, प्रा. आल्हाट व प्रा. झगडे यांनी नियोजित केली होती. भीमा व इंद्रायणी यांच्या संगमस्थानावरील या वस्तीला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे विविध फुलांचे उत्पादन व व्यापार मोठ्या प्रमाणावर वृद्धिंगत झाला आहे. या गावातील ' श्रुतिसागर ' हा आध्यात्मिक ज्ञानकेंद्राचा आश्रम वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१ ते ३ फेब्रुवारी १९९० या दरम्यान द्वितीय वर्ष साहित्य व तृतीय वर्ष साहित्य या वर्गातील भूगोल विशेष विषयाच्या विद्यार्थ्यांची अभ्याससहल रत्नागिरी, गणपतीपुळे व पावस या कोकण किनारपट्टीच्या क्षेत्रात आयोजण्यात आली होती. या क्षेत्रातील सागरी लाटांच्या खनन, वहन व भरण कार्यामुळे निर्माण झालेल्या सागरी गुहा, कमानी, कडे, स्टॅक्स, तरंगनिर्मित चबुतरे, पुळण, रिपल्स या भूविशेषांचा विस्तृत क्षेत्रीय अभ्यास प्रा. अहिरराव व प्रा. आल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. पुळे व पावस यांचा कोकणी–ग्रामीण भूदृश्याचे प्रतिक म्हणून अभ्यास करण्यात आला. याबरोबरच या क्षेत्रातील मृदा, भूरचना, जलवाहन, लोकजीवन व संस्कृती यांचेही अध्ययन करण्यात आले.

२१ जानेवारी १९९० रोजी १२ वी साहित्य या वर्गाचो शिरवळ औद्योगिक परिसरात औद्योगिक अध्ययन सहल संयोजित केली होती. उद्योगधंद्यांच्या स्थानिकीकरणात प्रभावी असणारे भौगोलिक घटक अभ्यासण्यासाठी प्रा. साळुंके व प्रा. आल्हाट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संकलन– प्रा. वाल्मीकी अहिरराव

# ग्रंथालय

फेब्रुवारी १९९० अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ५०००० झाली. वरील ग्रंथांशिवाय ५४ नियतकालिके आणि पुणे व मुंबई येथील सर्व मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे ग्रंथालयात घेतली जातात.

यंदाचे आर्थिक वर्षात ग्रंथालयाला विद्यापीठ अनुदान मंडळाकडून कोहसिप ग्रॅन्ट आणि सातव्या पंचवार्षिक योजनेचे अनुदान मिळाले. वरील अनुदानामुळे ग्रंथालयास उत्तमोत्तम ग्रंथ घेणे शक्य झाले आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळ, पुस्तक पेढी योजनेतून यंदा १३५ विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सकाळी ८–३० ते रात्री १०–०० पर्यंत खुली ठेवण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्रंथालयाला मान्यवर संस्था आणि व्यक्तींकडून ग्रंथ भेट मिळाले.

ग्रंथालयातील एक सेवक श्री. सुरेश रामचंद्र शेवाळे यांना महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यकारी दंडाधिकारी या पदावर नियुक्त केले आहे. त्यांचे अभिनंदन.

द. गो. बापट
ग्रंथपाल

# अश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा मुलगा कै. अश्विन पुंडलीक यांच्या स्मरणार्थ मॉडर्न महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित करीत असते.

या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे–

प्रथम पारितोषिक

चौधरी कैलास ज्ञानेश्वर यांच्या 'कधी कधी' या कवितेला मिळाले. तो हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके

१) सूर्यवंशी किरण माधवराव, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा.
२) औटी जना बाबुराव, न्यू आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालय, पारनेर.
३) कांबळे संजीवनी संपतराव, नासिक रोड महाविद्यालय, नासिक.
४) गोरे मंगेश मधुकर, श्री. चां. ता. बोरा महाविद्यालय, शिरुर.

१९८९–९० च्या काव्यस्पर्धेसाठी २१ महाविद्यालयांतील ५५ स्पर्धकांनी १०९ कविता सादर केल्या होत्या. परीक्षक म्हणून प्रा. विजय जोशी, डॉ. वि. भा देशपांडे आणि प्रा. सीताराम रायकर यांनी काम पाहिले. नेहमीप्रमाणेच काव्यस्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन दरवर्षी पारितोषिक वितरण समारंभाला आवर्जून उपस्थित राहणारे डॉ. विद्याधर पुंडलीक या वर्षापासुन उपस्थित राहणार नाहीत याची दुःखद जाणीव सर्वांनाच झाली.

डॉ. स्नेहल तावरे
संयोजक

## पदव्युत्तर विद्यार्थी संघटना

प्राध्यापक सदस्य–

प्रा. रमेश शहा
डॉ. भारती डोळे
प्रा. य. र. वाघमारे– कार्याध्यक्ष

पदव्युत्तर विद्यार्थी संघटनेतर्फे खालील चर्चासत्रे आयोजित करण्यात आली.

1) Recent Labour Relations Problems of Telco, Pune.

2) Post Graduate Courses– Prospects and Expectations.

या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी स्वत: निबंध तयार करून सादर केले. मार्च १९९० मध्ये Recent Trends in Corporate Finance या विषयावर चर्चासत्र आयोजित केलेले असून त्यास विद्यापिठाकडून अनुदान मिळालेले आहे.

कार्यक्रम यशस्वी होण्यास ऑफिस कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले. तसेच उपप्राचार्य अ. गो. गोसावी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन नेहमी मिळत गेले.

प्रा. य. र. वाघमारे
कार्याध्यक्ष

BEST STUDENT TROPHY
(Damodar Shield)
1989–90

**दामोदर ट्रॉफी**

१९८९–९०

शैक्षणिक वर्ष १९८९–९० करिता 'दामोदर ट्रॉफी' साठी कु. मृदुला द. फाटक, (द्वितीय वर्ष वाणिज्य 'डी') या विद्यार्थिनीची निवड झाली. निवड समितीवर प्रा. अ. गो. गोसावी, प्रा. गो. म. बनमुडे व प्रा. विनय शेरीकर यांनी काम केले.

अ. गो. गोसावी

Best Student Trophy
1989–90
Junior College

शैक्षणिक वर्ष १९८९–९० करिता 'बेस्ट स्टुडंट ट्रॉफी' साठी कु. विनोद अशोक फालक– (११ वी 'सी') या विद्यार्थ्याची निवड झाली. निवड समितीवर प्रा. सु. गो. परब, प्रा. जे. पी. चिचोरे व प्रा. व्ही. के. छाब्रा यांनी काम केले.

# शिष्यवृत्ती फी सवलती व इतर विषयांची माहिती : १९८९–९०

(१) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| १) श्री. सातपुते रविंद्र गेनभाऊ | १२ वी विज्ञान |
| २) श्री. मगर किशोरकुमार आप्पासाहेब | तृ. ब. विज्ञान |

(२) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| १) श्री. बनवडीकर पराग शंकर | १२ विज्ञान |
| २) श्री. गायकवाड महेश चिंतामण | ,, |
| ३) कु. कड मनीषा बाबूराव | ,, |
| ४) श्री. काळे राहुल संभाजी | ,, |
| ५) कु. कुलकर्णी पौर्णिमा वसंत | ,, |
| ६) श्री. नरवडे दीपक राजाराम | ,, |
| ७) श्री. ओक गणेश विश्वनाथ | ,, |
| ८) श्री. पोरे विकास श्रीधर | ,, |
| ९) श्री. सिधये सुदर्शन विश्वास | ,, |
| १०) कु. सूर्यवंशी निलोमा शंकर | ,, |
| ११) श्री. वैद्य महेश शरद | ,, |
| १२) श्री. ढोकळे दिगंबर मारुती | प्र. व. विज्ञान |
| १३) हुसेन शिरीन अबीद | प्र. व. संगणकशास्त्र |
| १४) परचुरे केदार श्रीकांत | प्र. व. विज्ञान |
| १५) इनामदार अपर्णा अशोक | द्वि. व. कला |
| १६) गवसणे माधुरी रेवणसिद्ध | द्वि. व. विज्ञान |
| १७) श्री. राजपूत हेमंतकुमार दत्तूसिंग | द्वि. व. संगणकशास्त्र |
| १८) कु. आमटे अनीता अनिल. | द्वि. व. वाणिज्य |
| १९) कु. चौगुले वैशाली अशोक | ,, |
| २०) कु. गुणे शिल्पा पद्माकर | ,, |
| २१) श्री. कुलकर्णी रवींद्र मधुकर | ,, |
| २२) कु. निपुणगे अश्विनी शाम | ,, |
| २३) कु. पुरंदरे संगीता श्रीरंग | ,, |
| २४) कु. सूर्यवंशी अपर्णा शंकर | ,, |
| २५) कु. मोरे मीरा हरिभाऊ | तृ. व. कला |
| २६) कु. गीतये विनया अरविंद | तृ. व. वाणिज्य |
| २७) कु. पुरंदरे प्रज्ञा अरविंद | ,, |
| २८) कु. श्रोत्री मनीषा मधुकर | ,, |

(३) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती :

| | |
|---|---|
| १) श्री. देव योगेश विनायक | १२ वी विज्ञान |
| २) श्री. रायकर प्रचेतस सीताराम | ,, |
| ३) कु. जोगळेकर वैदेही सुहास | ,, |
| ४) कु. लोन्हारी मनीषा वामन | ,, |

| | |
|---|---|
| ५) कु. कानवडे वैजयंती भीमाशंकर | प्र. व. संगणकशास्त्र |
| ६) कु. चक्रवर्ती श्यामली दुर्गादास | प्र. व. विज्ञान |
| ७) कु. खोत स्मिता दत्तात्रय | द्वि. व. कला |
| ८) कु. कुलकर्णी हर्षा मधुकर | द्वि. व. विज्ञान |
| ९) कु. तिवारी मेधा अशोक | द्वि. व. विज्ञान |
| १०) श्री. रावडे उमेश भगवंतराव | तृ. व. कला |
| ११) कु. रेणुकदास पौर्णिमा रमेश | तृ. व. विज्ञान |

**(४) साठे फौंडेशन ट्रस्ट शिष्यवृत्ती :**

| | |
|---|---|
| १) श्री. पाठक मंदार मोरेश्वर | ११ वी विज्ञान |
| २) कु. जोशी सुषमा दत्तात्रय | प्र. व. विज्ञान |
| ३) श्री. खोपडे प्रवीण माधव | प्र. व. संगणकशास्त्र |

**(५) प्रज्ञावान विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती :**

| | |
|---|---|
| १) श्री. लेले अमित सूर्यकांत | ११ वी विज्ञान |
| २) श्री. आचार्य प्रसाद | ,, |
| ३) श्री. रॉय जयदीप | १२ वी विज्ञान |
| ४) श्री. मोरे तुषार बाळकृष्ण | ,, |
| ५) श्री. बद्रीश कुलहल्ली | ,, |
| ६) श्री. वाडदेकर योगेश गजानन | ,, |
| ७) श्री. टी. एल. व्यंकटेश | ,, |
| ८) श्री. गोसावी प्रशांत वसंत | ,, |

**(६) ई. बी. सी शिष्यवृत्ती—**

| | |
|---|---|
| १) श्री. पडवळ सुनील रामचंद्र | १२ वी वाणिज्य. |

**(७) भारत सरकारची अपंग / अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती—**

| | |
|---|---|
| १) कु. दास एलव्हिना टी. | ११ वी सायन्स |
| २) श्री. बागडे राजेश हेमचंद | तृ. व. वाणिज्य |

**(८) सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत—**

| | |
|---|---|
| १) श्री. ऋषि कांत यादव | १२ वी शास्त्र |
| २) श्री. कदम अनिल दगडू | द्वि. व. शास्त्र |
| ३) ,, उत्तेकर विजय सुदाम | तृ व. वाणिज्य |
| ४) ,, गुजर सुशीलकुमार प्रल्हाद | तृ. व. कला |

**(९) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत—**

| | |
|---|---|
| १) श्री. देशपांडे ओंकार शंकर | द्वि. व. वाणिज्य |

**(१०) माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत—**

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय | १८ विद्यार्थी |
| वरिष्ठ महाविद्यालय | ३९ विद्यार्थी |

(११) श्री गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते यांचे धर्मदाय संस्था– पुणे आर्थिक साहाय्य

| | | |
|---|---|---|
| १) | कु. कुलकर्णी पौणिमा वसंत | १२ वी सायन्स |
| २) | कु. तांदळे सुवर्णा नागोराव | तृ. व. शास्त्र |
| ३) | कु. नवंदिगिकर विदुला विनायक. | तृ. व. वाणिज्य |

(१२) ई. बी. सी. सवलत––

कनिष्ठ महाविद्यालय ७६ वरिष्ठ महाविद्यालय ४७०

(१३) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत––

कनिष्ठ महाविद्यालय ४० वरिष्ठ महाविद्यालय ९४

(१४) एस. एस. सी. डी. एड.––

कमिष्ठ महाविद् ०१ वरिष्ठ महाविद्यालय ०६

(१५) मुलींना मिळणारी मोफत शिक्षण योजना–– ९६१ विद्यार्थिनी

(१६) भारत सरकारची शिष्यवृत्ती ( मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी )

कनिष्ठ महाविद्यालय ५३ वरिष्ठ महाविद्यालय ७७

(१७) महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत ( मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी )

कनिष्ठ महाविद्यालय ६९ वरिष्ठ महाविद्यालय ९४

(१८) महाविद्यालयीन शिष्यवृत्ती––

कनिष्ठ महाविद्यालय ८० वरिष्ठ महाविद्यालय १००

(१९) महाविद्यालयीन फी सवलत––

वरिष्ठ महाविद्यालय ०२

बी. एड. / डी. एच. ई.

सौ. व्ही. ए. कांबळे

एल. एल. एम.

प्रा. बे. आर. नातू

अन्यत्र संधि मिळाल्यामुळे महाविद्यालय सोडून गेलेले

प्रा. वाय. एम. सुमंत
प्रा. एम. डी. करमरकर
प्रा. के. एस. लागू
प्रा. व्ही. ई. करमरकर
प्रा. के. एच. बर्वे
प्रा. आर. व्ही जोशी
प्रा. जे. एल. जोर्वेकर
सौ. एम. डी. घोडे
सौ. व्ही. आर. रेवणकर
प्रा. एस. डी. जोशी

**विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून निवड—**

श्री. एस. आर. शेवाळे

**आकस्मिक प्राणोत्क्रमण—**

श्री. भगवानराव ह. माळवे ( हिन्दी शिक्षक ) १७–१–९०

श्री. तुकाराम अ. पनवेलकर. ( ग्रंथालय परिचर ) दि. १२–११–८९.

**सेवानिवृत्त—**

१९७० पासून मॉडर्न महाविद्यालयात काम करणारे प्रबंधक, श्री. यशवंत पांडुरंग देशपांडे, दिनांक ३१–१०–१९८९ रोजी सेवानिवृत्त झाले.

## कनिष्ठ महाविद्यालय–नवीन नेमणुका

| | |
|---|---|
| श्री. चंद्रकांत त्र्यंबकराव प्रधान | इंग्रजी विषय |
| सौ. विजयालक्ष्मी रमेश रेवणकर | इंग्रजी विषय |
| सौ. बहुलीकर शुभांगी अरुण | इंग्रजी विषय |
| सौ. सुनीता अनिल नाडगीर | हिन्दी विषय |
| श्री. दत्तात्रय लक्ष्मण लिमये | अर्थशास्त्र विषय |
| सौ. मंगल दिगंबर घोडे | अर्थशास्त्र विषय |
| सौ. सुधा अश्विनीकुमार ढोणसळे | अर्थशास्त्र विषय |
| श्री. प्रशांत पुरुषोत्तम भोसले | संगणकशास्त्र विषय |
| श्री. संदेश सुरेश काशीकर | विद्युत्शास्त्र विषय |
| श्री. अभयकुमार वासुदेव मठ | विद्युत्शास्त्र विषय |
| श्री. राजेन्द्र गोपाळ कडुसकर | विद्युत्शात्र विषय |
| सौ. कांचन भरत राजाध्यक्ष | गणित विषय |
| कु. योगिनी मोरेश्वर शेंडे | गणित विषय |
| सौ. अपर्णा चंद्रशेखर मारवले | भौतिकशास्त्र विषय |
| सौ. सुरेखा सुरेश खांबेटे | जीवशास्त्र विषय |
| सौ. अमृता श्रीकांत कुलकर्णी | वाणिज्य विषय |
| सौ. अश्विनी प्रमोद थिटे | वाणिज्य विषय |
| श्री. दत्तात्रय कृष्णाजी दातरंगे | भौतिकशास्त्र विषय |
| श्री. रामचन्द्र विठ्ठल झगडे | भूगोल विषय |
| श्री. विनय मुरलीधर शेरीकर | शारीरिक शिक्षण विषय |
| सौ. संजीवनी विजय कोळेकर | जर्मन विषय |
| श्री. विलास अमृतराव बांदल | ग्रंथालयशास्त्र विषय |
| सौ. मीनल अविनाश गोडमे | संस्कृत विषय |

## वरिष्ठ महाविद्यालय–नवीन नेमणुका

| | |
|---|---|
| डॉ. सौ. शैला चंद्रकांत काळकर | मराठी विषय |
| श्री. आनंद धनंजय पाध्ये | जीवशास्त्र विषय |
| सौ. अपर्णा रवीन्द्र शिलोत्री | संगणकशास्त्र विषय |
| कु. ममता श्रीवास्तव | संगणकशास्त्र विषय |
| श्री. शरद रघुनाथ चौधरी | भौतिकशास्त्र विषय |
| श्री. विजय तुकाराम शेळके | भौतिकशास्त्र विषय |
| श्री. सुनील जयसिंग कवडे | राज्यशास्त्र विषय |
| श्री. जयंत पद्माकर बर्वे | वनस्पतिशास्त्र विषय |
| श्री. लालासाहेब लक्ष्मण टकले. | संख्याशास्त्र विषय |
| श्री. श्रीरंग दत्तात्रय जोगळेकर | वाणिज्य विषय |
| श्री. पंडित प्रभाकर पलांडे | वाणिज्य विषय |
| कु. स्वाती पंढरीनाथ गवई | वाणिज्य विषय |
| श्री. विवेक मधुकर मटकरी | वाणिज्य विषय |
| कु. इंद्रायणी प्रमोद केळकर | गणित विषय |
| श्री. किरण हनुमंत बर्वे | गणित विषय |
| श्री. गीताराम परशुराम गायकवाड | राज्यशास्त्र विषय |
| श्री. महेश दत्तात्रय करमरकर | भौतिकशास्त्र विषय |
| सौ. संध्या अनिल वर्तक | अर्थशास्त्र विषय |
| श्री. चारुहास उपासनी | वाणिज्य विषय |
| कु. रश्मी सदाशिव छत्रे | जीवशास्त्र विषय |
| सौ. अरुंधती दिलीप जोशी | गणित विषय |
| सौ. सुवर्णा शिरोळकर | मानसशास्त्र विषय |
| सौ. गौरी रविंद्रनाथ साठये | जीवशास्त्र विषय |
| कु. सविता शामराव देशपांडे | रसायनशास्त्र विषय |
| डॉ. अनिल पद्माकर जोशी | रसायनशास्त्र विषय |
| श्री. प्रशांत पुरुषोत्तम भोसले | भौतिकशास्त्र विषय |
| श्री. अभयकुमार वासुदेव मठ | भौतिकशास्त्र विषय |
| सौ. रंजना विश्राम चांदोरकर | भौतिकशास्त्र विषय |

## Trekking Club

The highlight of the trekking activity during this year was a trek to Satpuda hills, at an average height of 4000-5C00 feet, The trek was sponsored by the ' Department of youth affairs and sports, Government of India. ' The trek was organised by Modern College. It was successfully led by Prof. M. G. Gohel, Dept. of Chemistry, Modern College. The objectives of the trek were to promote adventurous spirit among the students and also to study the environment, socio-economic conditions of the tribals living in the Satpuda region. The trekkers had an opportunity to see for themselves the deforestation brought about by the tribals themselves. They also learnt about the burning problem of the Sardar Sarovar which is going to displace most of the villages. The area selected was the taluka of Akrani Mahal, the border taluka where the boundaies of the three states namely Maharashtra, Gujarat, and Madhya Pradesh meet. They also climbed the Astumbha mountain ( 4347 ft ). According to the local belief, one of the dominant characters in the Mahabharata, Ashvatthama was said to have wandered around the Astumbha mountain. The trek began at Asali, covering Bhusa, Zapi, and ended at Tornamal, a local hill station. We are greatly thankful to Shri P. K. Eksambekar, Asst. Programne Adviser, N. S. S. Regional Center, Pune and Prof R. B. Shah, N. S. S. Programme Officer, Modern College, for proviling this opportunity. The said programme was for 10 days and eighteen students participated in the trek.

During the year Prof. Padhye also led four treks to the various forts near Pune. We are also thankful to Principal, Vice-Principals, Registrar, and teaching and non-teaching staff, for their sincere and valuable guidance and co-operation.

Prof. S. R. Raykar
Chairman

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतपेढी मर्यादित

## द्वारा मॉडर्न महाविद्यालय पुणे ४११००५

र. नं. PNA / पुणे सिटी / BSR । २८९ । ८३

अध्यक्ष — सचिव

कवडे एस. बी. — दळवी रघुनाथ एस.

( एम. ए. बी. लिब्. एस्सी. )

जानेवारी १९८३ रोजी स्थापन झालेल्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतपेढीचे अधिकृत भागभांडवल रु. ५०००००।– ( पाच लाख ) आहे. ३० जून १९८९ रोजी जमा भागभांडवल रु. २००९४०।– आहे. एकूण सभासद संख्या १०० असून सभासदांना तातडी कर्जापोटी रु. १०००।– आणि दीर्घ मुदत कर्जापोटी २००००।– रुपयापर्यंत कर्ज १६ टक्के व्याज दराने देण्यात येते. मंजूर दीर्घ मुदत कर्ज रक्कमेतून ५ टक्के रक्कम भाग खरेदीच्या रूपाने संस्थेकडे जमा करण्यात येतो. तसेच दरमहा सभासदांच्या महाविद्यालयाच्या पगारातून २० रुपये भाग खरेदीपोटी संस्थेकडे जमा केले जातात. आतापर्यंत सभासदांना दर वर्षी १० ते १२ टक्क्यांपर्यंत लाभांश वाटप करण्यात आले आहे. सन १९९० ते १९९३ मुदतीकरिता ५ जानेवारी १९९० रोजी निवडणूक होऊन खालील संचालक मंडळाची निवड झालेली आहे.

| | | |
|---|---|---|
| श्री. | कवडे एस्. बी. | अध्यक्ष |
| श्री. | आल्हाट व्ही. बी. | उपाध्यक्ष |
| श्री. | दळवी आर. एस्. | सचिव |
| श्री. | गोखले के. एम. | कर्ज समिती अध्यक्ष |
| श्री. | कदम व्ही. एस्. | कर्ज समिती उपाध्यक्ष |
| श्री. | जगताप के. एस्. | खजिनदार |
| श्री. | आव्हाड व्ही. एल. | उपसचिव |

## प्राध्यापक मंडळ–स्टाफ टी क्लब (१९८९–१९९०)

महाविद्यालयाच्या प्राध्यापक–मंडळाच्या सचिवपदाची सूत्रे १९८८–८९ च्या जूनपासून डॉ. पी. डी. कुलकर्णी व प्रा. श्रीमती निर्मला मोने यांनी हाती घेतली. प्रा. मंडळाचे काम दिवसेंदिवस वाढत असल्याने उपरोक्त चिटणीसांच्या मदतीला चालू वर्षापासून प्रा. विलास आल्हाट आणि प्रा. अशोक कांबळे यांनाही संयुक्त कार्यवाह म्हणून घेतले आहे. याशिवाय गेल्या वर्षी प्रा. श्री. दांडेकर व प्रा सौ. रहाणे यांनी तसेच श्री. विश्वनाथ धनवट, श्री. सणस, श्री. दौंडकर व यदा श्री. पासलकर या कर्मचाऱ्यांची बहुमोल मदत असल्यानेच प्रा. मंडळाचे काम पहाणे कार्यवाहांना शक्य झाले आहे.

प्रा. मंडळाची स्थापना मुळांत दिवसभर महाविद्यालयात असणाऱ्या प्राध्यापकांची मधल्या विश्रांतीच्या वेळी चहा वा कॉफीपानाची सोय व्हावी आणि सर्व प्राध्यापकांना विचारविनिमयासाठी एकत्र येता यावे यासाठी झालेली आहे. आज या मंडळाचा सभासदसंख्या वरिष्ठ महाविद्यालयातील १०४ + कनिष्ठ महाविद्यालयातील ४५ प्राध्यापक इतकी झाली आहे. यांच्या जमलेल्या वर्गणीतून सभासदांना चहा कॉफी

देण्याव्यतिरिक्त इतर उपक्रम केले जातात. दरवर्षी संक्रांतीला तिळगूळ, तसेच सदस्यांना एखादी वस्तू नववर्षदिनी सप्रेम भेट देण्याचा पायंडा पाडला असून गेल्या वर्षी एक चांगल्या दर्जाचे पेन व यंदा तीन वेगवेगळ्या अत्तरांचा सेट भेटीदाखल देण्यात आला. याशिवाय महाविद्यालयीन प्राध्यापक व इतर कर्मचारी यांपैकी कुणी एखादी पदवी, पदोन्नती वा पारितोषिक मिळविल्यास, सेवानिवृत्त होत असल्यास मंडळाकडून त्यांचा सत्कार, तसेच नवविवाहितांचे अभिनंदन करण्यात येते. यंदा त्यानुसार श्री. वाय्. पी. देशपांडे व श्री. सी. जी. कुलकर्णी, महाविद्यालयातून निवृत्त झाले. त्यांचा पहिल्या सत्रांत मॉडर्न महाविद्यालय कर्मचारी संघटनेला बरोबर घेऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयात तृतीय वर्ष कला-या वर्गात शिकत असलेली एक विद्यार्थिनी कु. विजया सोनजे हिच्यावर हृदयाची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यावेळी या मंडळातर्फे तिला रु. १२४८/- फक्त एवढी रक्कम मदत म्हणून देण्यात झाली.

प्राध्यापकांच्या वाढत्या संख्येला आधीच्या प्राध्यापक-कक्षाची जागा फारच अपुरी पडत होती. यंदा हा कक्ष वाढवून मिळाल्याने बरीच सोय झाली आहे. पुढील वर्षासाठी त्यात आणखी काही बदल व सुधारणा करवून घेण्याचा मानस आहे.


गेल्या दोन वर्षांपासून महाविद्यालयातील सर्व स्त्रीकर्मचाऱ्यांनी व प्राध्यापिकांनी एकत्रित येऊन अनेक मनोरंजनाचे व खानपानाचे कार्यक्रम घडवून आणले. त्यातून 'स्टाफ - गॅदरिंग' ची- प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांच्या स्नेहसंमेलनाची कल्पना स्फुरली. यंदाचे हे अशा संमेलनाचे तिसरे वर्ष, यानिमित्ताने वैयक्तिक गाणी, नृत्य, नाटयछटा, समूहगीते, समूहनृत्य, एकांकिका असे अनेक कार्यक्रम दरवर्षी अतिशय उत्साहाने भाग घेऊन पार पाडले जातात. त्यावेळी उत्तम प्रतिसाद तर मिळतोच; पण यानिमित्ताने महाविद्यालयाशी संबंधित सारेचजण एकत्र येतात, खुल्या दिलाने मनोविनोदन करतात व त्यामुळे महाविद्यालयाविषयीची आत्मीयतेची भावना अधिक वाढीस लागते असे आढळून आले आहे. मंडळातर्फे स्नेहसंमेलनाच्या दिवशी व विशेष प्रसंगी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना अल्पोपाहाराचा कार्यक्रम असतो. यावर्षी स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमासमवेतच क्रीडास्पर्धा व इतर छंदकला नैपुण्यातून निर्माण केलेल्या वस्तूंचे एक प्रदर्शनही आयोजित केले होते. तर कार्यालयीन कर्मचारी श्री. काळे यानी गणपतीचे एक चित्र भेट म्हणून प्राध्यापककक्षात लावण्यासाठी दिले आहे. महाविद्यालयांतर्गत विशेष कार्यक्रमांच्या दिवशी वेळोवेळी डॉ. प्रा. कांचन गंधे, प्रा. रहाणे श्री. पासलकर यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या पुष्परचना प्राध्यापक-कक्षांत स्वतःहून करून मंडळ व महाविद्यालय याविषयीची आपली आपुलकी व जिव्हाळा व्यक्त केला आहे तो तसाच सतत वृद्धिंगत होत रहावा ही इच्छा !

**प्रा. निर्मला मोने**


## श्रद्धांजली




प्रा. माळवे भगवान हरिदास
मृत्यू दि. १४-१-९०



श्री. तुकाराम अ. पनवेलकर (ग्रंथालय कर्मचारी)
मृत्यू दि. १२-११-८९



बाबू लुणवे, एफ. वाय. बी. ए.
अपघाती मृत्यू (२ फेब्रु. ९०)



प्रसाद पुराणिक, एफ. वाय. बी. ए.
अपघाती मृत्यू (२ फेब्रु. ९०)